नाटक

१९८०४

IRBK-0119804

IRBK-0119804

1 DEC 2002

SEP 2004

21 JAN 2012

नाटक
१५८०४
५।८।८३

# ॥ लेकुरे उदंड जाली ॥

# वसंत कानेटकर यांचे इतर साहित्य

**नाटके :**

वेड्याचं घर उन्हात
देवांचं मनोराज्य
प्रेमा, तुझा रंग कसा?
रायगडाला जेव्हा जाग येते*
दोन ध्रुवांवर दोघे आपण
मत्स्यगंधा
मोहिनी
अश्रूंची झाली फुले
इथे ओशाळला मृत्यू *
घरात फुलला पारिजात
मला काही सांगायचंय
तुझा तू वाढवी राजा *
मीरा मधुरा
हिमालयाची सावली
बेइमान
अखेरचा सवाल
नलदमयंती
विषवृक्षाची छाया
कस्तुरीमृग
माणसाला डंख मातीचा
सूर्याची पिल्ले
एक रूप अनेक रंग
गोष्ट जन्मांतराची
गाठ आहे माझ्याशी
कधी तरी कोठे तरी

**एकांकिका :**

व्यासांचा कायाकल्प
मद्रासीने केला मराठी भ्रतार
गड गेला, पण सिंह जागा झाला

स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात
रामशास्त्री

झेंडे-पाटील महाविद्यालयात
गंगू, अंबू, विठा

आनंदीबाई आणिबाणी पुकारतात
शहाण्यांना मार शब्दांचा

**कादंबऱ्या :**

घर
पंख
पोरका

**कथा :**

लावण्यमयी

**टीका :**

नाटक; एक चिंतन

* तीन ऐतिहासिक नाटके एकत्र बांधलेली : 'शल्य'

# ॥ लेकुरे उदंड जाली ॥

वसंत कानेटकर

IRBK-0119804

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

लेकुरे उदंड जाली
पॉप्युलर प्रकाशन
म-२०४

Lekure Udanda Jali
(Marathi Play)
Vasant Kanetkar

© वसंत कानेटकर

पहिली आवृत्ती १९६६ (१८८९)
दुसरी आवृत्ती १९७० (१८९२)
तिसरी आवृत्ती १९८१ (१९०२)

मुद्रक:
**आर. एन. कोठारी,**
कोनम प्रिंटर्स
डायना टॉकिज लेन, ताडदेव,
मुंबई ४०० ०३४.

प्रकाशक:
**रामदास भटकळ,**
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

आगाऊ लेखी परवानगी शिवाय
या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये.
तालमींना आरंभ करण्यापूर्वी परवानगी
आणि परवानगी-मूल्य या संबंधात
सौ. उषा वसंत कानेटकर
'शिवाई', शरणपूर रोड, नाशिक २
या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

माझे प्रेमळ मित्र—

रामकृष्ण नायक

अवधूत गुडे

भिकोबा पै आंगले

प्रभाकरबाब शिरवईकर

आणि

दादा – दीनानाथ दलाल

यांना कृतज्ञतापूर्वक—

# लेकुरे उदंड जाली

प्रथम प्रयोग — रविवार दि. ३० ऑक्टोबर १९६६ दु. ४ वा.
रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई.

## पात्रांची यादी (प्रवेशानुक्रमे)

गोरा : भाई नारकर
राजशेखर : श्रीकांत मोघे
मधुराणी : कल्पना देशपांडे
धटिंगण गुरुजी : भोलाराम आठवले
मारोतराव : बाबुराव सावंत
दासोपंत : विठ्ठल पणदूरकर
सोनूताई : मंदाकिनी भडभडे
व्यंकटराव : भिकू पै आंगले
तिलोत्तमा : विजया धनेश्वर
डॉक्टर : बाबासाहेब महाडीक
दिग्दर्शक : मो. ग. रांगणेकर
संगीत दिग्दर्शक : जितेंद्र अभिषेकी
ऑर्केस्ट्रा संचालन व ध्वनि संकलन : अरविंद मयेकर
साहाय्यक : अशोक पत्कि
नेपथ्य : रघुवीर तळाशिलकर
नेपथ्य साहाय्यक : अनंत पुरोहित
प्रकाश योजना : चंद्रकांत होनावर, बापू आंगणे
ध्वनिमुद्रण : बॉम्बे साउंड सर्व्हिसिस
रंगभूषा : रमाकांत वडके

# निवेदन

'अश्रूंची झाली फुले'च्या पाठोपाठ 'लेकुरे उदंड जाली' हे माझे आणखी एक नाटक रसिकांना सादर होत आहे. या नाटकाची पहिली काही पाने मी १९६४ च्या मार्च–एप्रिल महिन्यांतच लिहिली होती. त्याच वेळी नाट्यकथेचा नुसता गोषवारा ऐकून गोवा हिंदू असोसिएशनच्या कलाविभागासाठी या नाटकाची श्री. रामकृष्ण नायक यांनी मागणी केली होती. या नाटकाचे प्रत्यक्ष लेखन मात्र नोव्हेंबर ६५ ते एप्रिल ६६ पर्यंतच्या काळात मी पुरे केले. दरम्यानच्या काळात विख्यात चित्रपट My Fair Lady मी पाहिला. त्यातील Lyrics ऐकून आणि पाहून असंख्य रसिकांप्रमाणे मी देखील भारावूनच गेलो. हा भावकाव्याचा मिस्किल प्रकार हास्यप्रधान नाटकात वापरण्यासारखा आहे याची मी तेव्हाच मनाशी खूणगाठ बांधली. मुंबईहून नाशिकला परतत असतानाच 'गौरीशंकर' नावाच्या एका संकल्पित विनोदी नाटकातले 'सुसरीनं धरलाय घरात माझा पाय...' हे गीत मी लिहून टाकले आणि त्या अनुषंगाने नाटकाचे नामकरणदेखील 'सुसरीने धरलाय माझा पाय' असे बदलून ठेवले. अजून हे नाटक पहिल्या अंकातच रेंगाळले आहे. पण 'लेकुरे उदंड जाली' पुरे करण्यासाठी मी बसलो त्या वेळी या नाटकात देखील अशी Lyrics वापरता येतील अशी शक्यता दिसली पहिली एक-दोन Lyrics लिहिल्यावर आणि मित्रमंडळींना ती आवडताहेत असे दिसल्यावर झटून प्रयत्न केला. या नाटकातला हा प्रयोग रसिकांना आवडला तर 'सुसरीने धरलाय माझा पाय' या नाटकाचे लेखन अधिक ईर्षेने मी हाती घेणार आहे.

उघडच हे एक हलके फुलके नाटक आहे. (या नाटकाला झोडण्यासाठी माझे विरोधक टीकाकार, नेहमीप्रमाणे आता 'प्रेमा, तुझा रंग कसा?' ची तुलनेने प्रशस्ती करू लागतील याची मला खात्रीच आहे. पण त्यांचे सोडा!) प्रेमळ, उमद्या, अनुरूप पतिपत्नींच्या सांसारिक जीवनातील निपुत्रिकत्व हा एक सनातन करुणेचा विषय आहे. करुणेच्या गडद सौम्य रंगच्छटातूनच आजवर तो विविध प्रकारच्या साहित्यातून अवतरला आहे. पण कोणे एके काळी एका रसिक मित्राच्या घरी पाहुणचार घेत असता, हीच 'करुणा' काही एका आगळ्या मिस्कील रसरंगरूपात माझ्या-

समोर रंगलेली मला दिसली आणि त्याच क्षणी या नाटकाचा जन्म झाला 'लेकुरे उदंड जाली' हे नाटकाचे नाव वाचून आणि ऐकून अनंत प्रकारचे तर्क उसळले. तर्क करणारांनी समर्थ रामदासांचे 'लेकुरे उदंड जाली। तो ते लक्ष्मी निघोन गेली' हे वचन पुरते वाचले तर या नाटकाच्या शीर्षकाचे मर्म ध्यानी येऊन त्यांना ते अधिक रुचेल असे मला वाटते.

या नाटकाच्या लेखनात आणि रंगमंचावरील त्याच्या आविष्कारात ख्यातनाम नाट्यलेखक, दिग्दर्शक श्री. मो. ग. रांगणेकर आणि विख्यात संगीत दिग्दर्शक श्री. जितेंद्र अभिषेकी यांनी अपार कष्ट घेतले. वाचताना सोपा वाटलेला पण वस्तुतः Unconventional आणि म्हणूनच बसवण्यास अत्यंत अवघड असलेल्या या नाटकातील Lyric चा प्रकार सर्वतोपरी यशस्वी व्हावा यासाठी या नाटकातले कलाकार आणि दि गोवा हिंदु असोसिएशनच्या कलाविभागाचे कार्यकर्ते यांनी अविश्रांत श्रम घेतले आणि खूप खर्चही केला. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. 'रायगडाला जेव्हा जाग येते'च्या निमित्ताने दि गोवा हिंदु असोसिएशन कलाविभागाच्या कार्यकर्त्यांचा माझा १९६१ साली प्रथम परिचय झाला. नाटकाची आवड, रंगभूमीची भलाई आणि समाजसेवा यापलीकडे कसलीही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नसणारे आणि या कार्यासाठी तनमनधन वेचून अहोरात्र राबणारे, कष्टाळू, रसिक आणि ध्येयवादी कार्यकर्ते, याच संस्थेत मला प्रथम भेटले. तात्त्विक मतभेदाचे वा भांडणतंट्यांचे प्रसंग उद्भवूनही त्यांचा आणि माझा स्नेह अखंड राहिला आणि उत्तरोत्तर गाढच होत गेला. मजवरील त्यांच्या या अकृत्रिम लोभाचे आणि उदार स्नेहशीलतेचे अंशतः उतराई होण्यासाठी माझे मित्र रामकृष्ण नायक, अवधूत गुडे, भिकोबा पै आंगले, प्रभाकरबाब शिरवईकर आणि आम्हा सर्वांचे दादा-चित्रकार दीनानाथ दलाल यांना ही नाट्यकृती मी कृतज्ञतापूर्वक अर्पण करीत आहे.

हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज
नाशिक शहर
३० ऑक्टोबर १९६६

**वसंत कानेटकर**

# अंक पहिला

[ पडदा वर जातो आणि दिसतो एका सुरेख बंगल्यातील सजवलेला एक सुंदर हॉल. शोभेच्या आणि सजावटीच्या छानदार आणि श्रीमंत वस्तूंची रेलचेल दिसते आहे. भिंतीचा रंग, तसबिरी, पुतळे, दारा-खिडक्यांचे पडदे, बसण्याची तऱ्हतऱ्हेची आसने, गालिचे, गाद्या, गिरद्या, या सर्वांतून एक नयनमनोहर रंगसंगती साधण्याचा प्रयत्न उघडच दिसतो. आणखी एक गोष्ट डोळ्यांत भरते. रेडिओग्रॅम, तंबोऱ्याची जोडी, भिंतीला लगटून उभा असलेला ऑर्गन, व्हायलिनची पेटी यांसारखी तऱ्हेतऱ्हेची वाद्ये या बंगल्यात वास्तव्य करणाऱ्यांची गायनाची आवड दर्शवितात.

सगळीकडे नीटनेटकेपणा, स्वच्छता, टापटीप, आणि सौंदर्यदृष्टी कशी ओसंडून राहिली आहे. या महालात कोणी नवख्याने पाऊल टाकले तर तो स्वतःच्याच अवतारानें ओशाळून जावा अशी " कडक रसिकता " कानाकोपऱ्यांत दरवळते आहे. समोरच्या भिंतीवर दोन तसबिरी डौलात लटकल्या आहेत. त्या बहुधा घरधन्याच्या आणि धनिणीच्या असाव्यात. दोघेही मध्यमवयीन, देखणी आणि उमदी दिसतात. बंगल्याला शोभेसाच एक जिना वळण घेऊन वर गेलेला दिसतो. उघड्या भव्य दरवाजातून बाहेरचा व्हरांडा आणि सुशोभित बगीचा अर्धवट दिसतो.

या बंगल्याचे नाव ' स्वरवृंद '. या स्वरवृंदात कोणी राजे-महाराजे वा

धनाढ्य उद्योगपती राहतात का ? छे छे–असा भलताच गैरसमज करून घेऊ नका. येथे राहतात प्रख्यात संगीत दिग्दर्शक टी. राजशेखर आणि त्यांची पत्नी मधुराणी. "टी. राजशेखर" हे आपले फिल्मी दुनियेसाठी बनविलेले नाव. एरवी लोक ओळखतात त्यांना "राजाभाऊ तांबे" याच नावाने. सायंकाळचा समय. पडदा वर जात असतानाच बाहेर दहापंधरा पोरट्यांचा गलका चाललेला ऐकू येतो, आणि पाठोपाठ भसाड्या स्वरात पोरांवर कोणी गुरकावल्याचा आवाज कानी येतो. गुरकावणारा प्राणी म्हणजे या स्वरवृंदातला घरगडी गोरा. गोरा बाहेर बागेतून खेकसतो...

"आता मुकाट चालू लागताय घराला का येऊ ?"

तशी कारटी "हुई" करून ओरडतात. गोरा पिसाळतो आणि अंगावर धावून जात .." येकाकाचं प्याकाट मोडन हांऽऽ ह्यो गोरा एकदा का विथरला का कोनाच्या बालाबी न्हाय जुमानायचा. खेळाया का तुमाला दुसरी जागा न्हाई ? अरं साळंत ह्योच शिकवतो का तुमचा मास्तर ? आंऽऽ ? आता पुना फाटकामंदी पाय तर ठिवा...न्हाई एकेकाचं टकुरं फोडलं तर..."

या दरडावणीला भिऊन अंगणात जमा झालेली पोरं पसार होतात आणि मग दारावरचा पडदा हलकेच दूर करून गोरा हात झटकीत आत येतो. धोतर वर खोचलेले आणि धुळीने अंग माखलेले असा अवतार. जिन्याकडे जाता जाता क्षणभर थबकून प्रेक्षकांना उद्देशून गोरा म्हणतो...]

**गोरा :** तर काय वो ! लई वात आणलाय या सोसायटीतल्या कारट्यांनी. दिवसभर अंगनामंदी नुसता धुडगुस. आन् वर आमच्या सायेबांची त्येनला फूस. परवापून आठ काचा फोडल्या. मी तरी कुटं कुटं ध्यान देणार ? पोरांवर हात उगारला तर सायेब दम भरनार आन् मुकाट बसलं तर बाई माझं कांडात काडणार. आता तुमीच पगा म्हंजी झालं. बसा...बसा...सायेब न्हाईतर बाई येत्याल इतक्यात. टायेम जालाच हाय. पर योक काम करा. मंजी काय...म्या हाय वर कौलारावर. तवा आता बसलाच हैसा तर वाइच दाराकडं लक्ष ठिवा. अन जर का कोनी पोरटा बिरटा फिरकला इकडं तर दगड हाना त्येच्या टकुऱ्यात दगड. काय बी मागंपुढं बगू नका. म्या हाय की तुमच्या पाठीशी......

[प्रेक्षकांना एवढी ताकीद देऊन आणि ही कामगिरी सोपवून गोरा जिन्यातून वर निघून जातो. क्षणभराने शीळ घालीत......गुणगुणत 'राजशेखर' ऊर्फ राजा प्रवेशतो. बूट, पँट, बुशशर्ट, गळ्याला स्कार्फ, एका हातात पोर्टमँटो आणि दुसऱ्या हातात सिगरेट, अशा थाटात स्वारी प्रवेशते. समोर प्रेक्षकांना पाहून...विस्मयाने किंचाळत.]

**राजा :** हॅल्लोऽऽ! तुम्हीऽऽ? एकदम इतकी मंडळी? अरे, म्हणजे आहे तरी काय आज आमच्या घरात! जवळपासचं धरण बिरण तर पुन्हा फुटलं नाही?

सत्याग्रह, लढा, मोर्चा, यातली भानगड काही?
महिलांचं वा साहित्यिकांचं इथं सम्मेलन तर चाललं नाही?
तसं असेल तर अजून इथं लठ्ठालठ्ठी कशी झाली नाही?
मग कधी नव्हे ते आमच्या घरी तुमचे पाय वळले कसे पाय?
खरं सांगा आमच्या घरी आज आहे तरी काय?

[थबकतो. डोके खाजवतो. एक शतपावली करून प्रेक्षकांना न्याहाळतो आणि मग एकदम उमज पडल्यासारखी टाळी वाजवीत]

हां हां मिस्टर कळलं. अत्तां आलं ध्यानात
ज्या अर्थी तुम्ही निमूट जागा धरून बसलात
त्या अर्थी आमच्या घरी तुम्ही नाटक पाहायला आलात.
द्या टाळी. तुम्ही आलात सहकुटुंब सहपरिवार
पदराला लावून थोडासा खार,
हां काही बसतील फुकट फौजदार
पण एकूण आपण नाटकाचे शौकिनच फार
एरवी उद्योग सोडून इकडं तुमचे झुकले कसे पाय?
खरं सांगा, आमच्या घरी आज आहे तरी काय?

तुम्ही आहात सगळे आंबटशौकी,
दोस्त–मी तर एक गाजरपारखी

आमच्या घरातलं नाटक
खुशाल उघडून फाटक
आमच्या 'मित्रमंडळ' सोसायटीतली मित्र आणिक मंडळी
अहो काय सांगू, फुकट बघतात रोज तिन्हीत्रिकाळी
पण कल्पना नव्हती मला की सबंध आळीच्या आळी
घराभोवती जमा होईल कोणे एके काळी
जाऊ द्या–स्वभावावर नाही औषध अन् संवयीवर नाही उपाय
पण खरं सांगा, आमच्या घरी आज आहे तरी काय ?

आलाच आहात तर बसा, बसा–जरा मौज बघायचीच का ?
मग आळी मिळी गुप चिळी–फक्त निमूट ऐका.

[राजशेखर फिल्मी दुनियेतल्या एखाद्या नटीसारखा लाडिक आवाज काढून हाक मारतो..."ए रा ऽऽ जऽ, ए राज्जू ऽऽ......राजशेखर ऽऽ" एका 'राजशेखर' नावाची तऱ्हेदार मोडणी करून राजशेखर हाक मारीत असताना वरून "कौन हाय त्ये ऽऽ ?" अशी गर्जना ऐकू येते आणि पाठोपाठ गोरा जिन्यातून धाड धाड करून खाली येतो. समोर राजाला उभा असलेला पाहून हातभर जीभ बाहेर काढीत...]

**गोरा :** सायेब आपून ?
**राजा :** बस का ऽऽ ! तू ऽऽ च ? हात तेरी. राणी कुठं आहे ?

[तेवढयात गोरा व्हरांड्यात जाऊन धुंडाळून येतो. तशी–]

गोरोबा ऽऽ, अरे कोणाला शोधतो आहेस ?
**गोरा :** (बावचळून) म्या कुना चिचुंद्रीचा आवाज ऐकला......
**राजा :** च्चिचुंद्री ? चिचुंद्री कोठली ?
**गोरा :** तुमच्या सिनेम्यातली...
**राजा :** गाढवा ऽऽ चित्रतारकांना चिचुंद्री म्हणतोस होय ?
**गोरा :** म्या नाई, बाईंच म्हनल्यात. त्येनला रागवा. माज्यावर नगा डोळं वटारू...

**राजा :** समजलं. इथं कोण्णी चिचुंद्री आली नाही.

**गोरा :** न्हाई कशी ? म्या आवाज ऐकला...यो कानानी...

**राजा :** तुला भास झाला असेल. अरे, मीच तर स्टूडिओतून येऊन राणीला हाक मारतोय. विचार तर यांना (प्रेक्षकांचा निर्देश करीत–) काय हो मंडळी, तुम्ही इथं कोणी बाई आलेली पाहिलीत का इतक्यात ? हूं ऽऽ नाही.

**गोरा :** त्येनला काय कळतया ? इतका येळ म्याच तर हाय बंगल्यामंदी...

**राजा :** (पोर्टमँटो भिरकावीत, प्रशस्तपणे बसत) अरे, काय, काय म्हणतोस काय तू गोरा ? बंगल्यावर तू एकटाच आहेस ? वा वा वा – छान छान...आधी सांगायचं नाहीस हे ?

**गोरा :** बाई बाजारामंदी गेल्या हायती.

**राजा :** (बूट उपसून भिरकावीत) झकास !

**गोरा :** (बूट उचलून ठेवीत) इकत्यात येत्याल त्या परत.

**राजा :** (वाईट मुद्रा करत) खरंच का रे ?

**गोरा :** तुमाला संगं घेऊन परदरशन पगाया जायचं म्हनत होत्या.

**राजा :** हूं. तिचं बोट धरून प्रदर्शन बघायला जायला लहान पोरगाच आहे की नाही मी ?

**गोरा :** आपन लौकर आला न्हाईत म्हून बाई लई तापल्यात आज.

**राजा :** सुखासुखी तिला तापायला काय जातंय ? आज स्टूडिओमध्ये चार गाणी रेकॉर्ड व्हायची होती, ठाऊक आहे ?

**गोरा :** शेजारच्या आळीतली पोरं आली होती दुपारच्या टायमाला.

**राजा :** (उत्सुकतेने) बॅट बॉल घेऊन ? अरे आज आमची मॅच होती.

**गोरा :** बाई रागावल्या त्येनला आन लावलं पिटाळून.

**राजा :** का, का का ? पिटाळून का लावलं आमच्या दोस्तांना ?

**गोरा :** बाई म्हणाल्या अंगणामंदी किरकेट खेळायचं नाही.

**राजा :** अंगणात खेळायचं नाही तर कुठं रस्त्यावर डाव मांडायचा आम्ही ?

**गोरा :** अंगणामंदी गुलाबाची नवी कलमं लावली हायती...

**राजा :** (रागाने) कलमं, कलमं, कलमं. सगळी कलमं एकदा उपटून फेकून देतो.

**गोरा :** तेवढी छाती नाही तुमची.

**राजा :** काऽय ? काय म्हणालास ?

**गोरा :** खरं त्ये ब्रोल्लो. कालच्या टायमाला आपन चेंडू मारून पुना खिडकीची काच फोडलीत.

**राजा :** (उसळून) अरे, अरे, म्हणजे काय मुद्दाम फोडली ? सिक्सर मारल्यावर एखादेवेळी काच फुटायचीकी !

**गोरा :** परवापून आठ काचा बसवल्या...

**राजा :** शंभर काचा बसवीन आणि फोडून टाकीन—सिक्सर मारून. तू काय समजला आहेस ?

**गोरा :** (दरडावीत) ते न्हाय चालायचं.

**राजा :** (खवळून) गोरा—

**गोरा :** असं बाई म्हनाल्या...खरंच, असं बाई बोलल्या.

**राजा :** बरं, बरं. समजलं. शहाणे झालात तुम्ही सगळे एकापेक्षा एक. जा चालता हो.

**गोरा :** (जाऊ लागत) बाई येत्याल इकल्यात.

**राजा :** (धुस्स्यात) येऊ देत, येऊ देत.

**गोरा :** तवर घरामंदी केर करू नका आन पसारा मांडू नका असं—

**राजा :** (ओरडून) एऽ अरे अडतिसावा वाढदिवस झालाय माझा परवा—आठवा नव्हे.

**गोरा :** माझं काय बी म्हननं न्हाई. पर...

**राजा :** घरात मूल नाही म्हणून मलाच पोरासारखं वागविता काय ? नॉन्सेन्स, हे हे—मला बिल्कूल चालणार नाही. मी मुळीच खपवून घेणार नाही.

**गोरा :** त्ये बाईच्या म्होरं सांगा योकदा.

**राजा :** सांगीन, सांगीन—काय भितोय काय मी तुझ्या बाईला ?

**गोरा :** (जिन्यात जात) म्या हाय वर कौलारावर. दार उगडं टाकून...

**राजा :** (विस्मयाने) कौलारावर ? अरे कौलारावर काय उद्योग चाललाय तुझा ?

**गोरा :** कौलं धुवून शाप कराया सांगितलीत बाईनी.

**राजा :** (थक्क होत) क...काय ? काऽऽय ? कौलं धुवून साफ करायला ?

**गोरा :** बाई म्हनाल्या लई धूल माजलीया कौलारावर.

**राजा :** (वेडावून दाखवत) अहाहा–तुझ्या बाईंची बुद्धिमत्ता काय वर्णावी! अरे तुझ्या बाईंच्या बापजाद्यांनी तरी छपरावरची कौलं कधी धुतली होती का?
**गोरा :** त्ये बाईनलाच इचारा. संध्याकाळपोत्तूर समदी कौलं शाप धुवाया होवीत असा मला हुकूम जाला हाय.
**राजा :** हुकूम झालाय म्हणजे काय आता अपीलच नाही वर. जा बाबा जा, कौलारावर जाऊन धुवत बैस कौलं. अगदी तेल लावून न्हाऊ, माखू घाल बरं का सगळ्या कौलांना (गोरा जाऊ लागतो तशी–) काय रे, इकडं ये... (गोरा माघारी येतो, तशी मधुराणीची नक्कल करीत) काय रे, तुझा हा अवतार? कशी रे तुम्ही गडीमाणसं? तुम्हांला स्वच्छता, टापटीप नि सौंदर्यदृष्टी कधी रे येणार? कसं पांढरं पांढरं स्वच्छ धोतर नेसावं, कशी पांढरी पांढरी शुभ्र पैरण घालावी...
**गोरा :** (हसू दाबीत) सायेब ह्ये काय बरं न्हाय. बाईंची नक्कल करताय आपून.
**राजा :** (डोळे वटारीत) गाढवाऽऽ मी मी बाईंची नक्कल करतोय का? मी तुला स्वच्छ राहायला सांगतोय. मी तुला टापटीप नि सौंदर्यदृष्टी ठेवायला सांगतोय.
**गोरा :** अवो पर छपरावर काम करायचं म्हणजे कापडं मळायचीच की!
**राजा :** (वेडावून) एवढी अक्कल आहे तर मग गाढवा क्रिकेट खेळायचं म्हणजे खिडकीच्या काचा फुटायच्या नाहीत? जा चालायला लाग. बेअक्कल लेकाचा.

[गोरा हसत हसत जातो. मग राजा प्रेक्षकांकडे पाहून हसतो, आणि पुढे येत–]

आहे की नाही एक अजब चीज? हा गोरा म्हणजे आमच्या गृहराज्यातील महात्माजी. म्हणजे तसा म्हणाल तर कोणी नाही. दरमहाचा पगार देखील घेत नाही. झोपडीत राहतो, पंचा नेसतो, दूध पितो, उपवास करतो, ढोरासारखा राबतो आणि प्रसंगी बिनसलं की मालक–मालकिणी विरुद्ध सत्याग्रह देखील पुकारतो. घरातले सगळे व्यवहार त्याच्या तंत्रात बसावे लागतात. त्याच्याविरुद्ध बोलायची कोणाची टाप लागलीय? मिस्टर, माहेरचं प्रकरण आहे, उगाच नाही. तेव्हा गोराला संभाळा. नाही, नाही. इतकं हबकून जायचं कारण नाही. बाईसाहेब खरेदीसाठी गेल्या आहेत म्हणजे दोन घटका निश्चिंती–बाकी तुम्हांला घरचा अनुभव असेलच म्हणा...

[एका प्रशस्त स्टुलावर प्रशस्तपणे मांडी घालून बैठक मारीत–]

तर दोस्त हो, मीच तो टी. राजशेखर. अखिल भारतीय कीर्तीचे संगीतदिग्दर्शक टी. राजशेखर यांचं नाव ठाऊकच असेल तुम्हांला? नाहीऽऽ? (चुकचुकत) अरे अरे, अरे, कसं व्हायचं तुमचं? घरी मंडळींना विचारा, पोरासोरांना पुसा, बिनाका ऐकत चला. जिकडं तिकडं आमचीच तुतारी ऐकाल. मिस्टर—प्रॉडक्शनमध्ये उतरलोय मी. अरे बघताहात काय — आमच्या मारोतरावाच्या एका रंगीत चित्राला म्यूझिक आणि निम्मं फायनान्स मीच दिलंय. टी. राजशेखर हे आपलं आमचं सिनेमातलं नाव. जरा मद्रासी बिद्रासी नाव घेतलं की धंद्याच्या दृष्टीनं बरं असतं. पण हाडाचा मी अस्सल मराठी बरं का! अहो, राजाभाऊ तांबे–हंऽऽ. हे हे हे आमचं घर. 'स्वरवृंद' नाव ठेवलंय बंगल्याचं. झकास आहे की नाही? आऽ? (मागे वळून निर्देश करीत) तो सोफा. हा गालिचा, ते पडदे, ती फुलदाणी, ती शोकेस, त्या तसबिरी, ते पुतळे, अगदी रेलचेल दिसतेय, नाही का? कसं टिपटॉप ठेवलंय की नाही घर? लखलखीत, चकचकीत, जिकडं, तिकडं अगदी कडक इस्त्री दिसतेय की नाही?

[हसतो. खिशातून चंची काढून पान तयार करू लागत—]

पण खरं सांगू का? गड्यांनो, आपल्याला यात काऽही रस नाही. हा सगळा आमच्या मधुराणीचा सोस. बिचारी या सोसापायी राब राब राबते. अहो काय सांगू? माणसाला घासून बासून चकचकीत करायची काही रीत असती, तर आमच्या राणीनं मला सकाळ संध्याकाळ, सँडपेपरनं घासघासून घासघासून वर फ्रेंच पॉलीशचे लेप लावले असते, लेप...आणि दिला असता ठेऊन या शोकेस-मध्ये, आहात कुठं? (हसत) पान घेणार? अरे घ्या ऽ, तुमच्या घरी नाही कोणी सांगायला जाणार. तुम्ही म्हणजे बोवा फारच...फारच घाबरता मंडळींना. तसे आम्ही देखील घाबरतो. मिस्टर या घरातली सगळी स्वच्छता, टापटीप नि सौंदर्यदृष्टी संभाळून या घरात वावरायचं म्हणजे तारेवरची कसरत आहे कसरत. इथं प्रत्येक वस्तूला एकेक जागा आहे आणि प्रत्येक जागेला एकेक वस्तू आहे वस्तू. आता ही चंची आहे ना, या चंचीला देखील एक जागा नेमून दिलीय. सहज चुकून कोठे भलतीकडं–म्हणजे टेबलावर, टीपॉयवर, बसायच्या गादीवर ही चंची राहिली की आमच्या घरची कवटी सरकलीच. चुकून बोलता बोलता कोणी

सिगारेटीवरील राख (चुटकी वाजवीत) अशी झाडली अगर अस्सं कुठं थोटूक भिरकावलं की त्याला तात्काळ सात वर्षं सक्तमजुरी आणि आमच्या बागेतील फळांना, फुलांना वा पानांना नुसता हात लावून तर बबा–फाशी, एकदम फाशी दुसरी बात नाही मऽग ? येताय का या सुंदर घरात पाहुणे म्हणून, सुळावरची पोळी चाखायला ? हत्, भित्री भागूबाई. अरे मी तर जन्म काढतोय इथं. (हसतो आणि पान तोंडात कोंबत) छे छे छे–तसा एकदम गैरसमज करून घेऊ नका. तशी ती प्रेमळ आहे, आगतस्वागताला फार चांगली आहे, उदार आहे आणि मुख्य म्हणजे तुमच्यासारख्या पाहुणेमंडळीत ती फार लोकप्रिय आहे. हूंऽऽ आता पाहालच की ! पण एकेकाची फॅडस् असतात ! तसं आमच्या घरातलं फॅड म्हणजे स्वच्छता, टापटीप, सौंदर्यदृष्टी. पण दोस्त, यातली एक गोम सांगू का तुम्हांला ? ऊं ? बोलायचं नाही हं कुठं ! हे आपलं तुमच्या आमच्यांत बरं का ! अगदी खाजगी–नाहीतर बोलाल कुठंतरी आणि कापाल माझा गळा (हसत) नाही म्हणजे त्याची काय गंमत आहे —

अहो, या गोजिरवाण्या घरात माणसांना लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की आम्हांला नाही मूल
हे तुमच्या आमच्यांत बरं का, बोलायचं नाही कुठं
नाहीतर तुम्ही जाल सुटून, अन् निघेल माझं उट्टं
तुम्ही सहज बोलाल रंगात येऊन बायकोच्या कानात
आणि खमंग चर्चा रंगेल उद्या महिला मंडळात
तिथे दहा घरच्या दहाजणी तळतील हो चिवडा
पण घरात माझा तळेल ही बटाटेवडा.

...'यांच्या जिभेला तर हाडच नाही हव्वं ते भकतात,'
म्हणून सगळ्या टवळ्या गावभर आमची बदनामी करतात
म्हणतात यांच्या सुंदर घरात माणसांना-लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की 'यांना' नाही मूल
म्हणून तुमच्या आमच्यांत बरं हे...बोलायचं नाही कुठं
नाहीतर तुम्ही जाल निसटून आणि

[गळ्यावरून सुरीसारखे बोट फिरवीत]

'डुईक' होईल इथं.
तसं घरात आमच्या कशालाही काही कमी नाही
उणं काढायला देवानं बाकीच ठेवलं नाही.
राजाराणी, दासदासी, हवेली टुमदार
वरती नावलौकिक, दागदागिने, पैसाही चिक्कार
घरचं सगळं, सगळं बघतो आमचा इमानी गोरा.
शिवाय सेवेमध्ये रूजू आहे बिचारा नवरा.
इतकं सगळं, सगळं आहे पण...पण...पण...पण...
पण डवरलेल्या वेलीवरती डोलत नाही फूल
अन् उंबऱ्यावरती उमटत नाही इवलेसे पाऊल
बाकी सगळं आहे घरात फक्त बाळ मात्र नाही
म्हणजे वाटली आहे झकास पण बूड तेवढं नाही.
म्हणून गोजिरवाण्या घरात माणसांना लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की आम्हांला नाही मूऽऽल.

(हसतो.)

अरे फक्त मूल नाही. पण मूल नाही म्हणजे काही नाही. मूल नाही म्हणजे—घरात खेळ नाही, खेळणी नाहीत, लाड नाही, खाऊ नाही, पार्टीदस्तर नाही, दंगा नाही, धिंगाणा नाही, हट्ट नाही. म्हणून या घरात माजलीय फक्त स्वच्छता, टापटीप, सौंदर्यदृष्टी. दोस्त हे आपलं आम्ही केलेलं या घराचं मनोविश्लेषण बरं का. (हसतो.) (सभोवार पाहत...) असं वाटतं की कुणीतरी चिमुकल्या पावलानं या घरात यावं आणि हे हे हे सगळं पार विस्कटून टाकावं...

अहो चिमुकल्या पावलांनी कुणीतरी यावं
आणि हे हे सगळं पार विस्कटून टाकावं
खदखदा हसावं, थयथय नाचावं
उडावं, बागडावं, लोळ लोळ लोळावं

जीभ काढून आईला वेडावून दाखवावं
अंगाऱ्या पिंगाऱ्या घेत खच्चून ओरडावं–हुईऽऽऽ
धाव धाव धावावं धबकन् पडावं,
मोठ्ठा गळा काढून खूप खूप रडावं
राणीनं धावत येऊन कडेवरती घ्यावं
बोबड्या बोलांनी लाडात बोलावं
'कशा गऽऽ पडला माज्या लाजू' म्हणावं
आणि हे सगळं कौतुक मी दुरुन बघावं
अहो चिमुकल्या पावलांनी कुणीतरी यावं
नि चिमणीचं घर पार विस्कटून टाकावं
मी तर बाबा आता किनई मज्जाच करणार
खूप दंगा करून घर डोक्यावर घेणार
हव्वा तिथे हव्वा तसा कारभार करणार
अरे घरचा मी मालक बोला मला कोण अडवणार
बाबा कावतील म्हणता–खुश्शाल कावू देत
आई ओरडेल म्हणता खुश्शाल ओरडू दे
अहो बाबा आणिक आई
म्हणजे वासरात लंगड्या गाई
त्यांना हो कोण जुमानणार ?
मी तर बाबा आता किनई मज्जाच करणार
खूप दंगा करून घर डोक्यावर घेणार
सोफ्याच्या भोवती शिवाशिवी खेळणार
जिन्यावरून दणादण खूप उड्या मारणार
पुतळ्याला खडूनं दाढीमिशा काढणार
पडद्याशी झोंबणार, फुलदाणी पाडणार
मोडला तर मोडू दे पण रेडिओ मीच लावणार
हट्ट करून क्रिकेटसुद्धा घरामधेच खेळणार
अरे ठोकीन एक सिक्सर की खळकन् काच फुटणार

आणि टाळ्या पिटत मी ओरडणार हुईऽऽऽ
की पैज मारून सांगतो आई एकदम भडकणार
खवळणार, संतापणार, खूऽप थयथयाट करणार
आणि कान पकडून मला ती बदड बदड बदडणार
मलाऽऽऽऽऽ ? ऊंऽऽहूंऽऽ त्यालाऽऽऽऽऽऽ
'मला' नाही 'त्याला' ती बदड बदड बदडणार
आणि बाबा दुरून मजाच बघणार
म्हणून चिमुकल्या पावलानं कुणी कृष्णानं यावं
त्याला यशोदेनं उखळाला बांधून घालावं
अहो ही वडील माणसं आपल्याला मोठ्ठी म्हणवतात
पण सगळं सोडून मुलांच्याच राशीला का हो लागतात ?
म्हणतात 'हे करू नका' आणिक 'ते करू नका'
'इकडं जाऊ नका' आणिक 'तिकड फिरकू नका'
'हे घेऊ नकाऽऽ' 'त्याला हात लावू नका'
'यावर बसू नकाऽऽ' 'त्यावर चढू नका'
हसू नका, रडू नका, गाऊ नका, बोलू नका,
सगळं 'नका, नका, नका, नका, नका आणिक नका !'
अरे पण काऽऽऽऽऽऽऽऽ ?
कधी रंगात आले बाबा तर दरडावून विचारतील
'अरे गृहपाठ लिहिलास का ? परवचा म्हटलास का ?
व्यायाम केलास का ? आणि पत्त्याचा डाव टाकायचाय
तेव्हा फलाण्या गृहस्थांना माझा निरोप पोचवलास का ?
आणि कान पकडून लाडात येऊन आई काय म्हणते
जळ्ळं मेल्याचं लक्षण तेऽऽ थांब तुला आता डागच देते
खा खा कारट्या, अरे दिवसभर किती चरशील ?
अरे आईला मदत करू लागशील तर काय झिजशील ?
अहो असले हे बाबा आणि असली आई
साफ सांगतो यांचं आमचं जमायचं नाही.

—असं म्हणेल आमचा बच्चा !
मी मी नाही बरं का–आमचा बच्चा म्हणेल असं
असं म्हणेल. आमचा बच्चा तर खुशाल त्यानं म्हणावं
वाटल्यास हव्वं ते फोडावं, मोडावं अन् तोडावं
पण चिमुकल्या पावलानं एकदा तरी घरात यावं
आणि हे हे सगळं पार विस्कटून टाकावं
विस्कटून टाकावं नि खच्चून ओरडावं—हुईऽऽऽ ! ! !

[ हे गीत म्हणत असता राजा रंगमंचावर नाचून, उड्या मारून, अक्षरशः धुमाकूळ घालतो. सगळी शोभा सजावट विस्कटतो. फुलदाणी कलंडते, टीपॉय कोलमडते, सोफ्यावरची बॅक कव्हर्स घरंगळतात, गालिचा गोळा होतो, दाराचा एक पडदा तुटतो आणि हा सगळा दंगा चालला असतानाच मधुराणी खरेदी आटोपून पिशव्या नि पुडकी घेऊन घरात पाऊल ठेवते. समोरचे दृश्य पाहून ती दारातच स्तंभित होऊन थबकते. हतबुद्ध होते. पिशव्या नि पुडकी खाली टाकून कमरेवर हात ठेवून ती बघतच राहते. शेवटी 'हुईऽऽऽ' म्हणून ओरडून राजा स्वतःभोवती गिरकी घेत असताना तिला बघतो आणि दचकून ब्रेक लावल्या-सारखा खाडकन उभा राहातो. जीभ बाहेर काढतो आणि तऱ्हतऱ्हेच्या मुद्रा करतो. नाकावर बोट ठेवून प्रेक्षकांना गप्प बसण्याची इशारत करतो. मग गडबडीने टीपॉय उभे करतो, फुलदाणी उचलून ठेवतो, सोफ्याची बॅक कव्हर्स सरळ करू लागतो आणि हे करता करता धडपडून ठेचकाळून आणखी पसारा निर्माण करून ठेवतो. आणि–]

**राजा :** (तिच्याकडे पाहत खोटे खोटे हसून अजीजीने) नाही...न...नाही... म्हणजे...म्हणजे...जराशी विस्कटलंय...थोडंसं. (एक शब्दही न बोलता की मुद्रेवर कसलाही भाव न दर्शविता राणी बघत राहाते. त्यामुळे जास्तच गडबडून...) न ... नाही ... नाही. म्हणजे हे सगळं ठेवणारच होतो मी ... ... जिथल्या तिथं ..म्हणजे...म्हणजे (म्हणजे म्हणजे करीत दारावर एका बाजूने निसटलेला पडदा उचलून पुन्हा लावू बघतो तो दुसरे टोकही निसटून खिळ्यासकट पडदाही हाता येतो. तशी राणीकडे हबकून पाहात...) खिळे घट्ट मारायला हवेत एकदा...

**मधुराणी :** (अस्फुट हसत पुढे येते आणि त्याच्या हातातला पडदा हिसकावून घेत)

बसा आता. दमलंऽऽ माझं लेकरू.

**राजा :** (ओरडून) अरे म्हणजे कमाल झाली...घरातसुद्धा मोकळेपणाने वागायची चोरी झाली की काय...?

**मधुराणी :** छे छे, असं कोण म्हणेल? आळीतली पोरं जमा करावीत, दंगा करावा, धिंगाणा घालावा, घरभर पसारा करावा आणि सगळ्या खिडक्यांच्या काचा फोडून टाकाव्यात......

[पडदा परत लावू लागते.]

**राजा** हे हे हे मात्र काहीतरीच हं राणी. आज कोण्णी पोरं जमा केली नव्हती मी. बिचारी निमूटपणे आपापल्या घरात अभ्यास करीत बसली आहेत.

**मधुराणी :** उजेड. खुशालचंद्र मेलेऽ. मला ठाऊक आहे, माझ्या जाण्याच्या वासावर टपून बसलेले असतात एकेक. (हाका मारीत) गोराऽ

**राजा :** अग नाहीऽऽ. आज एक मुलगा देखील इकडं फिरकला नाही. विचार वाटल्यास यांना.

**मधुराणी :** त्यांना कशाला विचारायला हवं? मी काय तुम्हांला आज ओळखतेय? गोरा—

**राजा :** अग पण—

**मधुराणी :** खोटं बोलू नका. त्या कीर्तन्यांच्या बंड्याला आता कुंपणाची तार वर करून पळताना पाहिला मी. गोराऽऽ-कुठं गेला मेला हा?

[तशी जिन्यातून लगबगीने गोरा हात झटकीत खाली येतो.]

**मधुराणी :** गोरा तुला जाताना बजावून गेले होते मी फाटकाला कुलूप घाल म्हणून.

**गोरा :** पर म्या कौलावर होतू बाई...आन

**मधुराणी :** बघ कार्ट्यांनी कसा घरात धुडगूस घातलाय तो. जा आधी फाटकाला कुलूप घालून ये.

**गोरा :** पर बाई कौलं...

**मधुराणी :** तू म्हणजे असा आहेस...अजून कौलं साफ झाली नाहीत?

**गोरा :** अस्सं कसं व्हईल ? समदी कौलं शाप झाली, पर धा पंदरा कौलं लई खराप झाल्यात. धुवाया होवीत ..

**मधुराणी :** आधी फाटकाला कुलूप घाल आणि ये ती कौलं घेऊन खाली. तोवर मी साबणाचं पाणी तयार करून ठेवते.

**राजा :** पण राणी, फाटकाला कुलूप म्हणजे अगदी कुलूपच घालायला पाहिजे का ?

**मधुराणी :** हो ऽऽ. बागेत मी गुलाबाची कलमं काश्मीरहून आणून लावली आहेत, ठाऊक नाही ?

**राजा :** ते ठीक आहे ग पण काल पोस्टमन देखील तणतणत होता की तुमच्या बंगल्याचं फाटक रेल्वेच्या फाटकासारखं नेहमी बंद असतं नी मधूनमधून केव्हातरी उघडतं. पत्रं टाकायची कशी ?

**मधुराणी :** फाटकाला पेटी लावून ठेवते, त्यात टाक म्हणावं पत्रं, कळलं ऽऽ !

**राजा :** तू दरडावल्यावर कळायलाच हवं. जा बाबा—लावून टाक कुलूप. वरती लाख ओतून सील करून टाक.

[गोरा जातो, मधुराणी पिशव्या नि पुडकी उचलते तशी...]

खरेदी बरीच केलीय वाटतं ?

**मधुराणी :** (खुदकन हसत) अय्याऽ विसरलेच की. आज तुमच्यासाठी मी काय काय आणलंय पाहिलंत का ?

**राजा :** माझ्यासाठी ? बघू बघू...

**मधुराणी :** तुमच्या वाढदिवसादिवशी देणार आहे मी तुमच्या हातात.

**राजा :** (पिशवीशी झोंबत) अग पण काय आणलं आहे ते दाखव तरी !

**मधुराणी :** थांबा थांबा—मी काढून देते (पिशवीतून एक छोटी बॅटबॉल काढून देत) हे तुमच्या आठव्या वाढदिवसासाठी.

**राजा :** ( सर्द होत ) काऽय ? (बॅट-बॉल खाली आपटतो.)

**मधुराणी :** (हसून पिशवीतून किल्लीची मोटार आणि पिपाणीचा फुगा काढीत) हे तुमच्या पाचव्या वाढदिवसासाठी.

**राजा :** (त्याही वस्तू आपटीत ओरडून) हे हे बरं नाही हं राणी—

**मधुराणी :** (हसत पिशवीतून खुळखुळा आणि दुधाची बाटली काढीत) आणि हे

हे तुमच्या...
**राजा :** (चिडून अंगावर धावून राणीला मारण्याचा आविर्भाव करीत) राणी-राणी, [ती हसत हसत दूर निसटून पळते तशी–] थराय्–बघून घेईन...
**मधुराणी :** (हसत हसत) आता का? आता का? मला चिडवताना बरं वाटतं?
**राजा :** (रागाने) म्हणून काय झालं? दुधाची बाटली आणि खुळखुळा? अरे काय नवरा आहे का विदूषक आहे मी या घरात? [मधुराणी जास्तच हसू लागते तशी...] हसतेस काय? उचल–आधी उचल त्या वस्तू आणि फेकून दे गटारात.

[उठून सगळ्या वस्तू उचलू लागतो. तशी त्याला निवारीत.]

**मधुराणी :** (हसत हसत) हां हां हां.. शांत व्हा महाराज, एकदम डोक्यात राख घालू नका. या या वस्तू मी काही तुम्हांला चिडवायला या घरात आणलेल्या नाहीत.
**राजा :** (उसळून) नाहीतर काय शोकेसमध्ये ठेवण्यासाठी, आणल्या आहेस?
**मधुराणी :** महाशय, आज माझी बहीण सोनूताई आणि तिचे यजमान दासोपंत मुलांना घेऊन घरी पाहुणे म्हणून यायचे आहेत. त्यांच्या मुलांसाठी ही तरतूद –समजलात?
**राजा :** (टाणकन उडी मारून उठत) ऑऽऽ? सोनूतई आणि दासोपंत?
**मधुराणी :** परवाच नाही का मी तुम्हांला म्हटलं, दासोपंतांनी महिन्याची रजा घेतलीय म्हणून?
**राजा :** (कासावीस होत) म्हणजे ती दोघं स...स...सगळ्या साती मुलांना घेऊन येणार?
**मधुराणी :** इऽश्शऽ. विश्रांतीसाठी ती दोघं येणार, मग मुलांना कुठं ठेवतील?
**राजा :** (मटकन कोचावर कोसळत) हरे राऽम.
**मधुराणी :** (रागाने) माझ्या माहेरच्यांना "हरे राम" करता काय? थांबा, आता तुमचे व्यंकटभावोजी आणि तिलोत्तमा वहिनी सहा मुलांना घेऊन पुन्हा येऊ द्या...
**राजा :** येणार आहेत...स्टुडिओत ट्रंककॉल आला होता त्यांचा. व्यंकटरावची तारेनं बदली झालीय इथल्या पोस्टऑफिसात–

**मधुराणी :** (थक्क होत) खरंच म्हणता की काय ? आता ?

**राजा :** आता काय ? आमच्या दोस्तमंडळींचा दुस्वास केलात. मुलंच होती ना ?

**मधुराणी :** (वेडावून) अहाहाऽऽ. मुलं कसली ? माकडं मेली. माझ्या बागेची अगदी नासाडी केली कारट्यांनी.

**राजा :** राणी राणी–इतका माणूसखाणेपणा बरा नाही. अशानंच परवा आपले ते हे म्हणाले की या बाई स्वतः आहेत निपुत्रिक म्हणून–

**मधुराणी :** (एकदम भडकून) काऽय ? कोण, कोण म्हणालं हो असं ?

**राजा :** (गडबडून) न–नाही नाही म्हणजे-लोक, लोक–लोक म्हणाली असतील.

**मधुराणी :** आता लटपटू नका. लोक कोण ?

**राजा :** (गडबडीने) न–नाही नाही म्हणजे हे सज्जन त्यातले नाहीत. ही मंडळी उलट तुझे कौतुक करीत होती.

**मधुराणी :** हूंऽऽ.

**राजा :** आत्ताच विचारीत होती की हे पडद्याचे कापड कुठं आणि कसं घेतलंत म्हणून. विचार, विचार त्यांना.

**मधुराणी :** अस्संऽऽका ?

**राजा :** तर काय ? पण मी साफ सांगितलं त्यांना की हे कापड तुम्हांला अख्ख्या दुनियेत कुठंही मिळायचं नाही. कुठं काश्मीरला घेतलं नाही ग आपण हे कापड ? काश्मीर म्हणजे काय–वा. उगाच नाही भारताचं नंदनवन म्हणत त्याला. उगाच फुकाफुकी आम्ही काश्मीर पाकिस्तानला देऊन टाकू की काय ? रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत–

**मधुराणी :** उगीच खोटी स्तुती करू नका आणि विषय बदलू नका. मला 'निपुत्रिक' कोण म्हणालं ते सांगा अगोदर.

**राजा :** तू म्हणजे बोवा फारच–अगं ते आपले हे...हे ग–काय त्यांचं नाव–जाऊ दे ग...

**मधुराणी :** मुळीच नाही जाऊ द्यायची. तुमचे घटिंगण गुरुजी असतील होय ना ?

**राजा :** आं ? घटिंगण गुरुजी ?

**मधुराणी :** बोलूच नका. मी तेव्हाच ओळखलं. लडदू मेला. घरात येऊन हक्कानं शेर शेर दूध मागून ढोसतो आणि तुमच्यापाशी माझी नालस्ती करतो आणि तुम्ही ती मुकाट्यानं ऐकून घेता ?

**राजा :** अग अग, माझं ऐकून तर घे. माझ्याजवळ घटिंगण गुरुजी तुझी नालस्ती कशी करतील ?

**मधुराणी :** मग कोणाजवळ करीत होते ?

**राजा :** आता कोणाजवळ म्हणजे...म्हणजे...

**मधुराणी :** मारोतराव, त्यांच्याशिवाय तुम्हांला एवढ्या प्रेमानं येऊन बायकोची निंदा कोण ऐकवणार ?

**राजा :** उगाच काहीतरी काढून चिडू नकोस राणी. अग कोणी काही, कोणी काही म्हणालं असलं तरी त्यात निंदानालस्ती कसली आलीय ?

**मधुराणी :** तोंडात जीभ आहे म्हणून हव्वं ते बोलत सुटावं. तुम्ही देखील त्यांतलेच.

**राजा :** उगाच भलभलतं ऐकून घेणार नाही मी राणी. या महाजनांनाच आपण विचारू. फक्त माझ्या प्रश्नाचं सरळ उत्तर दे. पंधरा वर्षांपूर्वी घटिंगण गुरुजींच्या शाळेत मी गायनमास्तर होतो आणि तू ड्रॉइंगटीचर होतीस. कबूल ? त्या वेळी तू माझ्या गोड गळ्यावर प्रेम करायला लागलीस, कबूल ?

**मधुराणी :** खोटं आहे. आधी तुम्हीच माझ्या डोळ्यांवर प्रेम करायला लागलात.

**राजा :** बरं बरं—तसं का होईना. तू आणि मी एकसमयावच्छेदेकरून एकमेकांच्या अनुक्रमे गळ्यावर आणि डोळ्यांवर गाढ प्रेम करू लागलो. महत्त्वाचा मुद्दा तो नाही. त्यानंतर बराचसा दंगा झाला, आणि केवळ घटिंगण गुरुजींच्या कृपेमुळे आपली प्रीतीची नौका परिस्थितीच्या तुफानातून विवाहाच्या पैलतीराला लागली.

**मधुराणी :** काय, काय काऽऽय ?

**राजा :** आमच्या सिनमातलं वाक्य आहे ते. तुला एका दमात नाही कळायचं. थोडक्यात म्हणजे घटिंगण गुरुजींच्या मध्यस्थीनं आपण विवाहबद्ध झालो. कबूल ?

**मधुराणी :** मध्यस्थी कसली ? त्याच मेल्यानं दोन्हीकडे लावालाव्या केल्या. मी विसरले नाही अजून.

**राजा :** जाऊ दे. इतकं मनात ठेवून वागू नये आपण. त्यानंतर तेरा वर्षे उलटली. मी यःकिंचित गायन मास्तराचा श्रेष्ठ संगीत दिग्दर्शक झालो. तू महिला मंडळाची अध्यक्ष आणि 'नवचित्रकार वर्तुळा'ची चिटणीस झालीस, कबूल ?

**मधुराणी :** तोंड सांभाळा. नवचित्रकलेची टिंगल केलेली मला खपायची नाही.

**राजा :** सांप्रत ती गहन समस्या नाही. या तेरा वर्षांच्या वैवाहिक जीवनात आपल्याला मूल झालं नाही. म्हणजे आजतागायत तरी. पुढचं पुढे. कबूल ?

**मधुराणी :** मला नाही असल्या पांचट प्रश्नांची उत्तरं देता येत.

**राजा :** म्हणजे कबूल. तर मग दोस्तहो–घटिंगण गुरुजी वा मारोतराव वा आणखी कोणी हिला निपुत्रिक म्हणाले असले तर...

**मधुराणी :** पण लोकांना हव्यात कशाला या चांभारचौकशा ?

**राजा :** म्हणजे काय ? सरळच आहे. चांभारचौकशा लोकांनी करायच्या नाही तर कोणी ? (प्रेक्षकांना) काय हो ? नाही नाही...तुम्ही त्यांतले नसाल. पण मला सांगा. हिला कोणी 'निपुत्रिक' म्हणालं असलं तर त्यात एव्हढं जिव्हारी लागण्यासारखं काय आहे हो ?

**मधुराणी :** (डोळ्यांत टचकन पाणी येऊन) मला जिव्हारी लागण्यासारखं काय आहे, ते तुम्हांला स्त्रीचा जन्म घेतल्याशिवाय जन्मात कधी कळायचं नाही. [फणकाऱ्याने आत निघून जाते.]

**राजा :** (समजूत घालीत मागोमाग दारापर्यंत जात) राणी, राणी राणी...रागावू नकोस . मी काय म्हणतोय ते ऐकून तरी घे–

[तोच बाहेरून गोरा येतो आणि जिन्याकडे जाता जाता थबकून–]

**गोरा :** बाईंनी तापवलं वाटतं ?

**राजा :** तुला रे काय करायच्यात त्या पंचाइती ? कौलं धुतलीस का ?

**गोरा :** (हसून जाऊ लागत) न्हाय, जातू जातू–जाम झालेलं दिसतया.

**राजा :** (डोळे वटारीत) काऽय ?

**गोरा :** फाटक...फाटक [जिन्यातून वर पळतो.]

**राजा :** (हंसतो आणि राणी गेलेल्या दाराकडे पाहात गुणगुणतो.)

अहो या गोजिरवाण्या घरात माणसांना लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की आम्हांला नाही मूल…

(प्रेक्षकांपुढे येत खजील मुद्रा करून डोके खाजवीत) कांही चुकलं का हो आमच्याकडून ? बस् बस् बस्. मला ठाऊक आहे महाशय–

आता मी नाक घासून जरी घेतली बायकोपुढे पड
तुम्ही पाहुणे असे लबाड आहात तुम्ही घेणार तिचीच कड
आमच्या तंबूमध्ये घुसून करताय तुम्हीच वर शिरजोरी
पण ज्या गावच्या बाभळी आहेत, त्याच गावच्या या बोरी

तुम्ही बोलूच नका मिस्टर, नेहमी 'वहिनी, वहिनी' करता
आणि गोड गोड बोलून तिला हमखास हरभऱ्यावर चढवता
म्हणता 'तुम्ही फारच हो वाळलात वहिनी. निदान टॉनिक घेऊन तरी पाहा
की वहिनी म्हणतात खुलून 'भावोजी ठेवलाय बरं का चहा'
'हा फारच बोवा आळशी, घरचं काऽही पाहात नाही'
की वहिनी विचारतात खुषीत, 'भावोजी खायला करू का काही ?'
'तुमचा हातच वहिनी सुगरण, धिरडं करता किती छान.'
की वहिनी बोलतात 'इश्श आता करते मांडते पान.'
तुम्ही असले कळीचे नारद जाता घरात लावून कळ
अन तुमच्यामागे आमचा होतो रात्रंदिवस छळ

कसा ठाऊक आहे ? अहो ही म्हणते

'घरात कित्ती मी जरी केलं तुम्हांला कौतुकच त्याचं नाही
भावोजी केवढे समजूतदार जरा शिका त्यांच्याकडून काही !'

पण याद राखा बच्चंजी, तुमच्याही घरात होईल फितुरी
अरे ज्या गावच्या बाभळी आहेत, त्याच गावच्या या बोरी

गड्यांनो–का नवराबायको कधी एकमेकांची चेष्टा करीत नाहीत ?
की गंमत म्हणून एकमेकांना कधी टोमणे मारीत नाहीत ?
पण मी काही जरी बोललो तरी गेलाच हिचा नूर
आणि डोळ्यांवाटे मुळामुठेला येतो महापूर
पूर येतो धो धो आणि आमचं होतं पानशेत
तुम्ही कळीचे नारद मनात म्हणता 'आत्ता जमला बेत'
पण तुमच्याही घरावर एक दिवस करीन वरं स्वारी
अरे ज्या गावच्या बाभळी आहेत त्याच गावच्या बोरी.

दोस्त हो–आमचे धटिंगण गुरुजी काही म्हणाले नाहीत आणि डायरेक्टर मारोतराव देखील काही बोलला नाही. अहो त्यांचं त्यांना झालंय थोडं आणि ती मंडळी कशाला कुणाला काही म्हणायला जाताहेत ? वेळ मारून नेण्यासाठी बटकाभर दिलं ठोकून आणि घेतली झालं त्यांची नावं. तुम्ही तरी आमच्या जागी असतात तर दुसरं काय केलं असतं हो ? नशीब–या बटकेला हे दोन्ही इसम इथं रुजवात करायला उभे नाहीत. नाही तऽऽर राव, एक ऐसा अफलातून तमाशा...

[तीव्र तावातावाने प्रवेशतात धटिंगण गुरुजी आणि मारोतराव. धटिंगण गुरुजींचे धोतर तारेत अडकून फाटल्यामुळे ते चुकचुकत धोतराची धस लागलेली जागा तपासीत येतात. वय साठीच्या आसपास, मुद्रा, अवतार बोलणेचालणे 'गुरुजी छाप' चालकासारखे. मारोतराव एकदम फिल्मी दिसतो. या दोघांना पाहून राजाला धसकाच बसतो. आणि...]

**राजा :** (कासावीस होत) धटिंगण गुरुजी ! मारोतराव ! ठार मेलो अरे नेमके सूड घेतल्यासारखे याच वेळी तुम्ही कसे उगवलात ?
**धटिंगण :** ध्याऽ ! पाहिलंत मारोतराव ? स्वागताची ह्यांची ही तऱ्हा. आता आमच्याच पायातलं खेटर काढा आणि हाणा आमच्या टाळक्यात, लावा धक्के मारून घरातून काढून.

**राजा :** सात.

**घटिंगण :** तुम्ही दोघंही उभयता प्रकृतीनं ठणठणीत, एकमेकांना अनुरूप–म्हणजे अगदी लक्ष्मीनारायणाचा जोडा. मग तुम्हांला मूल कसं नाही ? बोला, तुम्हांला मूल कसं नाही ? प्रश्नाचं उत्तर द्या.

**राजा :** हे विचारण्यासाठी कुंपणाची तार वर करून, कलमं तुडवून आलात गुरुजी ?

**मारोतराव :** ओफ–गुरुजी, तुम्ही ब्रह्मचारी आहात. भलभलते प्रश्न काय विचारताय ? तुम्हांला या या प्रांतातलं काही माहिती आहे का ?

**घटिंगण :** (कळवळत) अ हा हा ..

**राजा :** काय हो झालं गुरुजी ?

**घटिंगण :** यांनी एकदम खपकन् काळजावर वार केला. परिस्थितीमुळं आम्ही लग्न केलं नाही. आता वाटतं, चुकलं. अरे संसाराची लज्जत स्वतः आम्ही कधी चाखली नाही म्हणून काय झालं ? या पोरांच्या संसाराची लज्जत दुरून तरी पाहिलीय ?

[तोच गोरा वरून घमेल्यातून कौले घेऊन येतो. तशी–]

**राजा :** लज्जत दुरूनच पाहिलीत गुरुजी–संसाराचा हा हिसका नाही अनुभवलात.

**मारोतराव :** ओफ्–हा काय प्रकार ?

**गोरा :** हयी इक्ती कौलं साबण लाऊन धुवाया होवींत.

**घटिंगण :** कौलं ? साबण लावून धुवायला ? वारे बहाद्दर.

**राजा :** बहाद्दर तो नाही, ती आहे. ही आमच्या घरातली साप्ताहिक स्वच्छता. गोरा, अगोदर बाहेर जाऊन फाटकाचं कुलूप काढ बघू.

**गोरा :** बाईनला इच्चारल्याबिगर ?

**घटिंगण :** अरे जा ऽऽ. मोठा बाईंचा धाक घालतोय आम्हांला. जा तुझ्या बाईंना सांग–म्हणावं घटिंगण गुरुजी आले आहेत. पेलाभर गरम दूध साखर न घालता बाहेर पाठवा आणि अगोदर फाटक खोला.

[गोरा फणफणत पुटपुटत आत निघून जातो.]

तर राजाभाऊ, आज शुभमुहूर्तावर आम्ही तुमच्याकडं एका गोऽड कामासाठी आलो आहोत.

**राजा :** कसलं गोऽड काम काढलंत गुरुजी ?

**धटिंगण :** राजाभाऊ, तुम्ही एकूण निपुत्रिक आहात हे तर तुम्हांला कबूल आहे ?

**राजा :** हे गोड काम वाटतं ?

**धटिंगण :** हे काम नव्हे, ही प्रस्तावना. नसतात एकेकाच्या नशिबात एकेक सुखं, काऽय ? तेव्हां आम्ही असं ठरवलं की येत्या विजयादशमीला तुमची सुवर्णतुला करायची—आणि—

**राजा :** (किंचाळत) सुवर्णतुला ? माझी ?

**धटिंगण :** (लाडात) होऽ. आहांत कुठं—आणि तुमच्या नावानं मंचरला शाळा काढायची. कबूल ?

**राजा :** वा, वा खूर आहात की ! तुम्ही मला काय संस्थानिक समजलात का मंत्री ?

**धटिंगण :** ते ते आम्हांला सगळं ठाऊक आहे. राजाभाऊ, शपथ घेऊन सांगा—एक सिनेमा केला की मिळतात किती ?

**मारोतराव :** त्या आधी बुडतात किती, ते विचारा.

**राजा :** (टेबलाच्या खणातून पत्रांचा गठ्ठा बाहेर काढीत) आणि आमचे नातेवाईक आणि मित्र उकळतात किती ते ही पत्रं वाचा म्हणजे समजेल.

**धटिंगण :** काय आहे त्या पत्रांत ?

**राजा :** लग्नकार्य, मुंजी, आजारीपण, मुलांची शिक्षणं, कर्जफेड, घरदुरुस्ती, दगडमाती, मसण नि धोंडे. प्रत्येक पत्रवाला म्हणतो—तुम्हाला ना पोर ना बाळ. काय झालं दोन पैसे आमच्यासाठी खर्च केले म्हणून ?

**धटिंगण :** बरोबर. लोक असं म्हणायचेच. तुम्ही निपुत्रिक, तेव्हा लोकांचा तुमच्या पैशावर डोळा असायचा. एवढ्यासाठीच आम्ही म्हणतो आहोत की तुम्ही सुवर्णतुला करा आणि शाळा काढा.

**राजा :** असं कसं होईल गुरुजी ? अहो, माझा थोरला भाऊ व्यंकटराव महाडला पोस्टात काम करतो. त्याला चार मुलं आणि दोन मुली आहेत.

**घटिंगण :** असू द्यात की !

**राजा :** राणीची बहीण खोनूताई–तिचे यजमान दासोपंत तर जकातनाके कारकून आहेत भिवंडीला. त्यांना तर ओळीनं पाच मुली आणि दोन मुलं आहेत.

**घटिंगण :** (चुकचुकत) पण त्याला तुम्ही काय करणार ?

**राजा :** पत्र आलं की पैसे धाडणार. दुसरं बायकोच्या नवरा काय करू शकतो गुरुजी ?

**घटिंगण :** (तावातावाने) पण का ? का म्हणून ? संबंध काय ?

**राजा :** हे जरा आत जाऊन राणीला विचारा.

**घटिंगण :** (उठून आत जाऊ लागतो) विचारतोच की. मला भ्यायचं काय कारण ?

**मारोतराव :** ओफ्...जरा थांबा गुरुजी. आम्ही सध्या पिक्चर काढतो आहोत. राजाभाऊ त्यात पैसे गुंतवताहेत. शाळेबिळेला पैसे मिळायचे नाहीत.

**घटिंगण :** वा वा वा–पैसे यांचे आणि पिक्चरमध्ये गुंतवणारे तुम्ही कोण ?

**मारोतराव :** ओफ–मी तेच विचारतोय. पैसे यांचे आणि शाळा काढणारे तुम्ही हो कोण ?

**घटिंगण :** (उसळून) मी कोऽण ? जरा थांबा–दाखवतो मी कोण ते. (जाऊ लागतात.)

**राजा :** (त्यांना अडवत) कृपा करा आणि आज तरी हा विषय राणीपाशी काढू नका.

**घटिंगण :** का – का – का नको ?

**राजा :** (गडबडून) म्हणजे त्याचं काय झालंय, राणी थोडीशी रागावलीय.

**घटिंगण :** (खुलून) रागावलीय ? थोडीशी ? तुमच्यावर ? मग तर मला जाऊन भेटलंच पाहिजे. अरे, बायका नवऱ्यावर कशा रागावतात ते निदान दुरून तरी बघू द्या आम्हांला.

**राजा :** तसं नाही गुरुजी...मी काय म्हणतो...

**घटिंगण :** काही म्हणू नका. सगळं एकदम कळलंय आम्हांला. हे हे मोठं छान आहे बोवा, ते रुसणं न रडणं न रागावणं आणि मग महाराज चालताहेत

समजूत...म्हणताहेत, चुकलो चुकलो. काढताहेत नाकदुऱ्या (मारोतरावाच्या पाठीवर रंगात येऊन थाप मारीत) काय मारोतराव ?

**मारोतराव :** ओफ...आम्हांला रोज नाकदुऱ्या काढाव्या लागतात. नटयांच्या पुढं.

**राजा ;** तसला काही प्रकार नाही गुरुजी—माझं जरा ऐकून घ्या—

**धटिंगण :** तुम्ही बोलूच नका राजाभाऊ! राणीची समजूत घालून तिला घेऊन येतो बाहेर. बघा तर खरं या गुरुजींची करामत. [मधुराणी...अग...मुली... अशी हाक मारीत आत जातात..]

**राजा :** (प्रक्षुब्ध होऊन कोपरापासून हात जोडत) गुरू आहात झालं. सिनेमात मी पैसे गुंतविले आहेत हे या म्हाताऱ्यापाशी कशाला बडबडलात ? आता तो राणीपाशी काही बोलला म्हणजे ?

**मारोतराव :** ओफ...वहिनींना काही ठाऊक नाही अजून ?

**राजा :** ठाऊक नाही आणि ठाऊक होता कामा नये. कळलं ?

**मारोतराव ;** पण आमचे सगळे वांधे झालेत राजाभाऊ.

**राजा :** ( घाबरून ) क...काय भानगड झाली ?

**मारोतराव :** अजून पन्नास हजार हवेत कमीत कमी.

**राजा :** अरे पण माझ्या नावावर बँकेत आता एक पै शिल्लक नाही. सगळा पैसा ओतलाय मी प्रॉडक्शनमध्ये.

**मारोतराव :** ओफ–मग वहिनींना विचार. त्यांचा बँक बॅलन्स . ...

**राजा :** मेहेरबान तिला नुसतं कळलं जरी की, मी पिक्चरमध्ये पैसा गुंतवलाय तर ती मला फाशी देईल फाशी–आहे ठाऊक ?

**मारोतराव :** मग काय हातातोंडाशी आलेलं चित्र डब्यात पडू द्यायचं ?

**राजा :** पण डिस्ट्रिब्यूटर्स—

**मारोतराव :** डिस्ट्रिब्यूटर्स आता एक छदाम द्यायला तयार नाहीत. पाहा बोवा, ही वेळ निभावून नेली नाही तर तुमचे, माझे, सगळ्यांचे गुंतलेले पैसे देखील बुडतील.

**राजा :** ( कपाळावर हात मारून पटकन बसत ) इक मरली आणि या फंदात पडलो.

**मारोतराव :** ओफ...डोन्ट व्री विली. महिन्याभरात चित्र लागलं की धो धो पैसा यायला लागेल.

**राजा :** पण तोवर काय जीव गहाण टाकू ?

**मारोतराव :** जीव कशाला–हा बंगला गहाण टाकता येईल.

**राजा :** (किंचाळत उठत) बंगला ? गहाण टाकायचा ?

**मारोतराव :** बँकेकडे. फक्त महिन्यासाठी. पुन्हा या कानाचं त्या कानाला कळायचं नाही.

**राजा :** अरे पण—

**मारोतराव :** (पोर्टमँटो उघडून आतून काही फॉर्म्स काढून पुढे करीत) राजाभाऊ बंगला तुमच्या नावावर आहे, मला ठाऊक आहे. मी मॅनेजरजवळ बोलून आलोय. सगळं बिनबोभाट होईल.

**राजा :** ते शक्य दिसत नाही मारोतराव.

**मारोतराव :** थोडी हिम्मत केलीत तर सगळं शक्य होईल. नाहीतर सगळयां-च्याच गळयाला फास लागेल. अरे पिक्चर पुरं होऊन रिलीज होऊ दे.. ओफ ...मग आपण राजे आहोत राजे. विचार करा. उद्या सकाळी बारा वाजायच्या आत सही करून हे फॉर्म्स बँकेकडे जायला हवेत.

**राजा :** ( चिंताक्रांत ) बघतो.

**मारोतराव :** बराय येतो मी. बाय बाय...

[ मारोतराव जाऊ लागतो तोच आतून तावातावाने गुरुजी आणि पाठोपाठ मधुराणी प्रवेशतात. तशी राजशेखर टेबलावरले फॉर्म्स उचलून जिन्यातून वर सटकतो. ]

**घटिंगण :** ( मारोतरावाला ) थांबा मेहेरबान, तुम्हांला जाब विचारायचाय.

**मारोतराव :** ओफ–मलाऽ ?

**घटिंगण :** हो हो, तुम्हांलाच.

**मधुराणी :** पण मी म्हणते जाऊ दे ना गुरुजी.

**घटिंगण :** जाऊ दे कसं ? जाब विचारायलाच हवा. काय मेहेरबान, राजा-भाऊंचे तुम्ही स्वतःला मित्र म्हणवता आणि खुशाल त्यांची गावभर बदनामी करता ?

**मारोतराव :** (थक्क होत) मीऽऽ? या दोघांची बदनामी? ओफ!

**घटिंगण :** उगाच ओफ करू नका. मी म्हणतो नसेल या दोघांना मूल, अरे या का कोणाच्या हातच्या गोष्टी आहेत? तुमचा चेहरा असा बत्ताशासारखा का म्हणून तुम्हांला कोणी विचारलं तर?

**मारोतराव :** कबूल आहे की. पण...

**घटिंगण :** मघाशी तुम्ही आमच्या ब्रह्मचर्याचा आणि लग्नाचा देखील उल्लेख केलात, केलात की नाही?

**मारोतराव :** हो, पण...

**घटिंगण :** का म्हणून आमच्या दुःखावर डागण्या दिल्यात?

**मारोतराव :** चुकलं. वाटलं तर क्षमा मागतो मी तुमची.

**घटिंगण :** माझी नको. या मुलीची क्षमा मागा.

**मारोतराव :** पण कशासाठी?

**घटिंगण :** तुम्ही यांना 'निपुत्रिक' म्हणालात आणि हिच्या भावना दुखावल्या.

**मारोतराव :** मी यांना 'निपुत्रिक' म्हणालो? वा!

**घटिंगण :** चक्क कानांनी ऐकलंय मी माझ्या...

**मारोतराव :** मेहेरबान, बोलल्लात तुम्ही, मी नव्हे.

**घटिंगण :** खोटारडेपणाची हद्द झाली.

**मारोतराव :** गुरुजी, कुटुंबनियोजनाबद्दल कोण बोललं?

**घटिंगण :** (ओरडून) मी...मी...मी बोलो...? चांडाळा, खरं बोल, खरं बोल.

**मारोतराव :** 'तुम्ही निपुत्रिक आहात हे तर कबूल' असं कोणी विचारलं. राजाभाऊंना?

**घटिंगण :** अरे, किडे पडतील तुझ्या तोंडात...खरं बोल...खरं बोल...खरं बोल.

**मारोतराव :** (प्रेक्षकाकडे बोट दाखवीत) ही मंडळी साक्षीला आहेत. विचारा यांना.

**घटिंगण :** विचारा, विचारा त्यांना, काय हो मंडळी, मी चुकून तरी 'निपुत्रिक' हा शब्द तोंडावाटे काढला होता? शप्पथ आहे तुम्हांला विद्येची.

खोटं बोलाल तर पुढल्या जन्मी ठोंबे व्हाल बरं ठोंबे (कदाचित प्रेक्षक 'हो हो' बोलला होता असं म्हणाले अथवा न म्हणाले तरी–) बस बस बस. काही बोलू नका. तुम्ही आता त्याची बाजू घेणार. सिनेमावाला आहे ना तो? मास्तरापरीस सिनेमावालाच तुम्हाला अधिक प्यार.

**मधुराणी :** पण गुरुजी, तुम्हांला कोणी रुजवात करायला सांगितलीय का?

**घटिंगण :** (प्रेक्षकांना तंबी भरीत) आणि समजा मी बोललो असतो तर तुम्ही मला कोण विचारणार? मी त्यांचा हितचिंतक आहे. या राजाभाऊंना दिडकी मिळत नव्हती, तेव्हा मी त्यांना शाळेत लावून घेतलाय, ठाऊक आहे? तुम्ही कुठे होतात त्या वेळी?

**मधुराणी :** अहो, अहो, पण त्यांना का फैलावर घेताहात उगीच. ते बिचारे निमूटपणे बसले आहेत.

**घटिंगण :** मी स्वच्छ तोंडावर बोलणारा माणूस आहे. कसे चुपचाप बसले आहेत आता.

**मारोतराव :** (सणक उठून) ओफ ..

**घटिंगण :** (गुरगुरत) ओफ...

[तोच गोरा बाहेरून ओरडत ओरडत धावत दाराशी येतो. "बाईसाहेब, ...पगा पगा तरी योकदा...समदी गुलाबाची कलमं तुडवूनशान टाकली..." त्याच वेळी राजाही जिन्यात येऊन थबकतो.]

**मधुराणी :** (धक्का बसून उठून किंचाळत, धावत बाहेर जात) अगबाई ग ... कोण, कोण तो चांडाळ...सापडू दे तरी मेल्याला...जळक्या लाकडानंच ठेचते.

[राणी बाहेर धावते. पाठोपाठ मारोतरावही सटकतात. राजा जिन्यातून खाली येतो. एव्हाना गुरुजींची पाचावर धारण बसली आहे.]

**घटिंगण :** (लटपट कापून) राजाभाऊ...आता होऽऽ?

**राजा :** आता काय? गुरुजी पळा, मागल्या दारानं पळा आधी...

**घटिंगण :** (गडबडीने दाराशी ठेवलेल्या चपला उचलून मागील दाराकडे जात) प...प...पण ते सुवर्णतुलेचं ध्यानात असू द्या...

**राजा :** शिर सलामत तो पगडी पचास...आधी पळा...

[ त्यावरीने पसार होतात. राजा पुढे होऊन प्रेक्षकांना म्हणतो– ]

आता आळीमिळी गुपचिळी, बरं का मंडळी. समर्थवचन ध्यानी ठेवा– महापुरे झाडे जाती, तेथे तुमच्या आमच्यासारखी लव्हाळी वाचती.

[ तोच राणी "राऽज..." म्हणून कळवळून हंबरडा फोडून, मोडलेली, चिरडलेली गुलाबाची कलमे हातात घेऊन आत धावत येते आणि– ]

**मधुराणी :** (संतापाने थरथरत) राजा...बघा, बघा सगळी कलमं मेल्यानं तुडवली चिरडली, ठार मारली. कुठं आहे, कुठं आहे तो ?
**राजा :** राणी राणी, राणी–पण त्यांनी मुद्दाम पाय दिला का ?
**मधुराणी :** पण तिथं जाऊन कशाला तडफडले ? तुमचे मित्रच सगळे असले. मेल्यांना रीतभात कशी ती नाहीच.
**राजा :** शांत हो...शांत हो राणी.
**मधुराणी :** ( मोडलेली कलमे घेऊन तरातरा पुढे येत प्रेक्षकांना दाखवून ) यांचे मित्रच सगळे असले. मेल्यांना रीतभात कशी ती नाही.

> **अहो, तुम्ही माहेरचे म्हणून सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.**
> **पुन्हा येऊ दे तर मेल्याला धरी. बघा मी लाटण्यानं त्याला ठेचीन**
> **अन् ज्या पायानं माझी कलमं तुडवली, ती तंगडीच मोडून टाकीन.**
> **नळ्ळं मेल्यांचं लक्षण, पाहा हो सगळी कोवळी पानं तोडली**
> **आणि चांडाळानं खुशाल पायाखाली मानच की यांची मोडली.**
> **मी मरमर मरते नि बाग फुलविते, पण आहे का यांना त्याचं काही ?**
> **अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही**
>
> **एक एक लडदू यतात, बागेत घुसतात, हक्कानं फुलं तोडतात**
> **अन् आमचे 'हे' तर मोठ्या तोंडानं 'घ्या आणखीन घ्या' म्हणतात.**
> **अहो शेजारची माणसं तर असली द्वाड बाई केळीचं पान मागतात**
> **आणि नजर चुकवून कच्चे पेरू नि चिक्कू तोडून नेतात.**

पुन्हा मी बोलले तर होते वाईट, पण आहे का यांना त्याचं काही ?
अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.

किनई आवडतो मला गुलाब ही कलमं संभाळून आणली
आणि कुंपण घालून एका कोपऱ्यात हौसेनं की हो मी लावली.
फुलं म्हणजे मुलंच माझी, कित्ती सांगू त्यांना जपलं,
पण दांडगेश्वर हे घटिंगण मेलं तिथ्थं जाऊन कडमडलं
माझा जीव कळवळला, तडफडला, तरी आहे का यांना त्याचं काही ?
अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.

[ राणी हताशपणे टीपॉयवर कलमे टाकते तशी राजा प्रेक्षकाकडे पाहात मिस्कीलपणे गुणगुणतो—

अहो या गोजिरवाण्या घरात, माणसांना लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की—

'हा हा हा, पुढचं नाही म्हणायचं' तशी— ]

**राणी** : ( भडकून ) का ? का नाही म्हणायचं ? काय आहे पुढं ?
**राजा** : ( प्रेक्षकांचा निर्देश करीत ) ते यांचं आमचं सीक्रेट आहे एक.
**राणी** : डोंबल तुमचं. द्या आत्ताच्या आत्ता माझी कलमं जिवंत करून.
**राजा** : जरा थांब. "संजीवनी विद्या घेऊन तावडतोब निघा" म्हणून शुक्राचार्यांना तार ठोकायला पळालेत घटिंगण गुरुजी मागल्या दारानं.
**राणी** : ( लहान मुलाला दटवावे तसे ) फाजील. कान धरू का ?
**राजा** : ( चटकन दूर होत ) अग, अग, अग, ही मंडळी आहेत इथं.

[ भानावर येऊन राणी लाजते. तशी— ]

हे हे 'वात्सल्य' चार चौघांत नको.
**राणी** : तुम्हांला सगळी चेष्टाच वाटते.
**राजा** : राणी, आम्ही सगळे तुझ्या दुःखात सहभागी आहोत, पण हे इतकं गाढ वृक्षवात्सल्य काही खरं नाही.

**राणी :** खरं नाही ?

**राजा :** खरं नाही म्हणजे तसं खरं असेल ग—पण एकूण बरं नाही.

**राणी :** मग काय तुमच्यासारखी आळीतली पोरं गोळा करून खेळत बसू ?

**राजा :** तेही खरं नाही आणि बरं नाही. मला असं वाटायला लागलंय की, आपण आपल्या नात्यातलंच एखादं गोजिरवाणं मूल आणावं आणि सांभाळावं.

**राणी :** (खुलून) खरंच तुम्हांला असं वाटतं ?

**राजा :** (आत्मविश्वास येऊन) वाटतं म्हणजे ? त्र्यंकट आता आला की ठणकावून मी त्याला म्हणणार आहे- तुला एवढी सहा मुलं करायची आहेत काय ? टाक तुझी बेबी आम्हाला देऊन. अरे काय झकास आहे पोरगी. एकदम चंट—

**राणी :** (नाक मुरडून) इश्श ऽऽ, बेबी कशाला ? तुम्हा तांब्यांची माणसं एकापेक्षा एक काळीकुट्ट. आमच्या सोनूताईची मुलं कशी गोरी गोरी पान नक्षत्रासारखी आहेत. मी सांगणार आहे तिला की तुझा गोट्या ठेवून जा माझ्याकडे. किती गोड आहे म्हणून सांगू ?

**राजा :** (नाक फेंदारीत) हॅ हॅ हॅ. त्या गोट्याफिट्यात काही दम नाही. काळी असली तरी बेबी मिरची आहे मिरची. बेबीलाच ठेवून घ्यायचं.

**राणी :** नाही, नाही नाऽही. मूल घरात ठेवायचं असेल तर सोनूताईच्या गोट्यालाच. मी सांभाळीन. कळलं ?

**राजा :** काढलंस पुन्हा भांडण उकरून ?

**राणी :** भांडणारे तुम्हीच. मूल मला संभाळायचंय. तेव्हा माझाच शब्द खरा झाला पाहिजे.

**राजा :** थांब थांब (खिशातून नाणे काढीत) आपण ओळी सुकी करू या. हूं बोल...

**राणी :** अहाहा— शहाणेच आहात, तसलं काहीएक चालायचं नाही.

**राजा :** तर मग (प्रेक्षकांचा निर्देश करीत) आपण या मंडळींना लवाद नेमू या.

**राणी :** काही लवाद नको अन् फिवाद नको. आज सोनूताई आली की

[ तोच बाहेर मुलांचा प्रचंड गलबला ऐकू येतो. तशी मधुराणी रागारागाने दाराकडे धावून जात— ]

पुन्हा आली वाटतं तुमची घुतावळ. गोरा अरे...(दाराशी जाऊन बघते आणि व्हरांडयातूनच ओरडते–) अगबाई? अहो, अहो ऽऽ कोण कोण आलंय ते पाहिलंत तरी का?

**राजा :** (कोचावर मटकन बसत) सोनूताई आणि मंडळी. दुसरं कोण येणार!

**राणी :** ती तर झालीच. पण व्यंकटभावोजी, तिलोत्तमा वहिनी, आणि मुलं देखील दिसताहेत बरोबर...(लगबगीने बाहेर जाते.)

**राजा :** (चक्रावून) आ ऽऽ? (बोटं घालून मोजीत) म्हणजे यांची सहा आणि त्यांची सात, सहा आणि सात तेरा, हे दोघे नि ते दोघे मिळून सतरा, अधिक आम्ही दोघे मिळून एकोणीस आणि गोरा...वीस. बोला पुंडलीक वर दे हारी विठ्ठल.

[उठून लगबगीने दाराशी जातो. तोच गोरा भराभर पेट्या, ट्रंका, बळकट्या, करंड्या, भांड्यांचे पोते आणि गाठोडी आणून टाकतो. त्याच वेळी मोठमोठी बोचकी घेऊन, प्रथम व्यंकटराव आणि मग दासोपंत येतात. पाठोपाठ हलके फुलके सामान घेऊन प्रथम तिलोत्तमावहिनी मग सोनूबाई आणि शेवटी मधुराणी येतात. रंगमंच सामानानेच भरून जातो. राजा क्षणभर स्तंभित होऊन नुसता बघत राहातो, मग पाहुणे आत येतात तशी एकेकाचे नाव घेऊन 'या या' म्हणून स्वागत करतो. दरम्यान बाहेर मुलांचा गोंगाट वाढतच आहे. बाग पाहिल्यावर मुलेमुली आत यायलाच तयार नाहीत. 'अरे चिंचा–मन्या चिंचा' 'अय्या ऽऽ कित्ती आवळे लागले?' ... 'ए मावशी, मी सगळे चिक्कू तोडू?' 'ए काकू, मी सगळी फुलं तोडणार.' 'भाँऽआई ग या नंदिल्यानं बेबीला मारलं –' 'नाही ग आई, बेबीनंच मला ओरबाडलं' 'ऽऽ बाबा हा शाम्या झाडावर चढतोय बघा'...'यमे, अग, झाड उपटून काय बघतेस?' इत्यादी दरम्यान महिला मंडळी तडक आत जातात आणि दासोपंत कोट काढून पुतळ्यावर अडकवीत– 'हुश्शऽओ हो हो हो – काय गाडीला गर्दी, ' म्हणत आत जातात. त्यावर व्यंकटराव आपला कोट एका तसबिरीवर लावीत 'ते काही विचारू नका. कुठं तडफडायला एवढी माणसं जातात नि येतात काही कळत नाही,' असं उत्तर देत आत जातात. रंगमंचावर उरतो फक्त सामानाचा ढिगारा आणि

एकदम राजाला हसू फुटते. पोट धरधरून हसताहसता राजा प्रेक्षकांपुढे येत म्हणतो...]

**राजा :** एऽऽश्शीऽऽ. कशी खोड मोडली या घराची. दोस्त, तुम्ही गांगरून जाऊन पळ काढू नका होऽ. अहो, तुम्ही अजून काय पाहिलं आहे ? आमच्या संसाराचा हा पहिला अंक आहे पहिला. ही सहकुटुंब, सहपरिवार पाहुणेमंडळी कशासाठी इथं अवतीर्ण झाली आहेत सांगू ? हे तुमच्या आमच्यांत बरं का– अगदी टॉप सीक्रेट—

**अहो या गोजिरवाण्या घरात माणसांना लागलंय खूळ**
**यातली गोम अशी आहे की आम्हांला नाही मूल.**

( तोच...पडदा... )

म. श्री. सं. ..., वाचनालय ...

खोटं बोलाल तर पुढल्या जन्मी ठोंबे व्हाल बरं ठोंबे (कदाचित प्रेक्षक 'हो हो' बोलला होता असं म्हणाले अथवा न म्हणाले तरी–) बस बस बस. काही बोलू नका. तुम्ही आता त्याची बाजू घेणार. सिनेमावाला आहे ना तो? मास्तरापरीस सिनेमावालाच तुम्हाला अधिक प्यार.

**मधुराणी :** पण गुरुजी, तुम्हांला कोणी रुजवात करायला सांगितलीय का?

**घटिंगण :** (प्रेक्षकांना तंबी भरीत) आणि समजा मी बोलली असतो तर तुम्ही मला कोण विचारणार? मी त्यांचा हितचिंतक आहे. या राजाभाऊंना दिडकी मिळत नव्हती, तेव्हा मी त्यांना शाळेत लावून घेतलाय, ठाऊक आहे? तुम्ही कुठे होतात त्या वेळी?

**मधुराणी :** अहो, अहो, पण त्यांना का फैलावर घेताहात उगीच. ते बिचारे निमूटपणे बसले आहेत.

**घटिंगण :** मी स्वच्छ तोंडावर बोलणारा माणूस आहे. कसे चुपचाप बसले आहेत आता.

**मारोतराव :** (सणक उठून) ओफ ..

**घटिंगण :** (गुरगुरत) ओफ...

[तोच गोरा बाहेरून ओरडत ओरडत धावत दाराशी येतो. "बाईसाहेब, ...पगा पगा तरी योकदा...समदी गुलाबाची कलमं तुडवूनशान टाकली..." त्याच वेळी राजाही जिन्यात येऊन थबकतो.]

**मधुराणी :** (धक्का बसून उठून किंचाळत, धावत बाहेर जात) अगबाई ग ... कोण, कोण तो चांडाळ...सापडू दे तरी मेल्याला...जळक्या लाकडानंच ठेचते.

[राणी बाहेर धावते. पाठोपाठ मारोतरावही सटकतात. राजा जिन्यातून खाली येतो. एव्हाना गुरुजींची पाचावर धारण बसली आहे.]

**घटिंगण :** (लटपट कापून) राजाभाऊ...आता होऽऽ?

**राजा :** आता काय? गुरुजी पळा, मागल्या दारानं पळा आधी...

**घटिंगण :** (गडबडीने दाराशी ठेवलेल्या चपला उचलून मागील दाराकडे जात) प...प...पण ते सुवर्णतुलेचं ध्यानात असू द्या...

**राजा :** शिर सलामत तो पगडी पचास...आधी पळा...

[ लगबगीने पसार होतात. राजा पुढे होऊन प्रेक्षकांना म्हणतो– ]

आता आळीमिळी गुपचिळी, बरं का मंडळी. समर्थवचन ध्यानी ठेवा– महापुरे झाडे जाती, तेथे तुमच्या आमच्यासारखी लव्हाळी वाचती.

[ तोच राणी "राऽज..." म्हणून कळवळून हंबरडा फोडून, मोडलेली, चिरडलेली गुलाबाची कलमे हातात घेऊन आत धावत येते आणि– ]

**मधुराणी :** (संतापाने थरथरत) राजा...बघा, बघा सगळी कलमं मेल्यानं तुडवली चिरडली, ठार मारली. कुठं आहे, कुठं आहे तो ?
**राजा :** राणी राणी, राणी–पण त्यांनी मुद्दाम पाय दिला का ?
**मधुराणी :** पण तिथं जाऊन कशाला तडफडले ? तुमचे मित्रच सगळे असले. मेल्यांना रीतभात कशी ती नाहीच.
**राजा :** शांत हो...शांत हो राणी.
**मधुराणी :** ( मोडलेली कलमे घेऊन तरातरा पुढे येत प्रेक्षकांना दाखवून ) यांचे मित्रच सगळे असले. मेल्यांना रीतभात कशी ती नाही.

अहो, तुम्ही माहेरचे म्हणून सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.
पुन्हा येऊ दे तर मेल्याला धरी; बघा मी लाटण्यानं त्याला ठेचीन
अन् ज्या पायानं माझी कलमं तुडवली, ती तंगडीच मोडून टाकीन.
नळं मेल्यांचं लक्षण, पाहा हो सगळी कोवळी पानं तोडली
आणि चांडाळानं खुशाल पायाखाली मानच की यांची मोडली.
मी मरमर मरते नि बाग फुलविते, पण आहे का यांना त्याचं काही ?
अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही

एक एक लडदू यतात, बागेत घुसतात, हक्कानं फुलं तोडतात
अन् आमचे 'हे' तर मोठ्या तोंडानं 'घ्या आणखीन घ्या' म्हणतात.
अहो शेजारची माणसं तर असली द्वाड बाई केळीचं पान मागतात
आणि नजर चुकवून कच्चे पेरू नि चिक्कू तोडून नेतात.

तुम्हा मी बोलले तर होते वाईट, पण आहे का यांना त्याचं काही ?
अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.

किनई आवडतो मला गुलाब ही कलमं संभाळून आणली
आणि कुंपण घालून एका कोपऱ्यात हौसेनं की हो मी लावली.
फुलं म्हणजे मुलंच माझी, किती सांगू त्यांना जपलं,
पण दांडगेश्वर हे धटिंगण मेलं तिथं जाऊन कडमडलं
माझा जीव कळवळला, तडफडला, तरी आहे का यांना त्याचं काही ?
अहो तुम्ही माहेरचे म्हणूनच सांगते, बाई यांना माणसाची पारखच नाही.

[ राणी हताशपणे टीपॉयवर कलमे टाकते तशी राजा प्रेक्षकाकडे पाहात मिस्कीलपणे गुणगुणतो—

अहो या गोजिरवाण्या घरात, माणसांना लागलंय खूळ
यातली गोम अशी आहे की—

'हा हा हा, पुढचं नाही म्हणायचं' तशी– ]

**राणी :** (भडकून) का ? का नाही म्हणायचं ? काय आहे पुढं ?
**राजा :** (प्रेक्षकांचा निर्देश करीत) ते यांचं आमचं सीक्रेट आहे एक.
**राणी :** डोंबल तुमचं. ह्या आत्ताच्या आत्ता माझी कलमं जिवंत करून.
**राजा :** जरा थांब. "संजीवनी विद्या घेऊन ताबडतोब निघा" म्हणून शुक्राचार्यांना तार ठोकायला पळालेत धटिंगण गुरुजी मागल्या दारानं.
**राणी :** (लहान मुलाला दटवावे तसे) फाजील. कान धरू का ?
**राजा :** (चटकन दूर होत) अग, अग, अग, ही मंडळी आहेत इथं.

[ भानावर येऊन राणी लाजते. तशी– ]

हे हे 'वात्सल्य' चार चौघांत नको.
**राणी :** तुम्हांला सगळी चेष्टाच वाटते.
**राजा :** राणी, आम्ही सगळे तुझ्या दुःखात सहभागी आहोत, पण हे इतकं गाढ वृक्षवात्सल्य काही खरं नाही.

**राणी :** खरं नाही ?

**राजा :** खरं नाही म्हणजे तसं खरं असेल ग–पण एकूण बरं नाही.

**राणी :** मग काय तुमच्यासारखी आळीतली पोरं गोळा करून खेळत बसू ?

**राजा :** तेही खरं नाही आणि बरं नाही. मला असं वाटायला लागलंय की, आपण आपल्या नात्यातलंच एखादं गोजिरवाणं मूल आणावं आणि सांभाळावं.

**राणी :** (खुलून) खरंच तुम्हांला असं वाटतं ?

**राजा :** (आत्मविश्वास येऊन) वाटतं म्हणजे ? त्र्यंकट आता आला की ठणकावून मी त्याला म्हणणार आहे- तुला एवढी सहा मुलं करायची आहेत काय ? टाक तुझी बेबी आम्हाला देऊन. अरे काय झकास आहे पोरगी. एकदम चंट—

**राणी :** (नाक मुरडून) इश्श ऽऽ, बेबी कशाला ? तुम्हा तांब्यांची माणसं एकापेक्षा एक काळीकुट्ट. आमच्या सोनूताईची मुलं कशी गोरी गोरी पान नक्षत्रासारखी आहेत. मी सांगणार आहे तिला की तुझा गोट्या ठेवून जा माझ्याकडे. किती गोड आहे म्हणून सांगू ?

**राजा :** (नाक फेंदारीत) हॅ हॅ हॅ. त्या गोट्याफिट्यात काही दम नाही. काळी असली तरी बेबी मिरची आहे मिरची. बेबीलाच ठेवून घ्यायचं.

**राणी :** नाही, नाही नाऽही. मूल घरात ठेवायचं असेल तर सोनूताईच्या गोट्यालाच. मी सांभाळीन. कळलं ?

**राजा :** काढलंस पुन्हा भांडण उकरून ?

**राणी :** भांडणारे तुम्हीच. मूल मला संभाळायचंय. तेव्हा माझाच शब्द खरा झाला पाहिजे.

**राजा :** थांब थांब (खिशातून नाणे काढीत) आपण ओळी सुकी करू या. हूं बोल...

**राणी :** अहाहा– शहाणेच आहात, तसलं काहीएक चालायचं नाही.

**राजा :** तर मग (प्रेक्षकांचा निर्देश करीत) आपण या मंडळींना लवाद नेमू या.

**राणी :** काही लवाद नको अन् फिवाद नको. आज सोनूताई आली की

[ तोच बाहेर मुलांचा प्रचंड गलबला ऐकू येतो. तशी मधुराणी रागारागाने दाराकडे धावून जात– ]

पुन्हा आली वाटतं तुमची भुतावळ. गोरा अरे...(दाराशी जाऊन बघते आणि व्हरांड्यातूनच ओरडते–) अगबाई? अहो, अहो ऽऽ कोण कोण आलंय ते पाहिलंत तरी का?

**राजा :** (कोचावर मटकन बसत) सोनूताई आणि मंडळी. दुसरं कोण येणार!

**राणी :** ती तर झालीच. पण व्यंकटभावोजी, तिलोत्तमा वहिनी, आणि मुलं देखील दिसताहेत बरोबर...(लगबगीने बाहेर जाते.)

**राजा :** (चक्रावून) आ ऽऽ? (बोटं घालून मोजीत) म्हणजे यांची सहा आणि त्यांची सात, सहा आणि सात तेरा, हे दोघे नि ते दोघे मिळून सतरा, अधिक आम्ही दोघे मिळून एकोणीस आणि गोरा...वीस. बोला पुंडलीक वर दे हारी विठ्ठल.

[उठून लगबगीने दाराशी जातो. तोच गोरा भराभर पेट्या, ट्रंका, वळकट्या, करंड्या, भांड्यांचे पोते आणि गाठोडी आणून टाकतो. त्याच वेळी मोठमोठी बोचकी घेऊन, प्रथम व्यंकटराव आणि मग दासोपंत येतात. पाठोपाठ हलके फुलके सामान घेऊन प्रथम तिलोत्तमावहिनी मग सोनूबाई आणि शेवटी मधुराणी येतात. रंगमंच सामानानेच भरून जातो. राजा क्षणभर स्तंभित होऊन नुसता बघत राहातो, मग पाहुणे आत येतात तशी एकेकाचे नाव घेऊन 'या या' म्हणून स्वागत करतो. दरम्यान बाहेर मुलांचा गोंगाट वाढतच आहे. बाग पाहिल्यावर मुलेमुली आत यायलाच तयार नाहीत. 'अरे चिंचा–मन्या चिंचा' 'अय्या ऽऽ किती आवळे लागले?' ... 'ए मावशी, मी सगळे चिक्कू तोडू?' 'ए काकू, मी सगळी फुलं तोडणार.' 'भॉंऽआई ग या नंदिल्यानं बेबीला मारलं –' 'नाही ग आई, बेबीनंच मला ओरबाडलं' 'ऽऽ बाबा हा शाम्या झाडावर चढतोय बघा'...'यमे, अग, झाड उपटून काय बघतेस?' इत्यादी दरम्यान महिला मंडळी तडक आत जातात आणि दासोपंत कोट काढून पुतळ्यावर अडकवीत– 'हुश्शऽओ हो हो हो–काय गाडीला गर्दी,' म्हणत आत जातात. त्यावर व्यंकटराव आपला कोट एका तसबिरीवर लावीत 'ते काही विचारू नका. कुठं तडफडायला एवढी माणसं जातात नि येतात काही कळत नाही,' असं उत्तर देत आत जातात. रंगमंचावर उरतो फक्त सामानाचा ढिगारा आणि

एकदम राजाला हसू फुटते. पोट धरधरून हसताहसता राजा प्रेक्षकांपुढे येत म्हणतो...]

**राजा :** एSSश्शीSS. कशी खोड मोडली या घराची. दोस्त, तुम्ही गांगरून जाऊन पळ काढू नका होS. अहो, तुम्ही अजून काय पाहिलं आहे ? आमच्या संसाराचा हा पहिला अंक आहे पहिला. ही सहकुटुंब, सहपरिवार पाहुणेमंडळी कशासाठी इथं अवतीर्ण झाली आहेत सांगू ? हे तुमच्या आमच्यांत बरं का— अगदी टॉप सीक्रेट—

> अहो या गोजिरवाण्या घरात माणसांना लागलंय खूळ
> यातली गोम अशी आहे की आम्हांला नाही मूल.

( तोच...पडदा... )

# अंक दुसरा

[मागील अंकात पाहिला होता तोच हॉल. पण महिनाभराच्या कालांतराने घरातल्या पाहुणेमंडळींनी आणि बाळगोपाळांनी या दालनातील स्वच्छतेची टापटिपीची आणि सौंदर्यदृष्टीची पार वाट लावून टाकलेली दिसते आहे. जागोजाग खडूच्या रेघोट्या ओढलेल्या आहेत. शोकेसमधील बहुतेक चिजा परागंदा झाल्या आहेत. सोफ्याच्या बॅक कव्हर्सचा पत्ता नाही. दाराच्या पडद्यांची येता–जाता प्रत्येकाने ओढाताण केल्याने आणि हातपाय तोंड पुसल्याने पोतेरी झाली आहेत. पाहुणे मंडळींचे हरतऱ्हेचे कपडे अडकणे शक्य आहे त्या जागी लोंबकळताहेत. एक पंचा तर थेट हॉलमधल्या नर्तकीच्या पुतळ्याच्या सर्वांगावर पसरून वाळतो आहे. घरातल्या रक्षापात्राचा उपयोग करायचा नाही, तंबाखूच्या पिचकाऱ्या खिडकीतूनच टाकायच्या आणि चुन्याची वा तपकिरीची बोटे सोफ्यालाच पुसायची असा पण केल्यागत पाहुणे या घरात अंमळ हक्कानेच नांदत असावेत. त्याच्याही खुणा जागजागी दिसताहेत.

सायंकाळची वेळ. पडदा वर जातो त्यावेळी दासोपंत वाघमारे एका कोचावर प्रशस्तपणे रेलून समोरच्या टीपॉयवर पाय ताणाऊन डुलकी घेत असलेले दिसतात. छोट्याशा डुलकीत ते तऱ्हेतऱ्हेचे सूर लावून घोरताहेत. त्याचवेळी मागील दारी बालगोपाळमंडळी खच्चून ओरडून बेपासूनचे पाढे म्हणताहेत. हे बालगोपाळ अर्थात वाघमाऱ्यांचे तांव्यांची बालकमंडळी

मनाचे श्लोक म्हणण्यात मनापासून दंग झाली आहेत. या संमिश्र कोलाहलाच्या पार्श्वसंगीताचा सूर धरून दासोपंतांच्या अर्धांगी—सौ. सोनूताई—'शुभंकरोति कल्याणम्..' इत्यादी म्हणत तरातरा प्रवेशतात आणि जागजागी अडकविलेल्या वा खाली पसरलेल्या कपड्यामधून आपल्या यजमानांचे व मुलांचे तेवढे कपडे निवडून काढून त्यांच्या घड्या करू लागततात. 'शुभं करोति' संपवून सोनूताई जशा 'शांताकारं भुजगशयनं' ला प्रारंभ करतात तसे त्यांचे लक्ष टीपॉयवर पसरलेल्या आपल्या यजमानांच्या पयांकडे जाते. त्याबरोबर त्या कपाळाला आठ्या घालीत तरातरा दासोपंताजवळ येतात आणि स्तोत्रात जोडून घेत खेकसतात 'शांताकारं भुजगशयनं—पाय खाली ठेवा—पद्मनाभं सुरेशं, विश्वाधारं गगनसदृशं—पाय म्हणतेय मी—पाय खाली ठेवा—मेघवर्णं शुभांगम्—'

दासोपंत झोपेतच '... आं . ॐ' करीत पाय दुमडत पोटाशी घेतात, तशी सोनूताई रागारागात त्यांचे पाय ओढून जमिनीवर आदळीत ओरडतात, 'लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम्...'

जमिनीवरले पाय पुन्हा दासोपंत टीपॉयवर ठेवतात तशी सोनूताईंचा संताप कडेलोटाला पोचून यजमानांच्या पायाला जोराचा चिमटा काढीत त्या कडाडतात - 'वंदे विष्णुं भवभय हरं सर्व लोकैकनाथम्—'

चिमटा काढताच दासोपंत कळवळून जागे होतात आणि — ]

**दासोपंत :** (किंचाळत) मेलो. हळू हळू मंडळी हळू. केवढ्यांदा चिमटा काढलात ?

**सोनूताई :** (बसक्या आवाजात दम भरीत) तर काय ! सुचवलं तरी लक्षात ध्यायचं नाही. नीट बसा. सावरूऽऽन. पाय खाली ठेवा. मधुराणीच्या घरी आहात तुम्ही—मिलवडीला तुमच्या जकात नाक्यावर नाही.

**दासोपंत :** (सावरून बसत) कळलं की ! (रागारागाने तपकिरीची डबी चाचपीत) चार दिवस विश्रांतीसाठी आलो तरी इथं फौजदारी आहेच. पुढल्या रजेला आता कोकणात चालता होतो—होऽ, एकटाऽऽ (तपकीर ठोसून कोचाला बोटे पुसणार तोच-)

**सोनूताई :** (लगबगीने रुमाल घेऊन पुढे होत) हां हां हांऽ रुमालाला बोटे पुसा. पुन्हा तपकिरीची बोटं कोचाबिचाला पुसाल तर खबरदार.

**दासोपंत** : ( रुमाल वेत घुश्शात ) व्यंकटरावांनी चुन्याची बोटं कोन्हाला पुसली तर बाल्तात वाटतं ?

**सोनूताई** : ( दरडावून ) त्याच्याशी तुम्हांला काय करायचंय ?

**दासोपंत** : ( रुमालात मोठ्ठी शिंक देतं ) राहिलं ऽऽ

**सोनूताई** : ( पुन्हा आवराआवर करू लागत ) आपण इथं काय योजून आलो होतो त्याचा तुम्हांला अगदी विसर पडलाय.

**दासोपंत** : ( मान मागे टाकीत ) काऽऽही विसर पडला नाही. खटपट चालू आहे – चालू आहे – मंडळी, तुम्ही जऽरा दमानं ध्या...

**सोनूताई** : ( उसळून ) डोंबल तुमचं. लढाई हरली, राज्य गेलं तरी तुम्ही नुसते दमच खात बसा. अहो त्यांनी आपली बेन्नी या घरात घातली, घुसविली, अगदी चिटकवून पक्की देखील केली.

**दासोपंत** : हॅ हॅ...काय वेड ? मग आम्ही डिंकाच्या बाटल्या घेऊन बसलो आहोत कशासाठी ? मंडळी, चिंता करू नका. या घरात चिकटणार आपला गोट्याच.

**सोनूताई** : उजेड. मी आपली धडपडतेय, माझ्या परीनं सगळे उपाय करतेय, पण तुम्ही–( सहजगत्या नर्तकीच्या पुतळ्यावरील पंचा काढतात तशी कोणीतरी शाईने पुतळ्याला शिंदेशाही कल्लेदार मिशा काढून ठेवलेल्या त्यांना दिसतात. तशी सोनूताई विंचू डसावा तशा किंचाळत मागे सरतात आणि– ) ईऽऽ अग्गोबाईऽऽ

हे काऽऽय ?

**दासोपंत** : ( थंडपणे डोळे मिटल्या मिटल्याच ) काय झालंऽऽ ?

**सोनूताई** : ( ओरडत ) या मिशा कोणी काढल्या ?

**दासोपंत** : ( बावचळून ताडकन सावरून बसत ) मिशाऽऽऽ ? काढल्या ? ( चटकन हातांनी स्वतःच्या मिशा घाईघाईने चाचपून बघत ) भलतीच चेष्टा कसली मंडळी ? या...या काय ? मिशा जागेवर तर आहेत !

**सोनूताई** : ( चिडून ) धोत्राबिन्ना प्यालात का काय ? तुमच्या मिशा नाही– या पुतळ्याला मिशा कोणी काढल्या ते विचारतेय मी.

**दासोपंत** : ( प्रथमच पुतळ्याकडे बसल्या बसल्याच टवकारून बघत ) आंऽऽ ? अरेऽऽच्या ? असं आहे का ? मंडळी, घाबरायला नको, हे काम आपल्या नंद्याचं.

**सोनूताई :** ( उसळून ) काय बडबडताहात काय ?

**दासोपंत :** पोराच्या ड्राईंगचं तुम्ही आजवर कौतुक केलंत – घ्या आता. हरामजाद्यानं घरातलं एक कॅलेंडर देखील चितडायचं बाकी ठेवलं नाही. बाई पाहिली नाही पुढारी मानला नाही – सगळ्यांना 'ह्या' एकेक कल्लेदार मिशाऽऽ

**सोनूताई :** ( चिसाळून ) डोकं ठिकाणावर आहे का ? तुम्ही डोळ्यांनी बघितलं आहे ?

**दासोपंत :** ( हबकून ) न...न...नाही नाही...पण...

**सोनूताई :** (दम भरीत) उगाचच्या उगाच माझ्या मुलावर खोटा आळ घ्याल तर खबरदार. मी सांगते, व्यंकटरावांच्या मन्यानंच हा कारभार केलाय. ( दरडावीत ) होय की नाही ?

**दासोपंत :** ( गांगरून ) असेल...असेल...

**सोनूताई :** असेल नाही, आहेच. मधूसमोर विचारीन तेव्हा तुम्ही डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगा. काऽऽय ?

**दासोपंत :** (किंचाळत) म...म...मीऽऽ? डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगूऽऽ?

**सोनूताई :** (दरडावीत) हो तुम्ही डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगा. (तरातरा आत जाऊ लागत) मधूला आणून दाखवतेच एकदा. कळू दे एकदा तिला कशी आहेत त्यांची कारटी तीऽऽ.

**दासोपंत :** (अजीजीने) अहो अहो पण...म्हणजे इतकं धडधडीत खोटं कसं बोलायचं ?

**सोनूताई :** (दारात थबकून वळून) काऽऽऽ! लाच घेऊन जकातीच्या खोट्या पावत्या नाही फाडीत कधी ?

**दासोपंत :** ( गांगरून ) प प...फाडतो फाडतो की – पण केवढ्यांदा ?

[ सोनूबाई जातात. दासोपंत सदं होऊन पुन्हा पाय पसरून मागे मान टाकतात आणि क्षणार्धात घुर्रर्र करून घोरू लागतात. तोच बाहेरून राजा 'परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला' – मोठमोठ्याने गुणगुणत प्रवेशतो. प्रेक्षकांना पाहून हसून गावठी नमस्कार करीत – ]

**राजा :** राम राम मंडळी. (कोट काढून हातावर घेत) केव्हा आलात ? आत्ताच?

**दासोपंत :** ( रुमाल वेत घुश्शात ) व्यंकटरावांनी चुन्याची बोटं कोचाला पुसली तर चालतात वाटतं ?

**सोनूताई :** ( दरडावून ) त्याच्याशी तुम्हांला काय करायचंय ?

**दासोपंत :** ( रुमालात मोठी शिंक देतं ) राहिलं ऽऽ

**सोनूताई :** ( पुन्हा आवराआवर करू लागत ) आपण इथं काय योजून आलो होतो त्याचा तुम्हांला अगदी विसर पडलाय.

**दासोपंत :** ( मान मागे टाकीत ) काऽऽही विसर पडला नाही. खटपट चालू आहे – चालू आहे – मंडळी, तुम्ही जऽरा दमानं घ्या…

**सोनूताई :** ( उसळून ) डोंबल तुमचं. लढाई हरली, राज्य गेलं तरी तुम्ही नुसते दमच खात बसा. अहो त्यांनी आपली बेन्नी या घरात घातली, घुसविली, अगदी चिटकवून पक्की देखील केली.

**दासोपंत :** हॅं हॅं…काय वेड ? मग आम्ही डिंकाच्या बाटल्या घेऊन बसलो आहोत कशासाठी ? मंडळी, चिंता करू नका. या घरात चिकटणार आपला गोट्याच.

**सोनूताई :** उजेड. मी आपली धडपडतेय, माझ्या परीनं सगळे उपाय करतेय, पण तुम्ही–( सहजगत्या नर्तकीच्या पुतळ्यावरील पंचा काढतात तशी कोणीतरी शाईने पुतळ्याला शिंदेशाही कल्लेदार मिशा काढून ठेवलेल्या त्यांना दिसतात. तशी सोनूताई विंचू डसावा तशा किंचाळत मागे सरतात आणि– ) ईऽऽ अग्गोबाईऽऽ

हे काऽऽय ?

**दासोपंत :** ( थंडपणे डोळे मिटल्या मिटल्याच ) काय झालंऽऽ ?

**सोनूताई :** ( ओरडत ) या मिशा कोणी काढल्या ?

**दासोपंत :** ( बावचळून ताडकन सावरून बसत ) मिशाऽऽऽ ? काढल्या ? ( चटकन हातांनी स्वतःच्या मिशा घाईघाईने चाचपून बघत ) भलतीच चेष्टा कसली मंडळी ? या…या काय ? मिशा जागेवर तर आहेत !

**सोनूताई :** ( चिडून ) धोत्राबित्रा प्यालात का काय ? तुमच्या मिशा नाही– या पुतळ्याला मिशा कोणी काढल्या ते विचारतेय मी.

**दासोपंत :** ( प्रथमच पुतळ्याकडे बसल्या बसल्याच टवकारून बघत ) आंऽऽ ? अरेऽऽच्या ? असं आहे का ? मंडळी, बघायला नको, हे काम आपल्या नंद्याचं.

**सोनूताई :** ( उसळून ) काय बडबडताहात काय ?

**दासोपंत :** पोराच्या ड्राईंगचं तुम्ही आजवर कौतुक केलंत—घ्या आता. हरामजाद्यानं घरातलं एक कॅलेंडर देखील चिताडायचं बाकी ठेवलं नाही. बाई पाहिली नाही पुढारी मानला नाही—सगळ्यांना 'ह्या' एकेक कल्लेदार मिशाऽऽ

**सोनूताई :** (पिसाळून) डोकं ठिकाणावर आहे का ? तुम्ही डोळ्यांनी बघितलं आहे ?

**दासोपंत :** ( हबकून ) न...न...नाही नाही...पण...

**सोनूताई :** (दम भरीत) उगाचच्या उगाच माझ्या मुलावर खोटा आळ घ्याल तर खबरदार. मी सांगते, व्यंकटरावांच्या मन्यानंच हा कारभार केलाय. ( दरडावीत ) होय की नाही ?

**दासोपंत :** ( गांगरून ) असेल...असेल...

**सोनूताई :** असेल नाही, आहेच. मधूसमोर विचारीन तेव्हा तुम्ही डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगा. काऽऽय ?

**दासोपंत :** (किंचाळत) म ..म...मीऽऽ? डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगूऽऽ?

**सोनूताई :** (दरडावीत) हो तुम्ही डोळ्यांनी पाहिलंय म्हणून सांगा. (तरातरा आत जाऊ लागत) मधूला आणून दाखवतेच एकदा. कळू दे एकदा तिला कशी आहेत त्यांची कारटी तीऽऽ.

**दासोपंत :** (अजीजीने) अहो अहो पण...म्हणजे इतकं धडधडीत खोटं कसं बोलायचं ?

**सोनूताई :** (दारात थबकून वळून) काऽऽऽ? लाच घेऊन जकातीच्या खोट्या पावत्या नाही फाडीत कधी ?

**दासोपंत :** ( गांगरून ) प प...फाडतो फाडतो की—पण केवढ्यांदा !

[सोनूबाई जातात. दासोपंत सर्द होऊन पुन्हा पाय पसरून मागे मान टाकतात आणि क्षणार्धात घुर्रर्र करून घोरू लागतात. तोच बाहेरून राजा 'परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला'— मोठमोठ्याने गुणगुणत प्रवेशतो. प्रेक्षकांना पाहून हसून गावठी नमस्कार करीत— ]

**राजा :** राम राम मंडळी. (कोट काढून हातावर घेत) केव्हा आलात ? आत्ताच?

लई ब्येस. काय चहाबिहा मिळाला की नाही? नाही! अरे अरे अरे (चुकचुकत) तुम्ही आमचे जानी दोस्त, पण तुमची देखील कोणाला कदर उरली नाही. माफ करा गड्यांनो—अहो, मी या घरचा मालक खरा, पण तुम्ही हिच्या माहेरचे म्हणूनच सांगतो—अहो,

> असुनी खास मालक घरचा म्हणती चोर त्याला
> परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला...'

काय सांगू? मित्रहो, राजा असून राज्य नाही, घर असून जागा नाही आणि नवरा असून बायको भेटत नाही. अशी सांप्रत अवस्था झालीय. कारण?—हे पाहुणे. (झोपलेल्या दासोपंताना न्याहाळीत मिस्कीलपणे) अतिथी देवो भव. काय मजा आहे! काही आहे काळजी? कसे निश्चिंतीने घोरताहेत, नाही? (गळ्याचा टाय सोडता सोडता झोपलेल्या दासोपंतांना न्याहाळीत त्यांच्याभोवती फेरी मारीत) सौख्यभोग इतुके सारे . कष्ट मात्र त्याला—'

**दासोपंत :** ( जाग येत किलकिल्या डोळ्यांनी ) काऽऽय?

**राजा :** काही नाही. झोपा झोपा. तुमचंच राज्य आहे—झोपा.

**दासोपंत :** ( डोळे मिटत ) एक फक्कडंस गाणं म्हणा राजाभाऊ...

**राजा :** म्हणतो की—जो जो रे बाळा । वेल्हाळा । रुमझुम घुंगुरवाळा... (दासोपंत घुर्रर्रं करून पुन्हा घोरू लागतात. तशी राजा चिडतो आणि ओरडतो) नॉन्सेन्स—हे हे हे बंद झालं पाहिजे. सबंध महिन्यात बायकोशी दोन शब्द बोलायला मिळत नाही याचा अर्थ काय? ( दाराशी ओरडून ) राणी राणी राणी—सोनूताई—अहो वहिनी. (थकून हताशपणे) अरे माझा हंबरडा या भरल्या घरात कोणाला ऐकू येतोय की नाही? (ओरडून) मला चहा हवाय—चहा.

**दासोपंत :** (जाग येत, किलकिल्या डोळ्यांनी पहात, त्रासिकपणे) काऽय हवंय?

**राजा :** (हबकुन, अबाऊट टर्न करीत, अजीजीनं) क...क...काही नाही. फक्त कपभर चहा.

**दासोपंत :** ( परत डोळे मिटत ) मिळायचा नाही.

**राजा :** (थक होत) आंऽऽ? या घरात मला—मला एक कपभर चहा देखील मिळायचा नाही?

**दासोपंत** : (डोळे उघडून सावरून बसत) चहाचं काय घेऊन बसलात राजाभाऊ, दुपारी नजरचुकीनं मी जेवायचा देखील राहून गेलोय त्याची कोणाला दाद नाही या घरात...

**राजा** : (संतापाने) सिली ! अरे हे काय घर आहे की...

**दासोपंत** : शांत व्हा. शांत व्हा-राजाभाऊ—घरात मुलांची संख्या अंमळ जास्त झाली की लाखांच्या पोशिंद्याची थोडी आबाळ व्हायचीच.

**राजा** : (चिडून) काऽऽय ?

**दासोपंत** : आपण कष्ट करून मिळवतो ते कुणासाठी ? मुलांच्यासाठीच ना ?

**राजा** : (वैतागाने) मग मी आता काय करावं असा आपला सल्ला आहे दासोपंत ?

**दासोपंत** : (तपकीर ठाशीत) समोरच्या इराण्याकडून तुमच्यामाझ्यासाठी मिळून एक सिंगल चहा मागवा.

**राजा** : (चाट होत) इराण्याकडून ? एक सिंगल ? तुमच्यामाझ्यासाठी ?

**दासोपंत** : होऽऽ. तुम्ही कपानं घ्या, आम्ही बशीनं पिऊ.

**राजा** : (संतापून) हे हे तुम्ही मला सांगता आहात ?

**दासोपंत** : त्यात काही गैर नाही. राजाभाऊ, जकातनाक्यावर आम्ही असाच चहा पितो.

**राजा** : (उसळून) माझं घर म्हणजे काय तुम्ही जकातनाकं समजलात ? नकोय मला चहा.

**दासोपंत** : (रुमालात शिंक देत) राहिलं ऽऽ.

**राजा** : (रागारागानं कोट उचलून माडीवर चालता होत—)आता कोणी नाकदुऱ्या काढल्या नि आर्जव केली तरी या घरात पाण्याचा थेंब पिणार नाही मी— समजलेत काय ? दाखवतोच एकेकाला (ताड ताड वर चालता होतो.)

**दासोपंत** : (किलकिल्या डोळ्यांनी वर पहात) वेडा आहे झालं.

[दासोपंत पुन्हा मान मागे टाकतात नि क्षणार्धात घुर्रर्र करून घोरू लागतात. तोच आतून सोनूताई—' काय केलंय ते तूच येऊन एकदा डोळ्यांनी बघ आणि खात्री करून घे...' असं ओरडत मधुराणीचा हात धरून तिला ओढत बाहेर आणतात आणि पुतळ्याकडे बोट दाखवतात तशी—]

**मधुराणी** :(धक्का बसून किंचाळते ) अगाईऽऽगऽऽ हे कायऽऽ ?
**सोनूताई** : काय ते तूच बघ म्हणजे झालं.
**मधुराणी** : (ओरडून) विध्वंशी शनी मेला...कोणी चांडाळानं केला हा प्रकार ?
**सोनूताई** : विचार विचार यांनाच. यांनी डोळ्यांनीच बघितलंय म्हणून बरं आहे. काय होऽऽ ?
**दासोपंत** : (खडबडून जागे होत) आं? (एकदम उठून चालू लागत) आलो आलो..
**सोनूताई** : ( त्यांना धरून पुन्हा बसवित ) बसा, निघालात कुठं ? मन्यानंच केला ना हा प्रकार ? नीट विचार करून सांगा. मला नाही हो उगाच कोणावर आळ घेतलेला आवडायचा. मन्यानंच या पुतळ्याला मिशा काढल्या ना ?
**दासोपंत** : ( बावचळून ) मन्या ? ( डोके खाजवीत ) मन्या मन्या मन्या...मंडळी, एक सांगा – हा मन्या म्हणजे...म्हणजे...बालक कोणाचा ?
**सोनूताई** : ( थक्क होत ) कोणाचा ?
**दासोपंत** : हो, म्हणजे आपली कीऽऽ –
**सोनूताई** : ( उसळून ) अहाहा. दिवे ओवाळा दिवे. अजून आपली मुलं कोणती ते देखील ओळखता येत नाही तुम्हाला ?
**दासोपंत** : न...न.. नाही नाही–तशी चेहऱ्यानं ओळखतो, पण इतक्या जणांची नावं नाही बोवा ध्यानात राहात, काय करायचं ? पण पण म...म... मन्याच तो.
**सोनूताई** : (विजयाने) पटली खात्री ?
**मधुराणी** : ( हा संवाद चालू असेतो फडक्याने पुतळ्याच्या मिशा पुसण्याचा निरर्थक प्रयत्न करीत, अखेर वैतागाने फडके आपटीत ) थांब आता, हे आले की दाखवते त्यांना आपल्या पुतण्याचा प्रताप आणि विचारते–
**सोनूताई** : नको ग बाई. तुम्हा नवराबायकोत भांडणं लावायची त्यांच्यासारखी आम्हाला नाही होऽ सवय काय होऽऽ ?
**दासोपंत** : तर काय ?
**सोनूताई** : पण आम्ही गप्प राहिलो तर व्यंकटराव आणि तिलोत्तमाबाई खुशाल आमच्या मुलांवर घालून मोकळे होतील. काय हो ऽऽ ?
**दासोपंत** : ( तपकीर नाकात ठाशीत) यात काय संशय ? ही पोस्टातली माणसं

—स्वतः शेण खायचं, दुसऱ्यावर ढकलायचं म्हणजे दानतच त्यांची तशी. काय होऽऽ!

**सोनूताई :** मग म्हणतेय काय मी? पुन्हा राजाभाऊंना आपल्या भावाचं आणि वहिनीचंच खरं वाटायचं की!

**दासोपंत :** (शिंक देत) तांब्यांना तांबे मिळायचे आणि वाघमारे शेवटी जंगलात तडफडायचे. टाळी द्या मंडळीऽऽ (हात पुढे करतात तशी —)

**सोनूताई :** (हात झिडकारीत) शुद्धीवर आहात का? टाळी कोणाला मागताय? जकातनाक्यावर नाही तुम्ही ..

**दासोपंत :** (सटासटा शिंका देत) राहिलं.

**मधुराणी :** (तोवर दिवाणखान्याची झालेली दुर्दशा न्याहाळण्यात हरवलेली —) माझ्या सुंदर घराचा कसा अगदी गोठा करून टाकलाय —

**सोनूताई :** (लगबगीने पुस्ती जोडते) त्यांनी त्यांनी. आम्ही नाही. काय हो?

**दासोपंत :** घर त्यांचं. गोठा करणारी माणसं त्यांची. मंडळी तुम्ही उगाच वैताग का —

[ असे म्हणतच तपकिरीची बोटे पुसण्यासाठी दासोपंत कोचाचा आधार घेऊ बघतात तोच— ]

**सोनूताई :** हा हा — (डोळे वटारीत त्यांना दाबतात तशी— )

**दासोपंत :** (चटकन हात मागे घेत धोतराला बोटे पुशीत शरमून) न...न...नाही नाही...म्हणजे चुकून एखाद दुसरं बोट ..म्हणजे गंधासारखं...लागलं असेल त्या कोचाला, पण —

**सोनूताई :** (भडकून) उगाच व्यंकटरावना पाठीशी घालण्यासाठी स्वतःवर आळ ओढवून घेऊ नका. हे हे हे डाग काय तपकीरीचे आहेत?

**दासोपंत :** (गांगरून मधुराणीकडे पहात) काय होऽऽ?

**मधुराणी :** पण ताई, तुला एवढा साक्षीपुरावा करायची काही गरज आहे का?

**सोनूताई :** अग हे असं काही तरी अजागळासारखं बोलून जातात म्हणून ती माणसं यांचा माझा नि मुलांचा पाणउतारा करतात. माणसानं मेलं सोसायचं तरी किती?

**मधुराणी :** पण मला कळत नाही ताई, त्यांनी तुमचा एवढा दुस्वास का म्हणून करावा ?

**सोनूताई :** (ठसक्यात उभे राहून) आता काऽऽ? एवढं देखील कळूं नये तुला ? अगऽऽ, आमची मुलं तुझ्यावर एवढी माया करतात, तू देखील त्यांचं सगळं करतेस...

**मधुराणी :** मग त्यांच्या मुलांचं मी करीत नाही? आंघोळी मीच घालते. कपडलत्ते मीच बघते, जेवणखाणं मीच पाहाते.

**सोनूताई :** होय, होय, होय, सगळ्यांचं तूच करतेस. पण घरात ठेवून घ्यायचा प्रश्न आला की आमच्या गोट्याचं नाव घेतेस.

**मधुराणी :** इश्शऽऽमी कोणालाही ठेवून घेईन. त्यांच्या पोटात दुखायचं कारण?

**सोनूताई :** कारण पैसा. पैसा ग बाई हा पैसा बोलतो आहे...काय होऽऽ?

**दासोपंत** (झोपी गेलेला दचकून जागा होत) पैसा? पैसा? कुठाय पैसा?

**सोनूताई :** (यजमानांना गदागदा हलवून जागे करीत) उठा उठा...झोपायला काय ही मध्यरात्र झालीय? जरा तोंड उघडून झडझडून बोला की.

**दासोपंत :** (बावचळून) पैसे, पैसे? कुठं आहेत पैसे? आधी पैसे मोजा, मग पावती फाडतो.

**सोनूताई :** (चिमटा घेत) अहो, जकातनाक्यावर नाही तुम्ही...घरात आहात—घरात.

**दासोपंत :** (पुरी जाग घेत) घरात? (सभोवार न्याहाळीत, तपकिरीची डबी चाचपीत, गडगडून हसत) छा छा छा...कमाल झाली, मला वाटलं की उसाच्या गाड्या घेऊन मळेवालेच आले वाटतं (तपकीर ठाशीत) हूऽऽ आता बोला.

[तोच राजा जिन्यावरून धाड धाड करीत खाली येतो आणि...]

**राजा :** (रागाने) काय बोला? गाण्याला चाल लावायला बसलो तर तेवढा देखील निवांतपणा कोणी मिळू देत नाहीत या घरात.

**मधुराणी :** (आश्चर्याने) अय्या तुम्हीऽऽ? तुम्ही घरी केव्हा आलात?

**राजा :** (रागाने) या घरात कोण केव्हा आला आणि गेला त्याची दाद आहे कोणाला?

**मधुराणी :** इश्श असं काय ते? मुलांच्या गोंगाटात कळल नाही मला, त्यासाठी एवढं रागवायला काय झालं?

**राजा :** ( उसळून ) रागवायला काय झालं? घरच्या माणसांना चहा मिळत नाही.

**मधुराणी :** पण देते पाठवून. नाही म्हटलय का? मला दोनच हात आहेत.

**राजा :** आमचं एक सोडून द्या. पण आमचे पाहुणे उपाशी राहिले तरी त्याची कोणी पर्वा करीत नाही.

**मधुराणी :** ( उसळून ) काहीतरी बोलाल तर मी मुळीच ऐकून घ्यायची नाही. कोण तुमचे पाहुणे उपाशी राहिले होऽ?

**दासोपंत :** ( हबकून ) आम्ही नाही रे बाबा.

**राजा :** ( ओरडून ) दासोपंत –

**मधुराणी :** तरी बरंय, तुमचे पाहुणे तिन्ही त्रिकाळ चरताहेत...

**राजा :** ( ओरडून ) खामोष. मी व्यंकटदादाबद्दल बोलत नाही.

**दासोपंत :** ( घाबरून ) न...न नाही नाही, राजाभाऊ, तसा आमचा दोन वेळा फराळ झालाय

**मधुराणी :** आणि त्यांची पोरं तर सत्रा वेळा गिळतात नि ( पुतळ्याकडे बोट दाखवीत ) हे हे प्रकार करून ठेवतात–समजलात ?

**राजा :** ( पुतळ्याकडे पाहात ) प्रकार? कोणी केला हा प्रकार ? नर्तकीला कल्लेदार मिशा? ( ओरडून ) काय फाजिलपणा आहे हा ? बायकांना कधी मिशा असतात ? दासोपंत–

**दासोपंत :** असतात असतात–काही काही बायकांना.

**सोनूताई :** तुम्ही पांचटपणानं मधे मधे बोलू नका.

**दासोपंत :** राहिलं.

**मधुराणी :** थट्टेवारी घालवण्यासारखी बाब नाही ही. –

**राजा :** अलबत ! नर्तकीला मिशा–आणि त्याही कल्लेदार मिशा याचा अर्थ काय ? अरे, या मिशा रंगविणाऱ्याला काही सौंदर्यदृष्टी आहे की नाही ? ( ओरडून ) कोणी केला हा फाजिलपणा ?

**मधुराणी :** तुमच्या लाडक्या पुतण्यानं–मन्यानं–समजलात ?

**राजा :** मन्या ? शक्यच नाही.

**मधुराणी :** विचारा दासोपंतांना. त्यांनी डोळ्यांनी पाहिलंय.

**राजा :** (ओरडून) सपशेल खोटं आहे. दासोपंत—

**सोनूताई :** (त्याच पट्टीत ओरडत) बघताय काय माझ्याकडे—सांगा खरं आहे म्हणून.

**दासोपंत :** (गांगरून केविलवाण्या स्वरात) राजाभाऊ, कोणी दमदाटी केली म्हणजे किनई आम्हाला खरं बोलवत नाही ..

**सोनूताई :** अस्स काऽऽय? आता गिळायला या आतमध्ये म्हणजे देते याचं उत्तर.

**दासोपंत :** अहो अहो...अहो पण...

[सोनूताई रागारागाने आत जाऊ लागतात तोच आतून लगबगीने गोरा येतो आणि — ]

**गोरा :** बाईसाब, गोट्या जेवत न्हाय.

**मधुराणी :** जेवत नाही? अगबाई—

**गोरा :** तुम्हीच त्येनला भरवाया होवं म्हून रुसून बसल्यात.

**सोनूताई :** पाहिलंस ? मुलांना एक एक सवयी तू लावून ठेवल्या आहेस त्या अशा नडतात. ( दारातून ओरडत )—यमेऽऽ गधडेऽऽ बारा वर्षांची घोडी झालीस तूऽऽ-गोट्याला नुसते दोन घास भरवायला सांगितले तर—

**मधुराणी :** अग पण तिच्यावर का ओरडतेस तू ? मी भरवते की त्याला.

**सोनूताई :** मला नाही पोरांचे असले लाड केलेले आवडत. दोन रपाटे घातले पाठीत की आपसूक खाईल तो भात. ( जाऊ लागते )

**मधुराणी :** ( किंचाळत ) सोनूताई—गोट्याच्या अंगाला हात लावशील तर खबरदार.

**सोनूताई :** ( थबकून ) मग काय करू? भिलवडीला गेल्यावर रोज त्याला भरवायला मधूमावशी कोठली आणून उभी करू?

**राजा :** बरोबर! सोनूताई, या बाबतीत तुम्ही गोट्याचे लाड मुळीच चालू देऊ नका.

**मधुराणी :** तुम्ही गप्प बसा. गोट्या मुळी आता भिलवडीला जाणारच नाही. तो इथं माझ्याजवळच राहणार आहे. कळलंऽऽ?

[ जाऊ लागते तशी— ]

**राजा :** थांब राणी—एका महत्त्वाच्या विषयावर मला तुझ्याशी बोलायचंय.

**मधुराणी :** (थबकून) असंऽऽ? मग तुम्हीच थांबा जरा. मी आधी गोऱ्याला जेवायला घालते नि मग येते.

**राजा :** पण राणी राणी—परिस्थिती किती आणिबाणीची निर्माण झालीय त्याची—

**राणी :** तुम्हाला काही हृदय आहे का? लेकरू भुकेनं कळवळलं असेल माझं तिकडं...(जाते.)

**राजा :** (संतापाने) नॉन्सेन्स. मी, मी थांब म्हणत असताना थांबत नाही. याचा अर्थ काय?

**दासोपंत :** (उठत) राजाभाऊ—उगाच मनाचा क्षोभ करून घेऊ नका. सारखं बायकोच्या भोवती भोवती घोटाळायचं वय राहिलं नाही तुमचंऽ. काय होऽऽ?

**सोनूताई :** (यजमानांच्या दंडाला धरून नेत) पांचटपणा पुरे. आता चला आधी. जरा पाटपाणी करून घ्यायला लागलात तर काय झिजाल?

[दासोपंत 'अहो अहो...अहो पण' . म्हणत असतानाच सोनूताई त्यांना ओढून नेतात. राजा हतबुद्ध होऊन बघतच राहातो, तोच इतका वेळ मागे उभा असलेला गोरा 'खिक' करून खुदकन हसतो. राजा दचकून मागे वळतो आणि— ]

**राजा :** (उसळून) तुला रे 'खिक' करून हसायला काय झालं?

**गोरा :** काय नाय बा—झ्याक झालं.

**राजा :** काय 'झॅक' झालं? आमची हजामत?

**गोरा :** न्हाय बाऽऽ (पुतळ्याचा निर्देश करीत) बापे लोकांनी हातात काकणं भरली तवा बाईला मिशा फुटायच्याच की.

**राजा :** हरामखोरा—उचल, उचल आधी तो पुतळा आणि बाथरूममध्ये नेऊन त्या सगळ्या मिशा धुवून काढ.

**गोरा :** आज न्हाय जमायचं.

**राजा :** (उसळून) जमायचं नाही?

**गोरा :** आज पडदे न पलंगपोस धुवायचा वार हाय.

**राजा :** हे हे तू मला – घरच्या मालकाला सुनावतो आहेस ?

**गोरा :** वाइच थांबा. आदुगर सांगा – ह्यो घरचा मालक कोन ?

**राजा :** ( अंगावर धावून जात ) गुलामा, तुझा कान पकडून सांगतो –

**गोरा :** ( मागे सरत ) हां हांऽऽसाब – ह्यो घरात चाकरी धरली तवापून माझा कान दिलाच हाय की तुमच्या हाती. पर तुमा दोघांचा बी कान गवसलाया पावन्यांच्या हाती, त्याचं काय ?

**राजा :** ( मारायला धावून जात ) गोराऽऽऽ

[ गोरा पळून जातो. राजा क्षणार्धं रागान पाहात उभा राहतो. मग प्रेक्षकांकडे वळून हसतो आणि – ]

दोस्त – वाटल्यास तुम्ही माझा कान धरा. पण खरं सांगा ही ही काय भानगड आहे, माझ्या अपरोक्ष हा भिलवडीचा जकातनाके कारकून दासोपंत कसलं कारस्थान शिजवत होता ? त्याची बायको, आमची मेव्हणी, ती सोनूताई राणीला कसली फूस देत होती ? बोला बोलाऽऽ – अरे कोणी सुळावर नाही चढवणार तुम्हांला माझ्यापाशी छट कभंर खरं बोल्लात तर. मिस्टर, तुम्ही बोलला नाहीत तरी तुमची चर्याच सांगतेय काय आहे प्रकार ? बाकीचं मरू द्या, फक्त एक सांगा आमच्या नव्या चित्रपटाची काय गत झालीय हे ठाऊक आहे तुम्हांला ? नाहीऽऽ ? काय मस्करी करता राव – आमचं रंगीत चित्र लागलं – दाणकन तोंडघशी पडलं, सगळा निकाल लागला. तुम्ही प्रेक्षकांनी पहिल्याच आठवड्यात पहिल्याच बॉलला आमची 'विकेट' घेतलीत. 'क्लीन बोर्ड.' अरे ! इथं गर्दी करताय ती तिथं केली असतीत तर – जाऊ द्या. सगळा आमचाच गाढवपणा झाला. पण घरात कोणाला या उपद्व्यापाचा सुगावा लागला नाही ना ? माझे पैसे गुंतले होते या चित्रात हे या चोरांना कळलं नाही ना अद्याप ? खरोखर सांगतो 'झक मारली नी या फंदात पडलो. अरे असं काय करताय – बॅंकेकडं हे घर गहाण पडलंय ना आमचं ? आता तुम्हीच मनावर घेतलंत तऽऽर ( हसतो ) हां हां – डरोमत, तुम्हांला जामीन राहायला नाही सांगत मी. मिस्टर, पैशांची नाही मोठीशी मातब्बरी. अरे ! या हातानं मिळवला – या हाताने घालविला. उद्या

दोन्ही दोन्ही हातांनी मिळवीन. अरे पण मिळवायचं तरी कोणासाठी ? आम्ही फक्त दोन जीव. तसं आम्हा दोघांना काय लागतंय ? अरे तसाच प्रसंग ओढवला तर आम्ही दोघं एकेक दिवस तुमच्यापैकी प्रत्येकाच्या घरी पाहुणे म्हणून येऊन राहू. वर्षभराची निश्चिंती, तुम्ही काय आम्हाला नाही म्हणणार आहात ? (हसतो.) छोड दो याऽऽर. चेहरा नका टाकू, नजरा नका चुकवू. नाही येणार बाबांनो, नाही येणार. अरे पण इतक्या सगळ्या चिंता, काळज्या आणि यातायाती गिळून, पचवून मी जिद्दीनं तुमच्यापुढं हसत उभा राहिलो आहे. त्याचं थोडं तरी कौतुक कराल ? गड्यांनो, मला पैशाची चिंता नाही. हे प्रकरण कळल्यावर बायको काय आमची बिगरपाण्यानं करील त्याची देखील मला तमा नाही. मला घोर पडलाय या आमच्या घराला लागलेल्या माहेरच्या घुशींचा. अहो काय सांगू तुम्हांला—

घरात एकदा घुसली ही माहेरची घूस
आणि बायकोला मिळाली आतून फूस
की सापडलाच सापळ्यात राज्याचा मालक
अन् माहेरचे पुंड होतात राणीचे पालक.
म्हणतात – "तुझा नवरा भोळासांब त्याला काही कळत नाही
म्हणून सासरचे लुबाडतात तू संभाळ ग बाई ॥"

घरात एकदा घुसले माहेरचे रक्षाकार
आणि बायकोला मिळाले द्वाड सल्लागार
की राणीच पुकारते राज्यामधे बंड
अन राजाची निघते दारोदार धिंड
"बाई पायातली चप्पल तू पायातच राख
की येईल तुझ्या पुढे राजा घासत घासत नाक ॥"

घरात एकदा घुसले हे माहेरचे कसाई
की धरून चाला राजाराणीत जुंपलीच लढाई
दोघांचं भांडण आणि माहेरच्यांना लोणी
नवऱ्याच्या पाठीला रेशनच्या गोणी

सासरच्या धनाची माहेरी भरती
माहेरच्या कल्याणा नवऱ्याची विभूती ॥

घरात एकदा घुसले हे माहेरचे चोर
की राजाच्या जिवाला रात्रंदिवस घोर
चोरांच्या हातात खजिन्याची किल्ली
खाऊनपिऊन माजतात माहेरची चिल्लीपिल्ली
माहेरच्या चरकात पिळून निघतोय ऊस
अहो घरात एकदा घुसली ही माहेरची घूस ॥

[तोच बाहेरून व्यंकटराव आणि तिलोत्तमाबाई रागारागातच प्रवेशतात. व्यंकटराव टोपी टीपॉयवर आपटीत आणि अंगातला कोट हिसकावून तिलोत्तमाबाईच्या अंगावर भिरकावीत – ]

**व्यंकटराव :** बरे भेटलात आपण. राजेश्री, आत जा आणि सगळ्यांना सांग म्हणावं पेढे वाटा पेढे...आनंद करा...

**राजा :** (विस्मयाने) पेढे? (हर्षाने) म्हणजे...व्यंकटदादा, नोकरीत तुला बढती मिळाली ?

**तिलोत्तमा :** (ठसक्यात) बढती नाही...बिऱ्हाडाला जागा मिळाली. जागा.

**राजा :** (बावचळून) बिऱ्हाडाला ? जागा ! कोणाच्या ?

**व्यंकटराव :** कोणाच्या म्हणजे ! आमच्या. बघतोस काय तोंड वासून ? आम्ही काय हाताखालच्या पोस्टमनच्या बिऱ्हाडासाठी जागा धुंडीत वणवणतो आहोत ?

**राजा :** (गोंधळून) पण म्हणजे...दादा.

**व्यंकटराव :** बस झालं. पळ आधी. त्या शकुनीमामाला सांग एकदा–म्हणावं आम्ही चाललो. आमच्या मागं तुम्ही या घरात मनःपूत लूटमार केलीत तरी तुम्हांला कोणी अडविणार नाही.

**राजा :** लूटमार ? हा काय प्रकार आहे वहिनी ?

**तिलोत्तमा :** प्रकार काही नाही. आहे ते सगळं ठीक आहे.

**व्यंकटराव :** सोळा वर्षं पोस्टात नोकरी केली पण कोणाचं एक दिवस नाही फट् म्हणून घेतलं कधी आणि या घरात सोम्यागोम्याकडून आमचा अपमान ?

**राजा :** कोणी अपमान केला तुझा दादा ?

**तिलोत्तमा :** तरी मी तुम्हाला निघायच्या वेळीच बजावत होते की, या काळात कोणी कुण्णाचं नाही. पण तुम्ही मूर्ख—म्हणून बदली झाल्यावर 'भाऊ भाऊ' म्हणून नाचलात आणि आम्हाला घेऊन या घरात येऊन राहिलात.

**व्यंकटराव :** (उसळून) हे हे हे असलं—तुझ्या माहेरच्या माणसांसारखं कुजकंनासकं बोलत जाऊ नकोस. वाट्टेल ते खपवून घ्यायला मी म्हणजे राजा नव्हे.

**तिलोत्तमा :** (भडकून) माझ्या माहेरची माणसं तेवढी कुजकीनासकी आणि तुम्ही तांबे मंडळी म्हणजे एकेक रामशास्त्र्यांचेच अवतार की नाही ?

**व्यंकटराव :** (कडाडून) खबरदार ! ज्या कुलात झाशीची राणी जन्माला आली त्या तांबे कुलाची ही अवहेलना मी कदापी सहन करणार नाही.

**राजा :** ( अजीजीने ) जाऊ दे...जाऊ दे ना दादा...

**व्यंकटराव :** तर मग आधी हिच्या तोंडाला सील ठोक.

**तिलोत्तमा :** तर तर ? माझ्या तोंडाला सील ठोकायचं म्हणजे टपालाच्या पिशवीला नाही 'सील' ठोकायचं.

**राजा :** जाऊ दे ना वहिनी—तुम्ही कशाला आगीत तेल ओतताय. प्रकार काय घडलाय ते कोणी मला सांगणार आहे का ?

**व्यंकटराव :** तो तो भिलवडीचा हरामखोर दाशा...

**तिलोत्तमा :** तुम्ही गप्प बसा पाहू. पित्तक्षोभ झाला म्हणजे रात्री मला निस्तरावं लागेल. मी सांगते—भावोजी, तुमच्या या सुंदर घराचा किनई आमच्या मुलांनी अगदी उकिरडा करून टाकलाय.

**राजा :** एवढंच ना ? समजा ऽऽ मुलंच आहेत ती.

**तिलोत्तमा :** हे या घरात खपवून घेतलं जाणार नाही.

**राजा :** असं कोण म्हणतो ?

**तिलोत्तमा :** असं दासोपंत म्हणतात म्हणून सोनूताई सांगत होत्या असं गोरा म्हणाला.

**राजा :** (चिडून ओरडतो) पण दासोपंत कोण ? सोनूताई कोण ? आणि गोरा तरी कोण ?

**तिलोत्तमा :** तुमच्या बायकोच्या माहेरची माणसं. कळलंऽऽ ?

**व्यंकटराव :** ( राजाची नक्कल करीत उपरोधाने ) पण बायको तरी कोऽऽण ? ( राजाकडे पाहत ) विचार की—बायको तरी कोणऽऽ ? ( थबकून ) आता नाही बोलायचा.

**तिलोत्तमा :** तुम्हाला करायचंय काय ? ती दोघं सुखात नांदली म्हणजे आम्हाला पावलं. भावोजी, आम्हाला जागा मिळालीय. आम्ही उद्याच बिऱ्हाड करणार.

[ तोच आतून तरातरा सोनूताई, आणि पाठोपाठ त्यांना 'अहो अहो ! माझं ऐका ..' या शब्दांनी आवरीत दासोपंत प्रवेशतात आणि— ]

**सोनूताई :** कशाला ? आम्हीच उद्या भिलवडीला जातो आहोत. तुम्ही सगळे खुशाल राहा आणि भावाच्या जिवावर चंगळ करा.

**तिलोत्तमा :** बोलायला शरम वाटायला हवी काहीतरी. काय हो चंगळ केली आही ? आमचे हे पोस्टात नोकरी करतात. माधुकरी मागत नाही हिंडत सोनूताई.

**सोनूताई :** (उसळून) आणि आमच्या ह्यांना देखील नाक्यावर काम करण्या-बद्दल पगार मिळतो तिलोत्तमाबाई—कोणी येऊन भिक्षा नाही वाढत.

**राजा :** (दाणादाण उडून) अहो वहिनी...अहो सोनूताई...

**व्यंकटराव :** (तुच्छतेने दासोपंताकडे बघत बायकोस) तू कशाला वाद घालतेस गांवढळ लोकांशी ? बोलूनचालून त्यांचा जन्म गेला नाक्यावर पावत्या फाडण्यात (नाक फेंदारीत) हॅ ऽ कारकुंड्या—

**दासोपंत :** अरे वारे वा ऽऽ आपण काय दिल्लीला राष्ट्रपतीचे शागीर्द आहात वाटतं ?

**व्यंकटराव :** (खवळून) तोंड सांभाळून बोला दासोपंत. मी दीडशे पाच दोनशे ई. बी. दहा तीनशेच्या ग्रेडमध्ये सेंट्रल गव्हर्नमेंटमध्ये ऑफिसर म्हणून काम करतो. डी. ए. सी. ए. एच. ए. मिळून मला तीनशेच्यावर मिळतात—रोख.

**दासोपंत :** आमचं जकातनाकं देखील प्रायव्हेट नाही व्यंकटराव, सरकारीच आहे.

**सोनूताई :** आणि मिळकतीबद्दल म्हणाल तर मोठमोठे व्यापारी नोटांची पुडकी घेऊन लोटांगण घालीत येतात यांच्या पायांशी.

**तिलोत्तमा :** ते काय विचारावं? म्हणूनच सस्पेंड होऊन साडूचे पाय धरायला आले.

**सोनूताई :** आणि तुमचं सांगा की. लोकांची पत्रं फोडून वाचल्याबद्दल तुमचे हे डिमोट झाले आणि भावाच्या आश्रयाला आले. आम्हाला ठाऊक आहे सगळं.

**व्यंकटराव :** दासोपंत, तुमच्या बायकोला आवरा.

**दासोपंत :** आधी तुम्हीच तुमच्या बायकोचं तोंड बंद करा.

**राजा :** जाऊ देना दादा...दासोपंत, तुम्ही तरी गप्प बसा.

**व्यंकटराव :** तो शहाणपणा तू त्यांना सांग. हूं अरे असली माणसं मी पोस्टात रनर म्हणून नेमतो.

**दासोपंत :** अबे जा जा! तुमच्यासारखे लोक नाक्यावर हात दाखवून गाड्या आडवायला मी ठेवतो. थूत!

**व्यंकटराव :** आम्हाला ठाऊक आहे मेहेरबान, यांच्या पैशावर तुमचा डोळा आहे म्हणून तुमच्या गोट्याला या घरात कोंबायची तुमची कारवाई चाललीय.

**दासोपंत :** महाशय, कारस्थान तुमचंच चाललंय, बेबीला या घरात घुसवायसाठी. भावाचा पैसा बघून हाव सुटलीय ना?

**राजा :** (चिडून) क्षणभर माझं तुम्ही जरा ऐकणार आहात का?

**सोनूताई :** तर काय! म्हणूनच आमच्या मुलांना बदनाम करण्यासाठी तुम्ही या मिशा रंगवल्यात नि आळ घातलात आमच्या नंदूवर.

**व्यंकटराव :** दासोपंत, आता तुम्ही तुमच्या मंडळीचं तोंड आवरलं नाहीत तर तुमच्या मिशा उपटून त्यांच्या हातात ठेवीन.

[दासोपंत पटकन हाताने मिशा झाकतात.]

**तिलोत्तमा :** खोटं बोलायचं म्हणजे किती ते? मिशा रंगवल्यानं—

**राजा :** (पिसाळून) खामोष! आता कोणी शब्द बोलला तर एकेकाच्या नरडीचा घोट घेईन मी.

**व्यंकटराव** आणि **दासोपंत :** (तावातावाने) पण या पुतळ्याच्या मिशा –

**राजा :** (ओरडून) थांबा. (शांतपणे) त्या मी काढल्या आहेत, काय म्हणणं आहे तुमचं ?

**राजा सोडून सगळे :** (किंचाळत) तू तू...तुम्हीऽऽ

**राजा :** हो मीच. तुमची पोरं अशी दिव्यलक्षणी – माझ्या तंबोऱ्याचा घोडा घोडा करायला निघाली होती. मिनतवारीनं त्यांचं लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी मला हा उद्योग करावा लागला – ठाऊक आहे ?

**मधुराणी :** (प्रवेशत) काय झालं ?

**राजा :** (गडबडीने) काही नाही...काही नाही. आम्ही सगळे मिळून थोडा सुखसंवाद करीत होतो. बायको नवऱ्याच्या गळ्यातली धोंड आहे की नवरा बायकोच्या पायातली बेडी आहे, या विषयावर.

**मधुराणी :** तुमचं पुरे झालं. ताई, गोट्याचं जेवण झालं. तो झोपला देखील. आता–

**सोनूताई :** (यजमानांना ढोसत) बघताय काय ? चला आधी आत...अंथरूण घाला.

[दासोपंत 'अहो अहो' म्हणत असतानाच सोनूताई त्यांच्या दंडाला धरून त्यांना आत नेतात.]

**मधुराणी :** काय बोलायचं होतं हो तुम्हांला माझ्याशी ?

**राजा :** (उपरोधाने) मलाऽऽ? तुझ्याशीऽऽ? छे बुवा, आता बोलण्यासारखं काही उरलंच नाही.

**मधुराणी :** हूं ऽऽ.

**राजा :** हूं ऽऽ. सगळं कळून चुकलंय मला.

**मधुराणी :** समजू द्या की एकदा – काय काय कळून चुकलंय ते.

**गोरा :** (वरून खाली येत) सायेब, बेबीताई गळा काढून रडत्यात.

**राजा :** अरे कोणी मारलंबिरलं की काय तिला ? नेम नाही या घरातल्या लोकांचा.

**तिलोत्तमा :** ( लगबगीने वर जात ) झोपेची वेळ झाली तिची की अस्सा कहर मांडते बघा.
**गोरा :** बेबीताई म्हणत्यात की आपुनच त्येनला मांडीवर थोपटून गानं म्हणून झोपवाया हवं.
**मधुराणी :** ( नाक मुरडत ) इश्शऽऽ.
**राजा :** ( हसत जिन्याकडे जात ) हात्तिच्या–एवढंच ना ?
**व्यंकटराव :** हे हे असले चोजले मला मुळीच खपायचे नाहीत.
**राजा :** ( त्यांना आडवीत ) दादा – तू बघ तरी – दोन मिनिटांत तिला गाढ झोप लागली नाही तर संगीत दिग्दर्शकाचा व्यवसाय सोडून देईन. ( वर जाऊ लागतो. )
**मधुराणी :** थांबा. मला महत्त्वाचं बोलायचंय तुमच्याशी.
**राजा :** ( थबकून ) अस्सं ? मग थांबायला हवं तुला. बेबीला झोप आलीय ( जाऊ लागतो. )
**मधुराणी :** अहो पण –
**राजा :** (पुन्हा थबकून) बेबीला घरात ठेवून घेणार आहोत आपण. तेव्हा आधी तिचे लाड आणि मग बाकीच्यांचे. (जाऊ लागतो.)
**मधुराणी :** ( चिडून ) राज, आधी मागं फिरा –
**राजा :** ( मागे वळत ) तुला काही हृदय आहे का ग ? पोर पेंगुळली असेल तिकडं माझी...[ जिन्यातून निघून जातो. ]
**व्यंकटराव :** ( आता खुषीत राजाच्या मागे वर जात ) छे छे, कमाल झाली बोवा. हा राजा आहे तस्सा आहे...कोणाशी कसं बोलावं याचा मुळी पोचच नाही.

[ व्यंकटराव जातात. फणफणणारी मधुराणी आणि गोरा तेवढे उरतात. ]

**मधुराणी :** ( जिन्याकडे पाहात धुमसत ) आधी तिचे लाड काय ?
**गोरा :** तर काय ! अन् मग बाकीच्यांचे.
**मधुराणी :** ( उसळत ) म्हणजे मी बाकीच्यांत जमा झाले ?
**गोरा :** असं सायेब म्हणाले...देवाच्यान...बाई अवो ती सासरची माणसं... त्येनला अदुगर संबाळाया होवं.

**मधुराणी :** ( कडाडत ) चल बोल् नकोस काही. तू त्यांचाच साथीदार. जा चालता हो इथून...

[ गोरा पडल्या फळाची आज्ञा घेऊन पसार होतो. राणी रागारागाने धुमसत फुणफुणत प्रेक्षकांपुढे येते आणि — ]

**मधुराणी :** ( रागारागाने ) तुम्ही माझ्या माहेरचे म्हणूनच सांगते—बाई, ही सासरची माणसं किनई एकजात खोटी, ढोंगी आणि लुच्ची.

**ही सासरची माणसंच खोटी, यांची फुकटच बघून घ्यावी ऐट**
**बाई आम्हा बायकांचा जन्मच वाईट**
**यांचं कितीही करा, कसंही वागा — बाई, माणसं नव्हेत ही माकडं**
**मेलं कुत्र्याचं शेपूटच वाकडं**
**घरात झुंजवून कोंबडी करतात गावभर गाजावाजा**
**दुरून हे कोल्हे बघतात मजा**
**पुन्हा बोलायची चोरी, मी सासुरवाशिण, अन् हे तर गळ्यातले ताईत**
**बाई आम्हा बायकांचा जन्मच वाईट ॥**

**ही सासरची माणसं ढोंगी बाई, यांना मुलीचं हव्वं ते खपतं**
**पण सुनेचं सगळं खुपतं**
**मुलीच्या तालावर नवरा नाचला तर म्हणतील — 'मुलगीच हुशार'**
**किनई, त्याचं बायकोवर प्रेमच फार**
**पण सुनेच्या तंत्रानं मुलगा वागला तर म्हणतात—'तो झालाय बैल'**
**हिनं घातली तर पेंड देखील खाइल.**
**अहो कोणाच्या ढोलावर कोण कोण घुमतो—ते आम्हाला नाही का माहीत ?**
**पण आम्हा बायकांचा जन्मच वाईट ॥**

**ही सासरची माणसं लुच्ची बाई अशी, गोड साखर पेरतील**
**की 'हे' तर कमरेचं सोडून देतील**
**'ना मूल बाळ तुला, मग पाहिजे कशाला, रिकामा पैशाचा सोस ?**
**अरे, निदान आमच्या मुलांना तरी पोस !'**

की विरघळलेच हे भोळे सांब, यांना बोलायचं तरी बाई कुणी ?
अहो नागानं गिळलाय मणी
त्यांनी घरदार नेलं जरी लुटून तरी हे 'ब्र' ही काढायचे नाहीत
बाई आम्हा बायकांचा जन्मच वाईट ||

[तोच पुढच्या दारातून एक भली मोठी पिशवी घेऊन धटिंगण गुरुजी प्रवेशतात. आता पॅंट, जोधपूरी कोट आणि गांधी टोपी, अशा थाटात. त्यांना बघताच मधुराणी विस्मयात किंचाळते—]

**मधुराणी** : अय्या ! गुरुजी तुम्ही ?

**धटिंगण** : का पाटलोण घातली म्हणून म्हणतेस ? मागच्या वेळी धोतर फाटलं, तुझी कलमं चिरडली—तेव्हा ठरवून टाकलं की जमाना बदललाय तर आपणही बदलायला हवं. बरी धोतर काय, पंचा काय अन् लुंगी काय—ब्रह्मचाऱ्याच्या घरात सगळं सारखंच. असो असो. आधी हे तांब्यात घे आणि पिशवी रिकामी करून परत दे पाहू.

**मधुराणी** : काय आणलंत एवढं ? भाजी ?

**धटिंगण** : (नाक फॅंदारीत) भाजी ? हॅं हॅंऽ. इतका का मला तू अरसिक समजलीस (पिशवीतून काढून दाखवीत) बघ, बघ तरी—काश्मीरी गुलाबांची चौदा कलमं आणली आहेत. थेट काश्मीरहून बरं का !

**मधुराणी** : (एकदम खुलून) अय्या माझ्यासाठी ?

**धटिंगण** : (कलमे तिच्या हाती देत) नाहीतर दुसऱ्या कोणासाठी ? मागच्या वेळी अजाणता हत्या झाली, त्याची भरपाई करायला नको ?

**मधुराणी** : (कलमे न्याहाळीत) पण मिळाली कुठं बाई तुम्हांला इतकी कलमं ?

**धटिंगण** : (खुषीत येऊन) त्याच्याशी तुला काय करायचंय ? ते आमचं सीक्रेट आहे. पण आता तरी आमच्यावरला राग गेला का नाही ?

**मधुराणी** : (खुलत आणि लाजून) इश्श. रागावले होते कधी मी !

[तोच गोरा येतो. त्याच्या हाती कलमे देत— ]

ही काश्मीरी गुलाबाची कलमं. नीट जपून ठेव. नाहीतर पोरांच्या हाती लागतील ? उद्या सकाळी लावायची बरं का !

**गोरा :** आपल्या अरप करायच्या पडताळात ठिवू बाई ?

**मधुराणी :** रेफ्रिजेटरमध्ये ? ही कल्मं ? शहाणाच आहेस.

**गोरा :** त्यला काय जालं ? भाजीपाला ताजा -हातु, खरकटं बी शिळं होत नाय, मग कल्मालाच काय धाड जालिया ?

**मधुराणी :** मला शहाणपणा शिकवू नकोस. बादलीत पाणी घालून मुलांच्या हाताला लागणार नाहीत अशी त्यात ठेव. [गोरा कल्मे घेऊन जातो ] गुरुजी तुमची ही भेट किनई मला फार आवडली. थँक यू

**घटिंगण :** (तिच्या हातातली रिकामी पिशवी ओढून घेत) नो मॅन्शन. नो मॅन्शन. आवडली ना ? आवडणारच. आमचं लग्न झालेलं नसलं तरी बायकांना काय आवडतं हे आम्ही नेमकं ओळखतो. आता (खिसे चाचपीत आपल्या खिशातून पावती पुस्तक काढीत) व्यवहार.

**मधुराणी :** व्यवहार ? गुरुजी मी किनई यांना अजून त्याबाबत काही विचारलं नाही.

**घटिंगण :** फार उत्तम. राजाभाऊंना आता विचारायचं नाही आणि सांगायचं देखील नाही. शाळेच्या उद्‌घाटनाच्या दिवशी एकदम दणका उडवायचा. असा चकित होईल तो–

**मधुराणी :** पण गुरुजी–

**घटिंगण :** आता पण नाही न बिण नाही. हे बघ मी म्हणत होतो पंचाहत्तर तू म्हणत होतीस चाळीस. तुझंही राहू दे आणि माझंही राहू दे. आपण हा सौदा पन्नास हजारांवर तोडू. ठरलं ? लिहू पावती ?

**मधुराणी :** तसं नाही गुरुजी–पण त्यांची संमती विचारली असती म्हणजे–

**घटिंगण :** अग लबाडे ! मला ठाऊक आहे, तुझा नवरा आहे तुझ्या मुठीत. ऑऽ ? ऑऽ, हाऽऽ ! छान आहे. छान आहे. असाच जन्मभर मुठीत ठेव–सोडू नकोस गुलामाला. आमचं लग्न झालं असतं तर आम्ही देखील असेच कोणाच्या तरी मुठीत खुषीनं राहिलो असतो.

**मधुराणी :** (खुलून आणि लाजून) इश्श ! तुमचं आपलं काहीतरीच.

**घटिंगण :** काहीतरीच नाही. आम्हाला सगळं ठाऊक आहे. तू अगोदर चेकचं पुस्तक घेऊन ये. सात सत्तावनचा मुहूर्त चुकता कामा नये.

**मधुराणी :** (कपाटाशी जात) पण अजून मला वाटतं गुरुजी की त्यांना नुसतं सांगावं. वरतीच आहेत ते. त्यांना बोलावू ?

**घटिंगण :** (नाकावर बोट ठेवीत) शूऽऽक. तुझे दीर आणि भावजय घरात असताना ते त्याला तुझ्या मनासारखं कधीतरी करू देतील ? नाव सोड.

**मधुराणी :** (चेकबुक काढीत फणकाऱ्याने) इश्य ! पण त्यांचा संबंध काय ?

**घटिंगण :** (पेन काढून तिच्या हाती देत) पैसा, पैसा बरं बाई हा पैसा. लिही- चेअरमन, सांदिपनी एज्युकेशन सोसायटी...अखेर बायकोच्या हातात सत्ता गेलेली सासरच्यांना कशी बघवेल ?

**मधुराणी :** (पेन घेऊन घुटमळत) मी नाही त्यांची पर्वा करीत.

**घटिंगण :** लाख बोललीस. पण त्याचं तसं नाही. त्याच्या मानगुटीवर भावाचं भूत बसलंय म्हणून तर त्यांच्या मुलीला ठेवून घ्यायचं ठरवलंय त्यानं.

**मधुराणी :** (विस्मयाने) तुम्हाला कोणी सांगितलं ?

**घटिंगण :** व्यंकटरावनी. दुसरं कोण सांगणार ? काय म्हणत होते ठाऊक आहे ? तुम्हाला ना पोर ना बाळ, सगळे पैसे व्यंकटरावांच्या मुलांनाच मिळायचेत.

**मधुराणी :** (चेकबुक पुढे ओढत) अडलंय माझं खेटर.

**घटिंगण :** लिही—चेअरमन, सांदिपनी एज्युकेशन सोसायटी—मीही चांगलं चकवलं त्यांना. अरे पैसे कोणाचे आणि उड्या कोण मारतोय ? लिही— फिफ्टी थाऊजंड—पन्नासावर तीन शून्यं बरं का...बाजार भरायच्या आधी उचल्यांनीच कमरा बांधल्या आहेत की ! व्यंकटरावाच्या मुलीला ठेवून घेण्या-बाबत राजाभाऊनं विचारलं होतं तुला ?

**मधुराणी :** (चेक लिहीत) मुळीच नाही.

**घटिंगण :** आणि तू एवढ्या तेवढ्या बाबतीत त्याच्या संमतीचा आग्रह धरून बसली होतीस. खाली सही कर आणि चेक क्रॉस करायचा की झालं.

**मधुराणी :** (सही करून चेक फाडीत) मी देखील त्यांना आता काही विचारणारच नाही.

**घटिंगण :** (चेक ओढून घेत) कसं बोललीस ? अग साप म्हणू नये धाकला आणि नवरा म्हणू नये आपला. ही पावती नीट जपून ठेव हो.

[तोच वरून राजा संथपणे येतो. गुरुजींचे शेवटचे उद्‌गार ऐकून थबकून]

**राजा :** कसली पावती ? काय भानगड आहे ही ?

**मधुराणी :** यांच्या सोसायटीला तुमच्या नावानं शाळा काढण्यासाठी पन्नास हजारांची देणगी दिलीय मी.

**राजा :** (कपाळाला हात लावून मटकन बसत) पन्नास हजारांची देणगी ?

**घटिंगण :** (चुकचुकत) कशाला सांगितलंस ?

**मधुराणी :** काय बिघडलं सांगितलं म्हणून ? मला काय चोरी आहे ?

**घटिंगण :** अगं पण मुली, याला आश्चर्याचा गोड धक्का द्यायचं ठरलं होतं ना आपलं ! असो. असो. सांगितलंस तेही एका परीनं बरंच झालं. आता मी एकदम उद्घाटनाच्या समारंभाचं निमंत्रण द्यायला येईन (लवून) थँक यू राजाभाऊ, थँक यू मधुराणी. असेच योग वारंवार येत जावेत. बराय, जयहिंद. [लगबगीने पिशवी घेऊन पसार होतात.]

**राजा :** (संतापाने) छान केलंस. चांगला गळा कापलास–माझा आणि तुझा.

**मधुराणी :** काही गळा कापला नाही कोणाचा. तुमच्या नागोबांना दूध पाजण्यापेक्षा शाळेला चार पैसे दिले तर मुलं दुवा तरी देतील.

**राजा :** अग पण पन्नास हजार रुपये ?

**मधुराणी :** उगीच ओरडू नका. मला ठाऊक आहे, तुमच्या खात्यावर रगड पैसे आहेत.

**राजा :** पण आधी मला विचारलं असतंस तर काय बिघडणार होतं ?

**मधुराणी :** मोठ्या तोंडानं मघाशी मला–'आपण बेबीला ठेवून घेणार आहोत' म्हणून सुनावलंत, त्यावेळी मला विचारलं होतत का ?

**राजा :** आणि त्या आधी तू–'गोट्या आता इथं माझ्याजवळ राहणार आहे' ही घोर प्रतिज्ञा मला ऐकवलीस ती !

**मधुराणी :** मी तुम्हाला पूर्वीच बजावलं होतं–मूल ही माझी आवड आहे, तेव्हा निवड करायचा अधिकार माझाच असला पाहिजे.

**राजा :** हा सोनूताईंनी सल्ला दिला वाटतं ?

**मधुराणी :** खबरदार. ताईचं नाव घ्यायचं तुम्हाला कारण नाही. वेळी अवेळी सल्ला द्यायला माझी ताई म्हणजे तुमचे व्यंकटदादा नव्हेत.

**राजा :** बरोबर आहे. आपला खोटा माल, हातोहात फसवून गिऱ्हाइकाच्या

गळ्यात कसा बांधावा ते दादाला कसं कळणार? बिचारा पोस्टात नोकरी करतो— जकात-नाक्यावर नाही.

**मधुराणी :** होय का? म्हणूनच गोड गोड बोलून तुमच्या दादावहिनींनी तुम्हांला गुंडाळलंय आणि मला शह दिलाय वाटतं?

**राजा :** चुकलात बाईसाहेब — (प्रेक्षकांचा निर्देश करीत) या या आमच्या दोस्त मंडळीपैकी कोणालाही विचारा, आम जनता सांगेल की, या घरात गुंडाळल्या गेल्या आहात तुम्ही. मी नव्हे. काय होऽऽ? बाकी तुमची साक्ष काढण्यात काय अर्थ आहे म्हणा—

**मधुराणी :** आता का? आता का? विचारा की त्यांना—

**राजा :** त्यात काही तथ्य नाही 'माहेरचे—माहेरचे' म्हणून तू या आमच्या दोस्तांना केव्हाच गुंडाळून टाकलं आहेस. (हसते) छोड दो राणी—आपण तडजोड करू या. तू गोट्याला ठेवून घेण्याचा विचार सोडून दे. मी बेबीला ठेवायचा हट्ट धरीत नाही. कबूल?

**मधुराणी :** आणिक?

**राजा :** आणि काय? आजूबाजूची आमची छोटी दोस्तमंडळी आहेतच की आपल्या मनोविनोदनार्थ. फार तर त्यांच्यांतला एखादा बालक...

**मधुराणी :** छाऽऽन. चांगलंऽ. (प्रेक्षकांना) बघा कसे संभावितपणे सल्ला देताहेत

**राजा :** का का — त्याला काय झालं?

**मधुराणी :** चोराच्या हातात खजिन्याच्या किल्ल्या. आठ दिवसांत माझं घर जमीनदोस्त करून टाकतील. मेल्यांना महिनाभरांत मी इकडं फिरकू दिलं नाही—

**राजा :** म्हणून काय झालं? या घराचं करायचं तेच केलं ना या पोरट्यांनी?

**मधुराणी :** ते चालेल मला. पण तुमच्या त्या मित्रांना घराच्या आसपास देखील येऊ द्यायची नाही मी.

**राजा :** हा दुराग्रह आहे. काय होऽ?

**मधुराणी :** त्यांनी काय पाहिलंय? अहो आळीतली मुलं जमा झाली की यांच्या कानात वारं शिरतं, आणि मुलांत मूल होऊन हे घरात नुसता धुडगूस घालतात.

**राजा :** प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे. काय होऽ? अरे हो म्हणा.

**मधुराणी :** तुमच्यासारखी ते जनाची आणि मनाची कोळून प्याले नाहीत.

**राजा :** (प्रेक्षकांकडे डोळे मिचकावीत) आहे बुवा. जोर आहे न काय?

**मधुराणी :** थट्टा पुरे झाली.

**राजा :** मी मुळी थट्टा करीतच नाही. हे बघ राणी—तुला दूरदृष्टी नाही. या घरात जे मूल आपण ठेवून घेऊ ते आमच्या म्हणजे तांब्यांच्या घराण्यातील असायला हवं.

**मधुराणी :** बेबी काय जन्मभर तांबे घराण्यातच राहाणार आहे वाटतं?

**राजा :** म्हणून तर तिला संभाळायची. तिचं लग्न झालं की पुन्हा आपण मोकळे. मागाहून कटकट नाही. काय एखाद दुसरं बाळंतपण करावं लागेल...

**मधुराणी :** बघा बघा—मुलावर माया करण्यात देखील कशी लुच्चेगिरी चाललीय यांची.

**राजा :** लुच्चेगिरी कसली? रोखठोक व्यवहार आहे हा. काय होऽ?

**मधुराणी :** पुरे झालं. ते काही चालायचं नाही. मी सोनूताईला शब्द दिलाय तो खरा झालाच पाहिजे.

**राजा :** तर मग मीही व्यंकटदादाला शब्द दिलाय तो खरा झालाच पाहिजे.

**मधुराणी :** तुम्ही काहीही अकांडतांडव केलंत तरी मी गोट्यालाच ठेऊन घेणार.

**राजा :** अस्सं. गोट्या इथं राहू दे तर खरा—त्या क्षणी मी घर सोडून चालता होईन.

**मधुराणी :** अस्सं काय? मग मी देखील सांगते, तुम्ही बेबीला ठेवून घेणार असाल तर पाणी प्यायला देखील मी इथं थांबायची नाही.

**राजा :** ॲहं, ॲहं. उगाच मिजास मारू नकोस. खुशाल जा. या घरात माझाच अधिकार चालला पाहिजे.

**मधुराणी :** (टचकन डोळे पाणावून) जातेच. मला ठाऊक आहे. मीच तुम्हाला नकोशी झालेय.

**राजा :** राणी राणी......

**मधुराणी :** मूल नाही ना मला—त्याचा असा सूड काढताहात तुम्ही माझ्यावर.

**राजा :** हे हे सगळं तुझ्या मनाचं आहे हं राणी. मी असं एका अक्षरानंही बोलो नाही (प्रेक्षकांना) काय हो ? अरे निदान एवढ्यापुरती तरी माझी बाजू घ्या.

**मधुराणी :** (रडत) त्यांना काय माहीत आहे ? बोलायलाच कशाला हवं ? एवढं तुमचं मग मला कळत नाही ? मी काय तुम्हाला आज ओळखते ?

**राजा :** कबूल आहे राणी, पण...

**मधुराणी :** (रडत) काही बोलू नका. खुश्शाल काडीमोड घ्या. दुसरं लग्न करा आणि तुम्ही तरी सुखी व्हा. हेच हवंय ना तुम्हाला ? [आवेगाने रडत आत जाते.]

**राजा :** (तोंडात मारून घेत) तोबा, तोबा. (तिच्या मागोमाग दारापर्यंत जात) राणी राणी—(चिडतो) अस्सं काय ? जा जा खुश्शाल जा. मी तरी कशाला राहतोय या घरात ? (प्रेक्षकांना) दोस्त, तुम्हाला हे घर हवंय ? पागडी नाही, डिपॉझिट नाही—फुकट देणार आहे. बोला हवंय ? दिलं. आजच्या आज ताब्यात घ्या. मी संन्यास घेणार आणि हिमालयात चालता होणार त्याशिवाय नाही एकेकाचे डोळे उघडायचे.

[ हे सर्व प्रपंचनाट्य चालू असतानाच मघाच केव्हातरी मारोतराव येऊन दारात थबकून उभा राहिला आहे. राजाचा नवा निश्चय ऐकून तो खुदकन हसतो आणि 'ओफ...' म्हणून उद्गारतो. राजा दचकून वळून त्याच्याकडे बघतो. मग झटकन जाऊन त्याचा हात पकडीत राजा तावा-तावाने विचारतो— ]

**राजा :** पाहिलास ना सगळा प्रकार तू मारोतराव ?

**मारोतराव :** नुसता ट्रेलर पाहिला. मेन पिक्चर नाही पाहायला मिळालं.

**राजा :** बोल, पटलं की नाही तुला ? लग्न करण्यासारखा आयुष्यात दुसरा गाढवपणा नाही.

**मारोतराव :** (पाईप पेटवीत) असंच नाही काही.

**राजा :** गुळमुळीतपणानं बोलू नकोस. खरं सांग, तू लग्न केलं नाहीस याचा चुकून कधी तुला पश्चात्ताप झालाय ?

**मारोतराव :** हां. कधी कधी.

**राजा :** (ओरडून) मूर्खासारखं बरळू नकोस.

**मारोतराव :** ओफ्. मग काय बोलू ?

**राजा :** अरे लग्न झालेल्या (प्रेक्षकांचा निर्देश करीत) यातल्या प्रत्येक पुरुषाला एकेकट्याला गाठून तू विचार, स्वतःच्या तोंडात मारून तो तुला आपल्या गाढव-पणाची कबुली देईल. (प्रेक्षकांना) काय हो ? नाही – ज्यांची मंडळी बरोबर आलेली नाहीत त्यांनाच करतोय मी हा सवाल.

**मारोतराव :** तरी देखील दरवर्षी ताशेवाजंत्री आणि बँड वाजायचे काही थांबत नाहीत.

**राजा :** तेच तर आश्चर्य आहे.

**मारोतराव :** ओफ्. मग म्हणणं काय तुझं ?

**राजा :** अरे, पुरुषासारखे हे पुरुष...एवढी शहाणीसुरती माणसं–

एवढी शहाणीसुरती माणसं पण लग्नच का करतात ?
जाणूनबुजून संसाराच्या खड्ड्यात का पडतात ?
कळूनसवरून गळ्यामध्ये एक घोरपड का घेतात ?
आणि मग...'मेलो मेलो. ठार बुडालो ' म्हणून गळा का काढतात ?

**मारोतराव :** ओफ्. तोच तर प्रश्न आहे.

**राजा :** का खाणावळीत यांना कोणी जेवण वाढीत नाहीत ?

**मारोतराव :** सोमवारची रात्र सोडून वाढतात.

**राजा :** का धुणंभांडी केर काढायला रामा चालत नाही ?
का एकट्या जिवाला एक सिंगल खोली पुरत नाही ?
का गाडीमधून फिरायला कोणी मैत्रीण मिळत नाही ?

**मारोतराव :** ओफ्, रगाड.

**राजा :** मग नाकापेक्षा जड मोती हे का म्हणून घेतात ?
एवढी शहाणीसुरती माणसं मुळी लग्नच का करतात ?

**मारोतराव :** (पाईपचा धूर सोडीत) गहन समस्या आहे बोवा.

**राजा :** मारोतराव–

घरी यायला तुला उशीर झाला म्हणून कोणी जाब विचारलाय ?

**मारोतराव :** छट !

**राजा :** रंगलेल्या गप्पा मोडून तुला कोणी आंघोळीला पिटाळलाय ?
**मारोतराव :** हं हॅ, काय वेड ?
**राजा :** पिशव्या घेऊन रेशनसाठी तुला कोणी रांगेत उभं केलंय ?
**मारोतराव :** (राख झटकीत) नॉन्सेन्स
**राजा :** खरेदीसाठी भर दुपारी तुझी कोणी धिंड काढलीय ?
**मारोतराव :** ओफ्. लिली
**राजा :** मग सगळं सोसून पांढरा हत्ती हे घरात का आणतात ?
एवढी शहाणीसुरती माणसं मुळी लग्नच का करतात ?
**मारोतराव :** तोबा रे तोबा. बरं झालं मी लग्न केलं नाही.
**राजा :** मारोतराव, मारोतराव, अरे! तू लग्न केलं नाहीस म्हणूनच—

बेटा तू झालास गरूड, आणि आम्ही उरलो गारुडी
तिनं ढोलकं बडवताच आम्ही जाळातून मारतो उडी
तू आहेस जंगलचा शेर, आम्ही झालोत मोहरमचे वाघ
आम्ही शेपूट हलवतो बघून तिच्या नाकावरला राग

**मारोतराव :** ओफ्, अरे पण हे सगळ का ?
**राजा :** काऽऽ ? कारण काय सांगू रे मारोतराव–अरे विचार विचार यांना–

अरे कळतं पण वळत नाही म्हणून हे असे तोंडघशी पडतात
एवढी शहाणीसुरती माणसं म्हणून निमूट लग्न करतात

(कोचावर कोसळत) दुसरं काय करणार बिचारे ! काय हो !
**मारोतराव :** हूऽऽ. मग आता पुढचा विचार !
**राजा :** विचार काय ! ती घरातून गेली तर मी निघालोच हिमालयावर. येऊन जाऊन प्रश्न राहिला या घराचा. तो हे आमचे दोस्त–
**मारोतराव :** ओफ घराचा प्रश्न राहिला नाही. घर तुमच्या हातून जाणार.
**राजा :** ( दचकून, सावरून बसत ) काय काय काऽय ? घर जाणार ? म्हणजे ?
**मारोतराव :** टेक इट इझी राजाभाऊ-बँकेनं कोर्टाकडं घराचा कब्जा मिळविण्यासाठी डिक्री मागितलीय.
**राजा :** (ताडकन उठत घाबरून) अरे पण तू मला कबूल केलं होतंस–

**मारोतराव :** सॉरी. काहीही व्यवस्था होऊ शकली नाही दुसरी.

**राजा :** (चिडून) नॉन्सेन्स. हे तू मला आता सांगतो आहेस ? अगदे थंडपणानं सुनावतो आहेस.

**मारोतराव :** डोक्यात राख घालून काय होणार आहे ?

**राजा :** (त्याचे खांदे धरून घुसळत ओरडून) असं नाही चालणार मारोतराव, काहीतरी मार्ग काढला पाहिजे...तिला कळायच्या आधी कोठून तरी पैसा उभा केला पाहिजे. थांब थांब ..इथं बोलू नकोस...आधी माडीवर चल...गळा कापलास रे माझा...मारोतराव...मारोतराव - मारोतराव...आता धरणीकंप..., नक्कीच प्रलय...संभाजीसारखे हालहाल होऊन माझे मरण ...

[असे ओरडत राजा घाबऱ्याघाबऱ्या मारोतरावचा हात धरून त्याला फराफरा जिन्यातून वर ओढून घेऊन जातो. मारोतराव 'अरे...अरे पण अरेच्या...' म्हणतो आहे तोच जिन्याच्या तळाशीच आडून ऐकत उभ्या असलेल्या व्यंकट-रावांची आणि त्यांची टक्कर होते. व्यंकटराव तोल जाऊन 'अरे. अरे...काय होऽ...समोर बघून चाला की असे किंचाळत कोलमडत खाली येतात. तेवढ्यात आतल्या दाराआड कान देऊन उभे असलेले दासोपंत लगबगीने बाहेर येत 'हळू, हळू, हळू...मुरगळला बिरगळला नाही ना पाय ?'' असे उद्गारत व्यंकटरावांना सावरून उभे करतात. तेवढ्यात वरून तिलोत्तमा बाई येतात. त्यांना पाहताच—]

**व्यंकटराव :** (पाय चोळत चोळत उसळून) लागल्या तू कशाला इथं तडफडलीस ?

**तिलोत्तमा :** बघा बाई ! म्हणजे धडपडलात तुम्ही—

**व्यंकटराव :** म्हणून काही प्राण नव्हता चालला माझा. अग, वर ती दोघं काय बोलताहेत हे नीट चांगलं ऐकायचं सोडून—

**तिलोत्तमा :** एवढा जीव घाबरा व्हायला नको. मन्याला खिडकीशी कान देऊन उभा केलाय मी. तो सगळी बित्तंबातमी देईल.

**दासोपंत :** आता बातमी देण्यासारखं उरलंय काय ? सगळा निकाल लागलाय.

**व्यंकटराव :** तुम्ही ऐकलंत ना सगळं दासोपंत !

**दासोपंत :** अरे म्हणजे काय प्रश्न आहे ? अगदी प्रारंभापासून हा इथं दाराशीच तर दबा धरून बसलोय मी.

[ तोच आतून पदराला ओले हात पुसत सोनूताई अधीरतेने 'काय झालं?... काय झालं?' अशी पृच्छा करीत येतात– ]

**तिलोत्तमा :** आता काही व्हायचं बाकी म्हणून उरलं नाही सोनूताई. फक्त दिवाळं काढायचं राहिलंय.

**सोनूताई** सगळ्यांचं वाटोळं केलं ना! (चुकचुकत) काय म्हणावं या माणसांना तरी...

**दासोपंत :** काही म्हणू नका. आता सामान बांधा आणि (चुटक्या वाजवीत) आधी पळा या घरातून. नाहीतर जामीन राहावं लागेल बरं व्यंकटराव.

**व्यंकटराव :** अरे ती बातच सोडा. भाऊ झाला म्हणून काय झालं? धर पाय आणि कर म्हणावं प्रार्थना त्या मारुतीची आणि घटिंगण गुरुजींची.

**तिलोत्तमा :** अस्सा तिळपापड झालाय माझा सोनूताई की, त्या घटिंगणाला आणि या मारोतीला धरावं नि जळक्या लाकडानं चांगलं ठेच ठेच ठेचावं...

**दासोपंत :** (तपकीर ठाशीत) पण काही म्हणा व्यंकटराव, हे दोन्ही महाठक आपल्यापेक्षा भारी निघाले. अहो बोल बोल म्हणता ते गेले लोणी खाऊन आणि आपल्या हाती ठेवले फक्त रिकामे द्रोण.

**सोनूताई :** त्यात नवल काय? नेहमीचंच आहे. लोक जातात लोणी खाऊन आणि तुम्ही होता रिकामे द्रोणाचार्य (फणकाऱ्याने) काही बोलू नका.

**दासोपंत :** (शिंक देत) राहिलं. (तपकिरीची बोटे कोचाला पुसत) पण मंडळी, आता याला हरकत असायचं काही कारण उरलं नाही.

[तोच मधुराणी आतून येते आणि–]

**मधुराणी :** (दारातच थबकून) इश्श! तुम्ही सगळे इथंच का आहात? मी आपली मागीलदारी शोधतेय. चला, जेवायची पानं मांडली आहेत, आणि 'हे' कुठं गेले इतक्यात?

**सोनूताई :** माडीवर खलबतं चाललीत त्यांची मारोतरावांशी.

**मधुराणी :** (गोंधळून) खलबतं? कसली खलबतं? मी...मी नाही समजले...

[सगळं चुपचाप होऊन एकमेकांकडे बघायला लागतात आणि 'तुम्ही सांगा... तुम्ही सांगा' अशा अभिप्रायाच्या परस्परांना खुणा करायला लागतात. त्याच वेळी जिन्यातून संथपणे राजा आणि मारोतराव खाली येतात आणि ही परिषद भरलेली पाहून जिन्यातच थबकतात. अखेर सोनूताई हिय्या करून पुढे होत म्हणतात– ]

**सोनूताई** : एवढं भ्यायच काय कारण आहे ! मी सांगते मधूऽऽ...

**दासोपंत** : जाऊ द्या–जाऊ द्या...मंडळी, राजाभाऊंनी सगळा पैसा सिनेमावर उडवला असेल, पण ज्यांचे ते बघून घेतील. तुम्हांला काय करायचंय ?

**सोनूताई** : (डोळे वटारीत नि दटावीत) तुम्ही जराऽऽ

**दासोपंत** : (शिंक देत) राहीलं.

**मधुराणी** : (घाबरून) काय म्हणालात ? यांनी ? सगळे पैसे सिनेमावर उडवले ?

**तिलोत्तमा** : तेवढ्यानं काय झालंय ? आम्हाला कोऽणाला न विचारता हा बंगला देखील बॅंकेकडे गहाण टाकलाय, ठाऊक आहे !

**मधुराणी** : (धक्का बसून) घर ? हे घर ! बॅंकेकडे गहाण ? नाही–नाही...

**दासोपंत** : (तपकीर ठाशीत) विश्वास नसेल तर बॅंकेच्या मॅनेजरला जाऊन विचारा. आम्ही तिथूनच शिताफीनं बातमी काढून आणली होती. काय होऽ ?

[सोनूताई डोळे वटारून काही दरडावणार तोच शिंक देत–]

राहिलं.

**व्यंकटराव** : सगळ्या घरादाराचा हरामखोरानं सिनेमा केला.

**दासोपंत** : रंगीत. तोही लेकाचा पडला, पाऽर बुडाला देखील.

**तिलोत्तमा** : आता त्यातली दिडकी कोणाच्या हाताला लागायला नको.

**मधुराणी** : (रडवेली होत) पण...पण...कसं शक्य आहे ते ?

**सोनूताई** : का ? तू नाही महाराणीच्या थाटात शाळेवर पन्नास हजार उधळलेस ?

**दासोपंत** : अरे तेवढ्यात आम्ही भिलवडीला झकास पिठाची चक्की नसती घातली ? (सोनूताईंची मुद्रा पाहात, शिंक देत) राहिलं. नसती...नसती चालवली ?

**मधुराणी** : म...म...मला नाही अजून खरं वाटत.

**व्यंकटराव** : नाहीच वाटायचं. घराचा कब्जा घेऊन बॅंकेच्या लोकांनी तुम्हा दोघांना नेसत्या वस्त्रानिशी रस्त्यावर काढलं म्हणजे–

**राजा :** (संतापाने) दादा–तोंड संभाळून बोला. माझ्या घरात उभे आहात तुम्ही.

**मधुराणी :** (धावत जाऊन पाणावलेल्या डोळ्यांनी त्याला पकडीत) खरं आहे हे ? सिनेमात तुम्ही आपले पैसे गुंतवले होतेत ?

**राजा :** (शांतपणे) होय.

**मधुराणी :** (थरथरत ओरडते) पण काऽऽ ? काऽ ?

**राजा :** शांत हो राणी–मी तुला नंतर सगळं सांगतो.

**मधुराणी :** (ओरडून) पण मला का नाही विचारलंत आधी ?

**राजा :** (चिडून) शाळेला देणगी देताना तू विचारलं होतस का मला ?

**मधुराणी :** (मटकन बसून तळव्याने तोंड झाकून स्फुंदत ) म्हणून असा सूड घेतलात तुम्ही माझ्यावर ?

**मारोतराव :** (पुढे येत) वहिनी, झालं ते झालं. आता माझी योजना अशी आहे की—

**राजा :** (चिडून) बस झाल्या तुझ्या योजना. कोपरापासून नमस्कार करतो. मेहेरबान. आता मुकाट्यानं जा, म्हणजे पावलं आम्हांला सगळं काही.

[ मारोतराव खांदे उडवतो आणि – 'टेक इट इझी' असे हसत उद्गारत निघून जातो. ]

**व्यंकटराव :** सूड हिच्यावर नाही – सूड उगवलाय आमच्यावर.

**दासोपंत :** तर काऽय ! अरे केवळ्याऽ आशेनं आम्ही इथं आलो होतो. पण राजाभाऊ, तुम्ही दोघांनी आमच्या तोंडचा घास काढून घेतलात.

**राजा :** (थक्क होत) आम्हीऽ !

**व्यंकटराव :** हो, हो तुम्ही. तुम्हीच आमची स्वप्नं पार धुळीला मिळवलीत.

**राजा :** वा वा.

**तिलोत्तमा :** 'वा' 'वा' काय ? आम्ही म्हणत होतो, तांबे कुळातला एक तरी मुलगा विलायतेला जाईल आणि शिकूनसवरून नाव काढून येईल.

**सोनूताई :** तर काय ? अजून आमच्या मुलांची शिक्षणं व्हायचीत, लग्नकार्यं व्हायचीत...

**राजा :** (उसळून) काय हो बाईसाहेब–त्या सगळ्यांचा पत्कर आम्ही घेतलाय वाटतं !

**दासोपंत :** म्हणजे काय ? सरळ आहे.. ओघानंच आलंय ते. अरे इतका पैसा मिळवलांत, काय बिघडलं नातेवाइकांसाठी रुपयात चार आणे जकात दिली म्हणून ?

**तिलोत्तमा :** असे नातेवाइकांचे तळतळाट घेता म्हणूनच देवानं मूल दिलं नाही तुम्हा...

**राजा :** (कडाडतो) तोंड आवरा वहिनी. या घरात ही भाषा ? मुकाट्यानं मुलांची पार्सलं उचला आणि चालायला लागा. आमचं आम्ही पाहून घेऊ.

**व्यंकटराव :** ही मिजास काय ? ठीक आहे. मूंढळी आवराआवर करा. आत्ताच्या आता बिऱ्हाड बदलायचं [ तरातरा वर जाऊ लागतात तोच– ]

**तिलोत्तमा :** निदान जेवून जाऊ या म्हणते मी. स्वयंपाक झालाय.

**व्यंकटराव :** (थबकून वळून) ठीक आहे. आधी पानं वाढा आणि मग तयारी करा. बघू या कोणता मायेचा पूत याला जामीन राहातोय तो.

[ व्यंकटराव वर जातात. तिलोत्तमाबाई स्वयंपाक घरात जातात. ]

**मधुराणी :** ( गांगरून ) अहो...अहो, ... त्यांना आधी आवरा ... त्यांची आधी समजूत घाला... पाहुणे आहेत आपल्या घरी ते.

**राजा :** त्यांनी मर्यादा सोडलीय. खुशाल जाऊ देत. मला पर्वा नाही कोणाची.

**दासोपंत :** ( लुब्रेपणाने ) हे हे हे, तुम्ही त्यांना...त्यांनाच म्हणालात, आम्हांला नाही, होय ना राजाभाऊ ?

**सोनूताई :** ( दंडाला धरून नेत ) तुम्हांला काही स्वाभिमान आहे का ? चला अगोदर–माझ्या पातळाच्या घड्या करा, मुलांचे कपडे आवरा नि होल्डाल बांधा.

**दासोपंत :** अहो...अहो...पण

**सोनूताई :** ( ओढून नेत ) दोन घास गिळा आणि गाडीत जागा धरायसाठी आधी स्टेशनवर चला.

**मधुराणी :** ( व्याकूळपणे ) थांब ताई, थांब ताई, थांब – माझी शपथ आहे तुला – गोट्याला तू घेऊन जाणार ?

**सोनूताई** : (जाता जाता दाराशी थबकून) नाहीतर काय? इथं माधुकरी मागायला का त्याला ठेवू?

**मधुराणी** : (दादोपंत आणि सोनूताई जातात, त्यांच्यामागे धावत) ताई, ताई, ताई...

**राजा** : (मधुराणीचा हात ओढून) मागं फीर राणी, मागं फीर. यांचं प्रेम माणसावर नाही, पैशावर आहे पैशावर.

**मधुराणी** : सोडा माझा हात. जाणत्या माणसांनी मूर्खपणा केला म्हणून त्याची शिक्षा मुलांना का? गोठ्याची माया पैशावर आहे? बेबी तुम्हांला काय पैशासाठी विकली आहे?

**राजा** : तुला ठाऊक नाही राणी.

**मधुराणी** : (फणकाऱ्याने) काही बोलू नका—तुम्हीच पैशाचा चुराडा केलात म्हणून...

**राजा** : (तिचा हात हिसडून तिची वाट अडवीत) पैसा पैसा काय करतेस? आणखी दोन-चार चित्रांना संगीत देईन तर गेलेला सगळा पैसा मी परत मिळवीन.

**मधुराणी** : तुम्ही गेलेला पैसा परत मिळवाल, पण घरातून ही मुलं एकदा गेली म्हणजे पुन्हा माझ्या दृष्टीला देखील पडायची नाहीत.

**राजा** : (ओरडून) म्हणून काय त्या चोरांना शरण जाणार आहेस तू?

**मधुराणी** : काहीतरी बोलू नका. माझी वाट सोडा. शरण जायला मुलं काय शत्रू आहेत आपली?

**राजा** : (थयथयाट करीत) मुलं—मुलं—मुलं. या मुलांच्या पायी तुला वेड लागलंय वेड.

**मधुराणी** : खरं आहे. पुरुषाला पैसा वेड लावतो नि स्त्रीला मुलं वेडी बनवतात.

[तोच गोरा आतून पाहुण्यांचे होल्डाल, ट्रंका, गाठोडी इत्यादी सामान घेऊन येतो. त्याला पाहताच मधुराणी किंचाळते.]

गोराऽ हे काय?

**गोरा** : समदी पावनं मंडळी आताच जायचं म्हनत्यात.

**मधुराणी** : (किंचाळत) ताई... [आत धावत जाते.]

**राजा :** ( ओरडून ) राणी, राणी...रा...

[ रागाने दाराशी थबकतो आणि संतापाने फडाफडा दोन तोंडात मारून घेतो. त्याच वेळी गोरा हातातले सामान दाराशी दाणकण आदळतो. राजा वळून बघतो तशी गोरा हसतो. राजा चिडून ओरडतो – ]

हास, हास–लेको हसाऽऽ पण आताऽ! आता काय करणार !
**गोरा :** ( परत जाता जाता थबकून ) आता काय ? पावनं जायचं म्हनत्यात तर जाऊ द्याऽऽ. तुम्ही कशापाई डोक्यात राख घाल्लाय !
**राजा :** अरे शहाण्या पण –
**गोरा :** खरं सांगू का सायेब ? ह्यात काय बी अरथ नाय. अवोऽ आमच्यांत म्हन हाय... 'पैका मिळवावा कस्टाचा आन पोर संबाळावा पोटचा'. हे चिखलाचे कुल्ले, त्ये काई चिकटनार हैती !
**राजा :** (अंगावर धावून जात) गाढव आहेस, मूर्ख आहेस.

[गोरा पळून जातो. राजा प्रेक्षकांकडे वळत]

हा हा गोरा गाढव आहे, मूर्ख आहे, पण खरं बोलतोय. होय की नाही ? दोस्त आमचे पाहुणे पळाले तरी तुम्ही इतक्यात पसार व्हायचं नाही हं. अहो हा गुंता सुटायला आता आम्हाला तुमचाच आधार. गड्यांनो, हा गुंता कसा सुटेल तो सुटो, पण आता तरी तुमची खात्री पटली की नाही ? की...

**'या गोजिरवाण्या घरात माणसाना लागलंय खूळ**
**यातली गोम अशी आहे की आम्हाला नाही मूल'**

[ पडदा ]

# अंक तिसरा

[दुसऱ्या अंकातील बडामोडीनंतर चार-सहा महिन्यांचा काळ उलटला आहे. तोच दिवाणखाना. पण पाहुणे निघून गेल्यानंतर या दालनाची कळा खूपच बदलली आहे. तीच स्वच्छता. तीच टापटीप आणि तीच सौंदर्यदृष्टी. पण आता इथे पूर्वीची सुबत्ता आणि रेलचेल दिसत नाही. निव्वळ शोभेच्या, सजावटीच्या आणि काही उपयोगाच्या बऱ्याच वस्तू अन्तर्धान पावल्या आहेत. जणू चंचल वृत्तीच्या लक्ष्मीची या घरावरली मेहेरनजर आता ओसरली आहे आणि सांदीफटीतून दारिद्र्य चोरपावलाने घरात शिरू लागले आहे. वाद्ये नाहीशी झाली, रेडिओग्रॅम गेला, कपाटाची उचलबांगडी झाली, नर्तकीचा पुतळा पसार झाला, शोकेस गुप्त झाली, आणि गालीचे, गाद्या-गिरद्यादेखील गायब झाल्या.

संध्याकाळची वेळ. पडदा वर जातो त्या वेळी रंगमंच मोकळा आहे आणि बाहेर फाटकापाशी गोरा कोणावर तरी शिरा ताणून तणतणतो आहे.

‘ –लई शानपणा नका दाकवू राव, मुकाट रस्ता सुदरा. मंग? तुमची तरी बोलायची ही काय रीत जाली? जरा पद्तीनं बोला की… भाजीवानी बंगला काय इकायसाटी मांडून बसल्योत आमी? अरं आमी काई दिवाळं न्हाय काडलं…’

ते ऐकून मधुराणी घाबऱ्या घाबऱ्या आतून बाहेर येते आणि दाराशी जाऊन न्याहळते आणि– ‘गोरा…गोरा…आधी इकडं ये बघू…’ अशी

हाकारते. गोरा फाटकातूनच 'आलू आलू जी ऽऽ' अशी ओ देतो आणि पुन्हा खेकसून म्हणतो–'...पोस्टमास्तरनं लाख सांगितलं पर तुमास्नी काई डोस्कं हाय का न्हाय? का पैका मिळाला मंजी बुद्दी बी फिरली! बरं मानसं न्हातात या बंगल्यामंदी–जनावराचा गोठा नवं हा गुदाम घालाया...जावा जावा निमूट घराला जावा...रिक्कामा आगाऊपना करायचा मंजी काय...'

मधुराणी अस्वस्थ होऊन ओरडते–'गोरा ऽऽ'

बहुधा तिच्या दरडावणीला भिऊन गोराने फाटकातले पर्व आटोपते घतले असावे. मधुराणी उद्विग्न मनाने माघारी फिरते. तिची कोठे बाहेर जाण्याची तयारी असावी हे तिच्या मुद्रेवरून, कष्टाच्या संथ हालचालीवरून आणि गळ्याला लपटलेला मफलर नि अंगावर घेतलेली शाल यावरून लक्षात येते. तेवढ्या श्रमानेही मधुराणी थकते आणि बसते. तेवढ्यात गोरा फणफणत पुटपुटत येतो आणि– ]

**मधुराणी :** टांगा आणलास?

**गोरा :** आनला.

**मधुराणी :** कोणावर शिरा ताणून तणतणत होतास एवढा फाटकाशी!

**गोरा :** त्यो त्यो धान्यवाला इच्छारामभाई. लई मस्तीत बोलत व्हता. लावला त्येला डाफरून पिटाळून.

**मधुराणी :** ते पाहिले मी. पण जरा मवाळकीनं बोलला असतास तर—

**गोरा :** (उसळून) मवाळकीनं? फाटकामंदी हुबं ऱ्हाऊन ह्यो बंगला इकायचाय काय म्हनून इचारतोय शाना मला. त्येला गुदाम घालायचं हायं म्हनं, माजं तर डोस्कंच गेलं एकदम कामातून.

**मधुराणी :** अरे, पण तुला डोक्यात राख घालायला काय झालं? कोणी तरी बातमी दिली असेल त्याला म्हणून–

**गोरा :** कोनी तरी न्हाय. आपल्या व्यंकटदादानीच गावभर बोंब केलीया. मला हाय ठावं.

**मधुराणी :** शक्य आहे. पण–

**गोरा :** परवापून दहा इसम इचारून गेले–"बंगला इकायचा का–बंगला

इकायचा का?" म्हणलं "इकायचा! तुजी समदी पोरं आणून घाल पदरात आन उचल ह्यो बंगला!"

**मधुराणी :** ( दुखावून ) गोराऽऽ

**गोरा :** तर काय बाई–अवो हौशीनं मानसं घरं बांदत्यात त्ये काई इकायसाठी?

**मधुराणी :** अरे, तशीच पाळी आल्याशिवाय कोणी घर विकायची भाषा काढील?

**गोरा :** काईतरी बोलू नका. तसं काय बी आकाश फाटलं न्हाय.

**मधुराणी :** ते तुला ठाऊक की मला?

**गोरा :** भाजं ऐकून ठिवा बाई, म्हमईहून सायेब रग्गड कामधंदा घेऊन येत्याल आज आन समद्यांचं देणं–

**मधुराणी :** जे चार महिन्यांत झालं नाही ते आज चमत्कारानं घडणार आहे वाटतं?

**गोरा :** आता अंडं उबायचं मंजी येळ लागायचाच की!

**मधुराणी :** पंधरा दिवस झाले तुझ्या साहेबांना मुंबईला जाऊन, ठाऊक आहे?

**गोरा :** मंजी काय फरारी जाले? कागद धाडतातच की रोजच्या डाकेला

**मधुराणी :** हो–आणि कोरड्या आशेची पानं पुसताहेत. आज येतो नि उद्या येतो. अमक्याशी करार होणार आहे नि तमक्याशी करार झाल्यासारखाच आहे. हातात पुन्हा काही नाही ते नाहीच.

**गोरा :** इकता धीर सोडून कसं निभल बाई?

**मधुराणी :** पूर्वी माणसं घरात खेटे घालायची. आता यांना उंबरठे झिजवायची पाळी आलीय दुसऱ्याचे.

**गोरा :** आता धंदा म्हनला की माणसाला ऊनपावसात भिजायाच होवं.

**मधुराणी :** काही सांगू नकोस. हा सिनेमाचा धंदाच वाईट. एक चित्र चाललं की लोक डोक्यावर घेतात नि दुसरं पडलं की तीच पायाखाली तुडवतात.

**गोरा ;** जगाची तऱ्हाच हाय तशी–

**मधुराणी :** इथली श्रीमंती म्हणजे आळवावरचं पाणी. आज आहे नि उद्या नाही. त्यावेळी सिनेमा काढायच्या फंदात पडले नसते हे तर आज कशाला ही पाळी येती?

**गोरा :** आता इतकं ठाषं हाय तर बाई साळंला पैका द्यायचं तुमचं तरी काय नडल व्हतं ?

**मधुराणी :** ( फणकाऱ्याने ) तूच तेवढा बोलायचा राहिला होतास.

**गोरा :** समद्या वस्तू बी खुशाल फुकट वाटून टाकल्यात.

**मधुराणी :** म्हणून तुझं पित्तं उसळलंय वाटतं !

**गोरा :** उसळल न्हाईतर काय ? तुमास्नी माणसं बी अशी नंबरी भेटल्यात— त्यो धटिंगण गुरुजी. साळं साटी कपाट लांबविलं व्यंकटदादांनी रेडिओ मागून नेला, सोनूताईनं गालीच्या न गाद्यागिरद्याबी लंपास केल्या आन मारोतरावानं समदी वाद्य दोन दिवसांसाटी नेली त्येचा काय पत्याच न्हाय.

**मधुराणी :** कोण्णी काही लांबविलं नाही अन् लंपास केलं नाही. मीच देऊन टाकलंय सगळं. तेही तुझ्या साहेबांना विचारून, समजलास ?

**गोरा :** साहेबांचं नका सांगू. त्ये तर स्वतःलाच कुटं तरी हरवून बसल्यात. म्या म्हनतू, न्हाइल्या असत्या समद्या चिजा घरामंदी तर काय खाया मागत व्हत्या ?

**मधुराणी :** (उठत जाण्याची तयारी करीत) उद्या दोन खोल्यांत बिऱ्हाड मांडायची पाळी येईल तेव्हा ठेवायच्या कुठं या चिजा ? माझ्या डोक्यावर का तुझ्या ?

**गोरा :** अवो पर–

**मधुराणी :** अरे, आपल्याकडं नाही तरी दिल्या घरी तरी नीट रहातील सगळ्या वस्तू आणि कधीतरी डोळ्यांपुढं दिसतील त्या मला.

**गोरा :** (रागाने) मग आता सामानाची वाट लावलीत तसं मला बी योक दिवस बाहिरचा रस्ता दावा मंजी–

**मधुराणी :** अरे, खर्चंच झेपेनासा झाला तर –( जीभ चावते नि घुटमळते )

**गोरा :** ( संतापाने ) काय बी जीभ चावू नका. बोलून टाका मनची मळमळ. सांगा मला–उचल तुजं सामान आन हो घराबाहीर...

**मधुराणी :** ( शरमिंदेपणाने ) तसं नव्हे रे गोरा–

**गोरा :** तसं न्हाइतर कसं ? तुमाला काई मानसाचं मोल हाय ! जसं कपाट, जसा रेडिओ तसा गडी मानूस. नको जाला की दिला टाकून.

**मधुराणी :** ( काकुळतीने ) रागाऊ नकोस. तसं म्हणून नाही रे बोलले मी गोरा. अरे उद्या खरंच दोन खोल्यांत राहायची पाळी आली तर–

**गोरा :** त्ये काय बी सांगू नका. ह्यो बंगला बांधायच्या आदी दोनच खोल्या व्हत्या तुमच्या. त्ये काळी बी ह्यो गोरा घरामंदी रगताचं पानी करून राबायचा आन म्होरल्या पडवीत पडायचा. तुमी इसरलात समदं .. [गहिवरतो.]

**मधुराणी :** (डोळे पाणावून) नाही रे गोरा, मी काही विसरले नाही. अरे त्या वेळी दोन खोल्यांतदेखील किती सुखी होतो आपण–

**गोरा :** सूक लावून घ्येतलं तर झाडाखाली बी लागतं न्हाईतर राजाच्या म्हालात गालिचावर बी काटंच मोडत्यात पायांत !

**मधुराणी :** (भारावून) खरं बोललास रे गोरा. माझ्या प्रकृतीमुळं किनई माझं मनच ठिकाणावर राहात नाही अलीकडं. रागावलास ? माझ्यावर ? अरे मी चुकले. वेड्या, वाटल्यास मी तुझी–

**गोरा :** (विरघळून पण दटावीत) कवतिक पुरं जालं. डागतरकडं जायाचं हाय का न्हाय ? टांगा कवाचा खोळावलाया बाहीर.

[मधुराणी क्षणभर भारावून पाणावलेल्या डोळ्यांनी बघते. गोरा मुष्किलीने अश्रू आवरतो आणि मग मधुराणी पायांत चपला घालता घालता म्हणते–]

**मधुराणी :** एखादे वेळी जनता एक्स्प्रेसने येतील बरं का हे.

**गोरा :** येत्याल तर येऊ द्यात. काय उबड्यावर पडत न्हाईत. म्या हाय घरामंदी. तुमी जावा आदुगर. नीट औशदपानी करा, आन डागतरला सांगा म्हणावं पैक्याकडं काय बी पगायचं न्हाय. आमचा गोरा पगून घेईल समदं.

**मधुराणी :** (पाणावलेल्या डोळ्यांनी हसत) होय होय होय ! अरे तुझ्यावाचून कोण बघणार. येते हं. (मधुराणी जाते. गोरा प्रेक्षकांपुढे येऊन चंची सोडून उकिडवा बसत–)

**गोरा :** उगाच फालतू गप्पा मारायच्या मंजी काय ? (प्रेक्षकांना) बसा बसा. निचितीनं बसा. म्या सांगतू सायेब आज नक्की येत्याल. आन न्हाय आलं तर म्या बसलू हाय की तुमच्याशी गप्पागोष्टी करीत. माज्यावानी गडीमानसाशी बातचीत केली म्हून इज्जत तर न्हाय ना जात कुनाची : हाँ–तसं असल तर शाप सांगा. म्या बागत जाऊन बसन. तसं नाय. राग धरू नका. मंजी काइ काइ मानसं येत्यात मोठ्या इश्याकीत येस फ्येस करीत. योक शबुद बोलाबा तर कपाळाला ह्ये टीगभर

आव्या? का रे बाबा? न्हाय, तुमी न्हाय त्येतलं. मला ठाव हाय. तुमी मानसं लई नंबरी. काई पै पैसा मागायचा न्हाय, चापानी घ्यायचं न्हाय, एक का दोन काइ बी बोलायचं न्हाय, नुस्तं निमूट टकटक पगत बसायचं आन समदं हसन्यावारी घालवायचं. लई ब्येस! पटलं राव! मानला तुमचा शानपना! पर ह्ये आमाला कसं काय जमायचं? अवो, आमचं मालक आन मालकीन मंजी लोणकडं तूप हाय तूप. लोणकडं तूप खाल्लंय का कंदी? नसल! अवो ये दिसांत निर्मळ दूध दिसायची मारामार मग लोणकडं तूप कुटून भेटणार? कसंऽऽ? तशी नवराबायकू मंजी द्येव मानस पगा. पर वेव्हार नाय. अवो दुनियेमंदी मानसानं इतकं ग्वाड न्हाऊन कसं निवल. लोकं काय – गुळाची ढेप गावली रे गावली की चिटकलीच डोंगळ्यावानी. ओडलं तर मुंडकं तुटल परं डोंगळा सुटायचा नाई! पगा की समद्यांनी लचके तोड तोडून ह्यो दिवानखान्याचा कसा पार कबुतरखाना करून टाकलाय त्यो! कुटं हाय का पूर्वीची सोबा? माजं तर राव केर काडाया बी मन लागत न्हाय आता. द्येव एका हाताने देतू आन दुसऱ्या हातानं काडून घेतूं म्हनत्यात ते असं! कसंऽऽ? द्येव तरी पगा असा द्वाड हाय–नको तिथं पोरांची फलटणच्या फलटण धाडतो. येक येक नवरा बायकू अशी टेकीला येत्यात राव–वर्सावर्साला पाळणा. 'नगं नगं नगं' म्हनत्यात तर द्येव म्हनतो–'नग कसं? घे! घे! घे!' आन मग या बयेला इतकी पोरांची हौस तर ततंच हात कारे आकडतो तुझा! ऑं? परवाच्या आषाढीला वारीला जाऊन आलू म्या पंडरीला. ततं दर्सनाच्या येळी इठ्ठलाला शाप सांगून आलोया. म्हनलं–काय माजी पुन्याई साटली असंल तेवढी समदी खर्ची टाक आन मुकाट योक तरी नग धाडून दे या बयेच्या पोटी. न्हाईतर मंग बग...तर काय राव, द्येवाचं तरी फुक्कट कवतिक कुटवर करायचं?

[तो बाहेरून राजा हातात सूटकेस घेऊन उत्साहभराने 'किती गोड बाई बाळ जसे कमल उमलले...' ही ओळ गात धावतच येतो. गोरा टुणकन उडी मारून उठतो आणि धावून बॅग घेतो...]

**राजा :** ( प्रेक्षकांना पाहून अभिवादन करीत ) आदाबरस मंडळी आदाबरस! राणी राणी–

**गोरा :** काय आलं सायेब ? जमलं ?

**राजा :** अरे जमलं म्हणून काय विचारतोस ? राणी कुठाय–बोल आधी राणी कुठाय ?

**गोरा :** बाई भाईर गेल्याती. येत्याल इकत्यात.

**राजा :** हॅऽऽट. सगळा विरस केलास तू माझा.

**गोरा :** (आनंदून) आ–लई उकळ्या फुटल्याती ? कामधंदा बक्कळ गावलेला दिसतू !

**राजा :** कामधंद्याची गोष्ट सोड रे. तकदीरमधे असेल ते होईल.

**गोरा :** (सर्द होत) आऽऽ ?

**राजा :** (प्रेक्षकांना) पण दोस्त हो–आज गाडीतून येताना मी एक इतकं छान सुंदर गोजिरवाणं बाळ पाहिलं म्हणून सांगू–

**गोरा :** लोकांचं ?

**राजा :** नाही तर काय माझं ? ग्रेट आहेस तू गोरा. यार हो इतकी गोंडस बछडी मी तरी आजन्मात पाहिली नाही. अरे बायकोच्या प्रेमात पडायला देखील तब्बल वर्ष लागलं होतं मला. पण त्या चिमुकलीनं पहिल्या दृष्टीक्षेपात ठार केलं मला. एकदम लव्ह ॲट फर्स्ट साईट !

**गोरा :** आता ह्ये बाईंन जवळ बोलू नका, न्हाईं तर–

**राजा :** तुझ्या खांद्यावरलं डोकं माणसाचं आहे का माणसाचं आहे रे गोरा ? मी त्या दोन वर्षांच्या छकुलीबद्दल म्हणतोय–तिच्या आईबद्दल नाही.

**गोरा :** तसं नव्हं पर–

**राजा :** तू आपला छपरावर जाऊन कौलं धूत बैस ! (प्रेक्षकांना) राणीची इतकी दर्दभरी याद आली म्हणून सांगू गड्यांनो ! अरे राणीच्या नुसत्या दृष्टीला ती चित्रासारखी सुंदर बाहुली पडली असती तर लागलीच धावून तिला कडेवर घेऊन माझ्यासारखी ती थयथया नाचली असती, बागडली असती आणि गात गात म्हणाली असती–

**'किती गोड बाई बाळ असे कमल उमलले...**
**ओठांच्या पाकळ्यांत ब्रह्म साठले...'**

**गोरा :** पुरं पुरं. आता बाईंच जमिनीला पाय लावा आन सांगा च्यापानी करायचा काई इचार हाय का न्हाय ?

**राजा :** (कोचावर बैठक मारीत बूट काढीत) आण आण–फक्कड चहा घेऊन ये. आज मी खूष आहे गोरा. आभाळात तरंगतोय. बोल बेटा, मी तुझं कोणतं प्रिय करू ?

**गोरा :** बा आणीस्तोवर हतं पोरं जमवून धुडगूस घालू नका मंजी समदं पावलं.

**राजा :** अरे अरे अरे ! चंदनाच्या शेजारी रुजलास पण बाभळीसारखा रुक्ष माजलास रे तू गोरा.

**गोरा :** आता बाबळी माजल्यात म्हनून तर घरोघर चुली पेटल्यात.

**राजा :** क्षुद्र झाला आहेस तू गोरा, अगदी डाळतांदूळवादी बनला आहेस.

**गोरा :** (जाता जाता थबकून) दुसऱ्याचं पोर दगून इतकं कानांत वारं शिरलं तुमच्या मग देवानं असं गोड बाळ तुमच्या घरात धाडलं असतं तर काय बो केलं असतंत ?

**राजा :** (टुणकन् उडी मारून उठत) असं गोड बाळ ? आमच्या घरात ? मी काय केलं असतं ? अरे उघड आहे. माझ्यासारखा उलट्या डोक्याचा माणूस दुसरं काय करणार ? खाली डोकं, आभाळात पाय !

**गोरा :** मंजी आमाला दे माय आन धरणी ठाय !

**राजा :** अरे जा जा–मग तुमचा आमचा संबंध काय ?

**गोरा :** बाईंच थांबा, आनतू गरम गरम चाय. [हसत आत पळतो.]

**राजा :** (प्रेक्षकांपुढे येत खुषीत) यार हो–

> **आमचं खाली डोकं वर पाय**
> **मग तुमचा आमचा संबंध काय ?**
> **आम्ही दोघं ठार दिवाणे**
> **घांडोबाचे झालो पाहुणे**
> **प्यार आम्हाला ढगात फिरणे**
> **तुम्ही असाल इथले भले शहाणे**
> **पण–वासरात शहाणी लंगडी गाय**
> **आमचं खाली डोकं आभाळात पाय.**

तुमच्या जगात फक्त पैसा पैसा
छोट्यांना गिळतो मोठा मासा
आम्हांला तर हवाय चंद्राचा ससा
मग आपला हिशेब मुळी जुळणार कसा ?
पण – आंधेर नगरीचा उलटाच न्याय
आमचं खाली डोकं आभाळात पाय

अहो–आम्हाला जडलंय सशाचं खूळ
अन तुम्हाला दिसतेय घरातली चूल
कारण तुमच्या डोळयातच पडलंय फूल
म्हणून–थुंकून टाकताय अमृताची चूळ
आणि–चाखत बसलाय पाण्याची साय
आमचं खाली डोकं आभाळात पाय

[ गोरा आधीच चहाचा कप घेऊन उभा आहे. गीत संपता संपता तोच सूर पकडून तो म्हणतो ]

**गोरा :** (चहाचा कप पुढे करीत) पर निघायच्या आदुगर् घ्या हा चाय !

**राजा :** (चहाचा कप घेत) शाब्बास ! (कप ओठाशी नेतो आणि थबकतो प्रेक्षकांकडे पहात) तुमच्या परवानगीनं घेतो हा चहा. तुम्हांला आवडायचा नाही. अहो बिनसाखरेचा आणि बिनदुधाचा कोरा चहा कोण घेणार ? (फुरका मारीत) झकास ! (तोंड वाईट करीत) सवय झाल्यावर आवडायला लागेल. काय करणार ? रोज पाचपन्नास कप चहा व्हायला लागला घरात. साखरेचे अन दुधाचे काय वांधे चाल्लेत ते बघताच आहात तुम्ही. तेव्हा राणीनं हुकूम सोडला की–(थबकून गोराकडे पहात) गोरा, राणी अजून कशी परतली नाही ? खरेदीला इतका उशीर ?

**गोरा :** खरेदीला न्हाय, बाई दवाखान्यात गेल्याती डाक्तरला तब्येत दाखवाया.

**राजा :** (चमकून घाबरून कप टाकीत डोळे विस्फारून) दवाखान्यात ? डॉक्टरला तब्येत दाखवायला ? कधी ? कशासाठी ? (धावून जाऊन त्याचे खांदे पकडून

घुसळत) काय झालंय तिला ? कशानं आजारी पडली ? डॉक्टरला घरी का नाही बोलावला ? तू का नाही गेलास तिच्याबरोबर दवाखान्यात ? मला का नाही कळविलं ? बोल, बोल—अरे, मी काय मेलो होतो ? तार का नाही केली कोणी मला ?

**गोरा :** इतकं घाबरन्यावानी काय बी जालं न्हाय. डागतर आलं हुतं घरी. बाईनला पगितलं त्यांनीं. पर नीट तपासाया होवं म्हून दवाखान्यामंदी बोलीवलं तर—

**राजा :** (प्रक्षोभाने) म्हणजे सीरीयस-गंभीर आहे प्रकरण गोरा. थंडी पडसं खोकला ताप इतकं साधं नाही. सुई टोचली होती का डॉक्टरांनी ?

**गोरा :** व्हय व्हय पर—

**राजा :** (मटकन बसत) बघायलाच नको—पेनिसिलीन. म्हणजे न्यूमोनिया, मॅनेंजाटीस नाही तर प्ल्यूरसी. दिवसभर निजून रहायची काय रे ती ?

**गोरा :** जी हाँ. पर—

**राजा :** (गडबडून) म्हणजे ताप. ताप अंगावर काढला तिनं (चुकचुकत) टायफाईड देखील असायचा. खराब झालीय का ती फार.

**गोरा :** बाईंच बाईंच...

**राजा :** (किंचाळत) गाढवा मग मला आल्याबरोबर सांगायचं नाहीस ? कोणत्या डॉक्टराकडे गेलीय ती ? सांग सांग लवकर—मला जायलाच हवं तिच्याकडं.

**गोरा :** त्ये मला बी ठावं न्हाय. कुना डागतरीण बाईकडं जानार हुत्या म्हनं.

**राजा :** पण मूर्खा नाव-पत्ता विचारून घ्यायचा नाहीस का डॉक्टरीणबाईंचा ?

**गोरा :** (लाजून) आता म्या बाप्यानं परक्या बाईची इतकी फाजील चौकशी कशी करायची ?

**राजा :** अहाहा—ती काय तुला मागणी घालणार होती वाटतं ? (अस्वस्थतेनें येराझारा घालीत) आता राणी परत येईपर्यंत माझ्या जिवाला चैन पडणार नाही.

**गोरा :** माजं ऐका सायेब—इतकं घाबरंघुबरं होन्याची काय बी गरज नाय. तसं बाई हिंडत्यात फिरत्यात, पर बाईंच मनाला धक्का बसल्यापासून—

**राजा :** (थबकून विस्मयाने) धक्का ? कसला धक्का ?

**गोरा :** आता कसला मंजी काय ? ये पैक्याची भानगड जाल्यापासून बाईंच्या जिवाला काई बी ग्वाड लागत न्हाय.

**राजा :** (थक होत) म्हणतोस काय तू गोरा ?

**गोरा** खरं हाय त्ये सांगतू. खान्यापिन्यात चित्त नाय, कुटं जात-येत न्हाईत, कुनाशी बोलत न्हाईत–आन ह्यो बंगला इकावा लागनार म्हून येता-जाता डोळ्यांत्नं पानी काडत्यात. म्या सांगतू त्येनंच बाई आजारी जाल्या.

**राजा :** (ओरडून) नॉन्सेन्स ! अरे पण तिला या नसत्या काळज्या करायची गरज काय ? मी आहे ना इथं खंबीर उभा ?

**गोरा :** असं कसं ? तुमास्नी चार महिनं जालं काम धंदा बी भेटत नाय तवा बाईच्या जीवाला वाटायचीच की !

[राजा निरुत्तर होऊन, पँटच्या दोन्ही खिशांत हात घालून 'हूंऽऽ!' करून खाली मान घालून क्षणभर विचारमग्न उभा रहातो. तशी... ]

**गोरा :** सायेब एक इचारू ? (राजा वर मान करून प्रश्नार्थक मुद्रेने बघतो) काम-धंद्याचं काई जमलं ?

**राजा :** (मनःपूर्वक हसून मिस्किलपणाने) हे बघ गोरा, मी किनई आता चित्रपट सृष्टीतून सेवानिवृत्त व्हायचं ठरवलंय. (गोरा तोंड वासून बघतो तशी) बघतोस काय आ वासून ? मी आता धंदा सोडून देणार आहे. समजलास ?

**गोरा :** (आश्चर्याने) इकत्यातच ?

**राजा :** (हसून) हो म्हणजे–चित्रपटसृष्टीत नव्या दमाचे हुषार चोर घुसलेत मग आम्हा जुन्या चोरांना कोण विचारतो ? लेकाचे मला कमी पैशावर काम करायला सांगत होते.

**गोरा :** कमी तर कमी. तेवढीच चोराची लंगूटी !

**राजा :** अरे वारे चोराची लंगोटी ? शहाणाच आहेस. त्यापेक्षा मी गाण्याचा क्लास काढीन नाही तर पुन्हा गायन मास्तर होईन एखाद्या शाळेत.

**गोरा :** मग ह्यो बंगला कसा सोडिवनार ?

**राजा :** हात्तीच्या ! विकून टाकू–आहे काय त्यात ? सगळं कर्ज वारून चार पैसे गाठीला राहतील माझ्या, आहेस कुठं ?

[हे शेवटचे उद्गार ऐकतच बाहेरून दासोपंत, सोनूताई, व्यंकटराव आणि तिलोत्तमाबाई सहर्ष येतात. दासोपंत धावून राजाचा हात पकडून टाळी देत अत्यानंदाने ओरडत ]

**दासोपंत :** कसं बोललात राजाभाऊ—टाळी घ्या आधी. आम्ही अगदी हाच बेत योजून आलोय. काय मॅडळी ?

**सोनूताई :** (दटावीत) नाचरेपणा किती कराल ? जरा स्वस्थपणानं घ्या की !

**दासोपंत :** (तपकिरीची डबी काढीत) राहिलं ! संधी साधून तुम्ही बोलाऽऽ !

**राजा :** (नाराजीने) या ...बसा...तुम्ही केंव्हां आलात दासोपंत ?

**तिलोत्तमा :** इश्श म्हणजे काय ? आठ दिवस आमच्याकडंच मुक्काम आहे यांचा.

**व्यंकटराव :** दासोपंतच्या नोकरीबद्दल खटपट करायची होती आमच्या वेद-पाठकांच्याकडं—

**सोनूताई :** म्हणजे आम्ही कधी 'तसली' एक पै घेतली नाही कुणाकडून होऽ ! सगळ्या पावत्या आहेत आमच्यापाशी, पण मेल्यांनी यांच्यावर पाच रुपड्यांसाठी वालंट आणलं...

**दासोपंत :** (तपकीर ठासीत) म्हणजे त्याचं काय झालं राजाभाऊ—

**राजा :** ते ठाऊक आहे मला. मुलं कुठं आहेत ?

**सोनूताई :** मुलांच्या परीक्षा नाहीत का ? मुलं मिलवडीला. गोट्या तुम्हा दोघांची इतकी आठवण काढतोय म्हणून सांगू—सारखं मधूमावशी...मधू-मावशी...अगबाई—मधू कुठं दिसत नाही ?

**गोरा :** बाईंनला बरं न्हाय. दवाखान्यामंदी गेल्याती.

**सोनूताई :** (किंचाळत) अगोबाई ! खर्रर्रऽच का ?

**तिलोत्तमा :** भावोजी, आम्हांला एका शब्दानं नुसतं कळवायचं तरी ?

**राजा :** मी हा आत्ता पंधरा दिवसांनंतर मुंबईहून येऊन घरात पाय टाकतोय. तुमच्याप्रमाणं मलाही इतक्यातच कळलंय.

**व्यंकटराव :** त्याला बोलण्यात काय अर्थ आहे ? तो कामाचा माणूस. पण तुम्हा बायकांना आपल्या माणसांची चौकशी करायचं एवढं धोरण राहू नाही ?

**सोनूताई :** पण तसं काळजी करण्यासारखं काही नाही ना ?

**दासोपंत :** छे छे तसं काही नाही. काऽही नाही.

**सोनूताई :** (दटावीत) तुम्हांला हो काय माहीत ?

**दासोपंत :** असं काय करता मंडळी ? म.गल्या आठवड्यात ते गाल्चि

न्यायला तुम्हीच ना पाठवलं होतं मला ? त्या वेळी–

**सोनूताई :** (दटावीत) कळलंऽ !

**दासोपंत :** (शिंक देत) राहिलंऽ !

**व्यंकटराव :** कोणा स्पेशालिस्टाला दाखवायचं असेल तर राजा–

**राजा :** तिला काय झालंय ते तरी आधी मला कळलं पाहिजे ना ?

**तिलोत्तमा :** मी सांगते, या मधल्या पैशाच्या प्रकरणाचाच त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झालाय.

**सोनूताई :** तर काय ? भारीच लावून घेतलंय हो तिनं जिवाला.

**व्यंकटराव :** तुम्हा बायकांना खरोखर अक्कल नाही. पुरुषांच्या व्यवहारात आधी पडायचंच कशाला ?

**दासोपंत :** द्या टाळी ! आम्ही घरातले कर्ते पुरुष काय खपलो आहोत ?

**सोनूताई :** तुम्ही कर्ते पुरुष ? दिवे ओवाळा दिवे. पोलिस आले तेव्हा या सोनूताईच्या मागं दडून बसलात आणि–

**दासोपंत :** हां हां मंडळी–तुमच्याबद्दल नाही बोललो आम्ही. लोक तुम्हांला सोनूताई म्हणूद्यात–आम्हांला तुम्ही सोनोपंतच.

**सोनूताई :** (भडकून) मी सोनोपंत ? काय तोंड आहे का गटार आहे ?

**दासोपंत :** चुकलोऽऽ चुकलो म्हटलं ना ? म्हणजे तुमची कर्तबगारी–

**सोनूताई :** (ओरडून) तोंड मिटा आधी.

**दासोपंत :** (शिंक देत) मिटलं !

**व्यंकटराव :** ते काही नाही. तुम्ही बायकांनी आता इथं मुक्काम ठोकायचा आणि घराचा सगळा चार्ज घ्यायचा.

**राजा :** (ओरडून) छे छे नको नको...

**तिलोत्तमा :** तुम्ही सांगायच्या आधीच ठरवलंय मी ते.

**राजा :** अहो पण नको. त्याची काही गरज नाही.

**सोनूताई :** नाही कशी ? घरात आजारी बाई, एकटी काय काय करणार ?

**गोरा :** तंसं कशापाई ? म्या हाय की समदं करायसवरायला.

**तिलोत्तमा :** तुझं वेगळं पडतं. आम्ही घरातली माणसं. प्रसंगाला उभं रहायचं नाही तर मग उपयोग काय नातेवाइकांचा ?

**दासोपंत :** की कर्ज फिटून पाच-दहा हजार तुमच्या खिशात, आहात कुठं ?

**व्यंकटराव :** आता बंगला. हा विकायचा नाही. फक्त खालचा मजला आपल्या इच्छारामभाईंना गुदामासाठी भाड्यानं द्यायचा–

**दासोपंत :** आणि वरच्या मजल्यावर झकास खाणावळ टाकायची–की कायम उत्पन्नाची कटकटच मिटली.

**राजा :** (भयाण मुद्रेने) या घरात मी...मी...खानावळ चालू करू ?

**दासोपंत :** छे छे भलतंच ! मग आम्ही कशाला आहोत ? तुम्ही नुसते भागीदार.

**व्यंकटराव :** हां ऽ ऽ आणि राजा, हे जे दोन प्लॉटस् उरतात, त्यांच्याबद्दल आम्ही असं ठरवलंय की, हा पूर्वेचा प्लॉट तू त्यांच्या गोट्याला देऊन टाकायचास आणि हा पश्चिमेचा आमच्या बेबीला म्हण मन्याला म्हण–

**गोरा :** (किंचाळतो) फुक्कऽट ?

**व्यंकटराव :** नाही तर हा काय आमच्या मुलांच्याकडून पैसे घेणार आहे ? शहाणाच आहेस की तू !

**राजा :** आणि आम्ही कुठं रहायचं ते नाही सांगितलं ? फूटपाथवर की पुलाच्या कमानीत ?

**दासोपंत :** चिंता करू नका. त्याचीही योजना पक्की झालीय. कर्ज निवारून जे पैसे येतील त्यांतून गांधीनगरात थ्रीरूम फ्लॅट घ्यायचा. गायतोंड्यांच्या बिल्डिंगमध्ये. सेल्फ-कन्टेड बरं का ?

**व्यंकटराव :** ओनरशिप बेसिसवर. म्हणजे मालकाची कटकटच नाही. बाहेर छान गॅलरी–आरामात फिडल नाहीतर पेटी वाजवत बसावं.

**दासोपंत :** (खुषीत राजाच्या पाठीवर थाप मारीत) बोला राजाभाऊ, तुम्हाला झटक्यात मोकळं करायची कशी काय आयडिया काढलीय आम्ही ?

**राजा :** राणीला सांगितली की नाही तुमची आयडिया ?

**व्यंकटराव :** आठ दिवसांपूर्वीच.

**राजा :** आणि तेव्हापासून ती आजारी पडली, होय ना रे गोरा ?

**दासोपंत :** (चेहरा टाकत) तसं नाही राजाभाऊ...म्हणजे आमचं म्हणणं–

**राजा :** (उठत) थांबा. मी जरा गार पाण्यानं आंघोळ करतो एकदा.

[राजा हसत जाण्यासाठी वळतो तोच दारात बाहेरून मधुराणी उभी रहाते. कमालीची थकलेली. तिला पाहाताच राजा भारावून 'राणी' म्हणून ओरडतो व तिच्याकडे धावतो. मधुराणी उचंबळून 'राजा' म्हणून ओरडत पुढे येते तोच मूर्च्छा येऊन राजाच्या हातातच ती कोसळते. 'अरे, अरे ... काय झालं? काय झालं?" असा गिल्ला करीत सगळे तिच्याभोवती जमतात. राजा सर्वांना निवारीत म्हणतो–काही नाही–बेशुद्ध झालीय ती. आधी तिला आत नेऊन ठेवू या.' गोरा तू चटकन कांदा फोडून घेऊन ये पाहू. गोरा आत धावतो. राजा, सोनूताई आणि तिलोत्तमाबाई यांच्या मदतीने मधुराणीला उचलून आत घेऊन जातो. व्यंकटराव आणि दासोपंत उगाचच धावाधाव करीत नाचतात. जाता जाता राजा म्हणतो–"दासोपंत, जवळपासच्या एखाद्या डॉक्टरला घेऊन या बरं झटकन." त्याला पुष्टी देत सोनूताई जाता जाता खेकसतात–'उगीच नाचू नका. आधी डॉक्टर आणा." तशी–]

**दासोपंत :** (धांवपळ करीत घाबऱ्या घाबऱ्या) आता डॉक्टर कोठला उभा करायचा? माझी टोपी कुठं गेली...पायताण काय झालं ..

**व्यंकटराव :** जा आता तसेच दासोपंत. मी इकडचं बघून घेतो. आधी डॉक्टर आणा.

[ दासोपंत "डॉक्टर, डॉक्टर"...ओरडत जायला निघतात तोच बाहेरून मारोतराव येऊन थडकतो. तशी – ]

**दासोपंत :** कसे देवासारखे आलात मारोतराव? झटपट काम करा. आधी पळा आणि एक डॉक्टर आणा डॉक्टर.

**मारोतराव :** ओफ. तुमच्यासाठी?

**व्यंकटराव :** नव्हे हो–यांना कसली धाड झालीय. मधुराणी बेशुद्ध पडलीय.

**मारोतराव :** आत्ता आणतो. इसमें क्या है? पण डॉक्टर बाईच लागेल की बुवा चालेल?

**व्यंकटराव :** अहो बाई काय, बुवा काय–वेळ दवडू नका–माणसाचा डॉक्टर आणा म्हणजे झालं. धावा–पळा–अगोदर.

[मारोतराव धावत जातो. दरम्यान दासोपंत घामाघूम होऊन कोचावर बसले आहेत.]

**दासोपंत :** पाणी–पाणी–व्यंकटराव–पाणी–

**व्यंकटराव :** (धावऱ्या धावऱ्या पाण्याचा तांब्या आणून देत) तुम्हांला घाम फुटायला काय झालं दासोपंत ?

**दासोपंत :** (गटागट पाणी ढोसून मग) काय सांगू व्यंकटराव, मंडळींच्या प्रत्येक बाळंतपणाच्या वेळी घरात हाच दंगा. त्यामुळे कोणी 'डॉक्टर आणा, डॉक्टर आणा" म्हणून गलका केला की माझे पाय लटपटायला लागतात.

[तोच सोनूताई लगबगीने येतात. दासोपंतांची पाचावर धारण बसते. आणि ते लटपट कापत 'अरे देवा...' म्हणून किंचाळतात. तरी—]

**सोनूताई :** (वसकन अंगावर येत) हद्द आहे तुमच्यापुढं. डॉक्टरला घेऊन या म्हणून सांगितलं होतं ना तुम्हांला ? लांडग्यासारखे नुसते बसून राहिलात !

**दासोपंत :** (भेदरून उभे रहात) न...न...नाही नाही मारोतराव...

**सोनूताई :** (उसळून) आं ? मला मारोतराव म्हणता ? लाज नाही वाटत ?

**व्यंकटराव :** अहो तुम्हाला नाही सोनूताई. मारोतराव डॉक्टरला आणायला गेलेत असं म्हणायचंय त्यांना. तुम्हांला बघून घाबरलेत ते.

**सोनूताई :** बरे घाबरतील. बाळंतपणाच्या वेळी यांची सगळी सोंगं बघून ठेवली आहेत मी. माझ्या पोटात दुखायला लागलं की यांनी अंथरूण घातलंच. मग बाकीचे करतातच आहेत धावाधाव.

**व्यंकटराव :** ते जाऊ द्या हो. मधुराणीचं काय झालं ? शुद्धीवर आली का !

**सोनूताई :** आली. (दासोपतांना) जाऊन बघा एकेक नवरे आपल्या बायकोची किती सेवा करतात ती.

**दासोपंत :** कबूल आहे. पण मंडळी आम्ही नाही का रोज तुमचे पाय चेपून देत !

[तोच मारोतराव डॉक्टरांची बॅग घेऊन येतात. सोनूताई — " अगबाई डॉक्टर..." असे उद्गार आत पळतात. मारोतरावांच्या मागोमाग डॉक्टर अष्टपुत्रे येतात. मुद्रा भयंकर उग्र आणि चालचर्या पुतळ्यासारखी ताठ. बोलणे रेकून किंचाळून आणि दम दिल्यासारखे. ते आत येताच–]

**मारोतराव** : हे डॉक्टर अष्टपुत्रे. समोरच्या कुटुंब-नियोजन केंद्रातच काम करतात.

**अष्टपुत्रे** : (ओरडून) ऑनररी.

**दासोपंत** : (उगीचच बोलायचं म्हणून) वा छान–छान–छान.

**अष्टपुत्रे** : (थबकून, ओरडून) छान काय ? भल्या गृहस्था, भारताची लोकसंख्या किती वाढलीय त्याची काही कल्पना आहे ?

**दासोपंत** : (भेदरून) म . म...मी नाही...मी नाही वाढवली.. सहा... (बोटं दाखवीत) सहा, आम्हांला फक्त सहाच आहेत.

**अष्टपुत्रे** : (किंचाळत) सहा ? हॉरिबल, हॉरिबल.

**दासोपंत** : (गयावया करीत) एकवार सोडून द्या. पुन्हा नाही घडायचा गुन्हा.

**अष्टपुत्रे** : (दम भरीत) उद्या केंद्रावर या. शस्त्रक्रिया करून टाकतो. काय ?

**दासोपंत** : येतो येतो ना–देवाशप्पथ येतो.

**व्यंकटराव** : पेशंटला बघणार ना डॉक्टर ?

**अष्टपुत्रे** : (व्यंकटरावना आपादमस्तक न्याहाळीत) तुम्हांला किती ?

**व्यंटकराव** : (धूर्तपणे) अगदी बेतशीर. मंडळींनी ऑपरेशन करून घेतलंय. तेव्हा अतःपर आमच्यापासून भारताला भीती नाही.

**अष्टपुत्रे** : गुड. (दासोपंताना) यांचं शिका जरा. नाऊ टु पेशंट.

[व्यंकटराव बॅग घेऊन पुढे होतात. डॉक्टर पुतळ्यासारखे ताठ मागोमाग जातात. दोघे आत निघून गेल्यावर–]

**दासोपंत** : (डॉक्टर गेलेल्या दिशेकडे पहात) हा डॉक्टर आहे का खाटीक आहे हो ? हं ! मला वाटलं आता इथंच पकडून माझ्यावर हा शस्त्रक्रिया करून टाकणार. खूप डॉक्टर आणलात राव ?

**मारोतराव** : मला तरी काय ठाऊक हा इतका तिस्मारखां निघेल म्हणून ? जवळचा डॉक्टर घेऊन या म्हणालात म्हणून आणला.

**दासोपंत** : तुमच्यावर नाही का ओरडला–'तुम्हांला किती ?' म्हणून !

**मारोतराव** : भेटल्यावर पहिला सवाल तोच केला.

**दासोपंत** : मग ? किती सांगितलीत ?

**मारोतराव :** (थंडपणे) कायदेशीर एकही नाही.
**दासोपंत :** ऑं! असं का? तुमचं हे हे मोठं झकास आहे बुवा नाहीतर आम्ही! बसलो आहोत जन्मभर पांजरपोळ सांभाळीत.

[तोच आतून तरातरा तिलोत्तमाबाई आणि सोनूताई येतात. पाठोपाठ व्यंकटराव.]

**तिलोत्तमा :** (येता येता रागाने) कोण मेला डॉक्टर आहे का मवाली?
**सोनूताई :** (यजमानांच्या अंगावर वसकन येत) आधी हुसका, आधी हुसका त्याला बाहेर...धक्के मारून हाकून लावा मेल्याला...
**दासोपंत :** हो हो पण—झालं काय मंडळी एवढं पिसाळायला?
**व्यंकटराव :** दुसरं काय? तेच—'तुम्हांला किती?' आणि 'उद्या केंद्रावर या.'
**दासोपंत :** कोणाला? मंडळी तुम्हांला? तोबा तोबा...
**तिलोत्तमा :** मी जीभच हासडणार होते त्याची. आमच्या मुलांना काय हा लडदू पोसतोय?
**सोनूताई :** तर काय? निर्लज्ज मला विचारतोय—तुम्हाला इतकी मुलं कशी झाली?
**दासोपंत :** हॅं हॅं—अहो मुलंच ती. त्यांना काय कळतंय? ती व्हायचीच.

[तोच आतून दगडी गंभीर मुद्रेने स्टेथॉस्कोप काढीत डॉक्टर येतात पाठोपाठ बॅग घेऊन राजा घाबऱ्या घाबऱ्या—"पण म्हणजे काळजी करण्यासारखं काही नाही ना?" असे विचारीत येतो.

**अष्टपुत्रे :** (किंचाळत) सीरियस.

[**दासोपंत :** अरे देवा, **मारोतराव :** ओफ, **व्यंकटराव :** बापरे, **सोनूताई :** आई ग, **तिलोत्तमाबाई :** अग आई, अशी सगळी एकदम किंचाळतात. राजा तर बॅग टाकून मटकन बसतोच.]

**अष्टपुत्रे :** (दरडावीत) आधी काळजी घेतली नाहीत. आता शंख करा. तुम्ही शिकलेली माणसं. तुम्हांला एवढी अक्कल असू नाही?

**व्यंकटराव :** पण तिला काय झालंय डॉक्टर ते तरी—
**अष्टपुत्रे :** (ओरडून) सांगतो. मन घट्ट करा.
**दासोपंत :** (डोळे गच्च मिटून नि डोके दोन्ही हातांनी धरीत) केलं.
**अष्टपुत्रे :** (रुमाल काढून डोळे टिपत) हतभागी देशा, तुझं कसं होणार ? (सर्वांकडे दृष्टिक्षेप टाकून वाईट मुद्रेने कातर स्वरात) बाईंना दिवस गेलेत.

[सगळे विस्मयाचा धक्का बसून 'ऑं ?' करून किंचाळतात. सोनूताई आणि तिलोत्तमाबाई लगबगीने आत जातात. राजा हळूहळू उठतो आणि चकित मुद्रेने—]

**राजा :** काय...काय...काय...म्हणालात ?
**अष्टपुत्रे :** (ओरडून) मराठीत बोललो मी. कळलं नाही ? तुम्हांला मूल होणार आहे, मूल. स्टुपिड !
**व्यंकटराव :** फेर विचार करा डॉक्टर, तुमचं काहीतरी चुकत असेल...
**अष्टपुत्रे :** (किंचाळत) शट अप ! सव्वीस वर्षे बाळंतपणाचं हॉस्पिटल चालवलंय मी आणि नंतर केंद्रावर काम करायला लागलोय.
**दासोपंत :** (किंचाळत) ऑनररी !
**अष्टपुत्रे :** राइट ! कितवं मूल हे ?
**दासोपंत** नाही—तसा यांचा पहिलाच गुन्हा आहे हा.
**अष्टपुत्रे :** (ओरडून) डोन्ट टॉक रॉट ! मी तर यांच्या बंगल्यावरून जाता-येताना रोज पाच-पंचवीस कारट्यांचा क्रिकेट नामक धुडगूस बघतोय गेली कित्येक वर्षे.
**मारोतराव :** ओफ् ! ती यांची मुलं समजलात ? अहो ती कॉलनीतली मुलं आहेत.
**राजा :** (स्वतःच्या तंद्रीत हरवलेला. खुदकन हसत) आम्हांला मूल होणार !
**अष्टपुत्रे :** त्याला आता इलाज नाही. पण पुढल्या खेपेला काळजी घ्या.
**दासोपंत :** (किंचाळत) उद्या केंद्रावर या.
**राजा :** (हर्षभराने किंचाळत) ब्रॅव्हो ऽऽ— डॉक्टर ब्रॅव्हो ऽऽ— हिप हिप हुर्यो...आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहिकडे...

[ राजा पिसाटासारखा गात डॉ. अष्टपुत्र्यांचे दोन्ही हात धरून बॉल डान्स-सारखा नाचायला लागतो. डॉक्टर अष्टपुत्रे 'हे काय, हे काय' म्हणून किंचाळतात पण त्यांची सुटका होत नाही. सगळे स्तंभित होतात. अखेर मारोतराव मधे पडून डॉक्टरांची सुटका करतात. ]

**अष्टपुत्रे :** (अंग झटकीत) नॉन्सेन्स. आता फी द्या आणि जीवे सोडा आम्हांला.

**राजा :** (खिशात हात घालून येतील तेवढ्या नोटा काढून त्यांच्यावर उधळीत) आज लुटा...लुटून न्या मला डॉक्टर...घ्या घ्या घ्या.

**व्यंकटराव :** राजा राजा – अरे तुझं डोकंबिकं तर नाही फिरलं ? एवढ्याशा कामासाठी इतके पैसे ?

**अष्टपुत्रे :** (पहिल्यांदाच खुलत नोटा गोळा करून) इनफ–इनफ–थँक यू.

[ डॉक्टर अष्टपुत्रे जाऊ लागतात तोच बाहेरून लगबगीने धटिंगण गुरुजी येतात. समोरासमोर येताच दोघेही थबकतात. एकमेकांना–न्याहाळतात. आणि–]

**अष्टपुत्रे :** (धटिंगण गुरुजींना आपादमस्तक न्याहळीत) कोण हेऽऽ?

**राजा :** हे धटिंगण गुरुजी.

**अष्टपुत्रे :** (गुरुजींना) काय हो, मुलं किती ?

**धटिंगण :** (खुषीत) दोन्हीकडची मिळून बाराशे.

**अष्टपुत्रे :** (हातातली बॅग पडते आणि किंचाळतात) बाराशे ? माय गॉड ! अरे म्हणजे बायका आहेत तरी किती ?

**धटिंगण :** तशा फार नाहीत. दहा–बी.ए., बी.टी., सात–एस. टी. सी. आणि दोन–हस्तव्यवसायाच्या !

**अष्टपुत्रे :** (मटकन बसत किंचाळत) एवढ्यांना बाराशे मुलं ?

**धटिंगण :** काय करणार ? बायका मिळतच नाहीत अलीकडं.

**अष्टपुत्रे :** (ओरडत) अरे हा काय राक्षस आहे का सैतान आहे ?

**राजा :** (हसू आवरीत) अहो महाशय, हे गुरुजी शाळेतली संख्या सांगताहेत कुटुंबाची नव्हे. गुरुजी ब्रह्मचारी–ब्रह्मचारी.

**दासोपंत :** म्हणून काय झालं ? गुरुजी उद्या केन्द्रावर या.

[डॉक्टर अष्टपुत्रे भेदरून जाण्यासाठी उठतात. घटिंगण गुरुजी त्यांच्याकडे मारक्या म्हशीसारखे बघतात आणि खसकन डॉक्टरांचा टाय धरून ओढत-]

**घटिंगण :** थांबा मेहेरबान. (दरडावून) तुम्हाला किती ?

**अष्टपुत्रे :** (दचकून) ऑं ?

**दासोपंत :** ऑं काय करता ? आम्हाला दम भरलात आता सांगा–तुम्हांला किती ?

**अष्टपुत्रे :** ( भयाण मुद्रेने, पडलेल्या स्वरात ) काही नाही.

**घटिंगण :** मोठ्यानं बोला.

**अष्टपुत्रे :** एकसुद्धा नाही. (पडलेल्या आवाजात) म्हणून तर केंद्रावर काम करतोय.

[बॅग उचलून अष्टपुत्रे पळत सुटतात. ते जाताच–]

**घटिंगण :** वेडाबिडा आहे काय हो हा ?

**दासोपंत :** तर काय ? टाळी द्या राजाभाऊ. बरा जाम घुमवलात लेकाला. माझ्यावर शस्त्रक्रिया करतोय म्हणे.

**घटिंगण :** राजाभाऊ, आनंदाची बातमी. हे निमंत्रण घ्या. उद्या शाळेच्या उद्घाटनाचा समारंभ. दोघांनी यायचं. आम्ही सत्कार करणार आहोत तुमचा.

**राजा :** (लाजून) 'त्या' बद्दल ? हॅ हॅ ! भलतंच काय गुरुजी ?

**घटिंगण :** एवढी मोठी देणगी दिलीत तुम्ही मग सत्कार नको करायला ? असं कसं ?

**राजा :** (आश्चर्याने) देणगी ? छे छे आता देणगीबिणगी काही नाही. परत द्या...परत द्या आमचे पैसे आम्हाला.

**घटिंगण :** खुळा तर नाहीस ? अरे शाळेच्या रूपानं तुमचं नाव चिरस्थायी होणार आहे.

**राजा :** आमचं नाव चिरस्थायी करणारं बाळ घरात जन्माला येणार आहे. गुरुजी, शाळेचं काय घेऊन बसलात ?

**घटिंगण :** (चकित होत) ऑं ? अरेच्याऽऽ ? (त्याचे खांदे पकडून घुसळत) म्हणतोस काय राजाभाऊ ? मधुराणी ..राणीला...ऑं ? (हात पकडून जोराजोराने

हस्तांदोलन करीत) छान.. छान छान झालं. हे हे मोठं छान झालं... कॉंग्रेच्युलेशन्स . आमची गाडी हुकली पण तुम्ही नेमकी पकडलीत...अभिनंदन...

[तोच सोनूताई आणि तिलोत्तमाबाई यांचा आधार घेऊन मधुराणी येते. पाठोपाठ गोरा येतो. तिला पहाताच उचंबळून येऊन–]

अग लबाडेऽऽ, आम्हाला पत्ता लागू दिला नाहीस काय? पण आनंद झाला... आनंद झाला आम्हाला...(डोळे टिपत) फार आनंद झाला. गोरा (खिशातून दहाची नोट काढीत) आधी पळ आणि पेढे घेऊन ये पेढे. [गोरा नोट घेऊन पळत जातो.]

**मधुराणी :** (लाजून क्षीण स्वरात) इश्श! इतक्यातच काय? अजून अवकाश आहे.

**घटिंगण :** अवकाश नाही बेटी, दिवस हां हां म्हणता जातील. अग पोपट बागेत फांदीवर येऊन बसलाय. एक दिवस हळूच घरात उतरेल, आहेस कुठं? राजाभाऊ, आता पोरकटपणा बंद बरं का. घरटं नीट संभाळा.

**राजा :** म्हणून तर म्हणतोय गुरुजी, आमचे देणगीचे पैसे परत करा. वाटल्यास थोडे कापून घ्या. पण–

**मधुराणी :** इश्य ऽऽ! खुळे की काय तुम्ही?

**घटिंगण :** बघ म्हणजे झालं. देणगीचे पैसे परत कसे देता येतील राजाभाऊ?

**राजा :** दुकानात माल परत करीत नाही तुम्ही? तसं नावासाठी धडपडणाऱ्या एखाद्या शेटजीला गाठा आणि आमची रक्कम परत करा. परिस्थिती बदललीय गुरुजी. घरात बाळ येणार म्हणजे आता आम्हाला सगळं लागणार. दादा, रेडिओ लागणार आहे बरं का आम्हाला. दासोपंत, त्या गाद्यागिरद्या, आमची शोकेस–

**मधुराणी :** दिलेलं कांही परत घ्यायचं नाही.

**सोनूताई :** आम्हाला प्लॉट द्यायचं ठरवलं होतंस तू मधू ते देखील–

**राजा :** (ओरडून) प्लॉट्स? विसरा मंडळी विसरा ते आता. आत फुकट कोणाला काही मिळायचं नाही. फक्त बँकेचं कर्ज– (एकदम मारोतरावावर झडप घालून) मारोतराव, निम्मं कर्ज तू फेडायचं कबूल केलं होतंस.

**मारोतराव :** ओफ्–त्याच्याचसाठी बोलायला मी आलो होतो. राजाभाऊ बँकेची एक योजना आपण मान्य केली तर आपल्या पुढल्या सिनेमासाठी–

**राजा :** (किंचाळत) सिनेमा ? इतकं झालं तरी पुन्हा सिनेमा ? पुन्हा या घरात सिनेमाचं नाव काढ तर खरा . मी...मी तुला गोळी घालून ठार करीन.

**मारोतराव :** माझं सगळं ऐकून तरी घ्या. आपल्या पुढल्या सिनेमासाठी बँकेनं दीड लाख रुपये–

**राजा :** (ओरडून) पुन्हा सिनेमा ? खोटं वाटतंय तुला ? थांब बंदूक आणून दाखवतो तुला सिनेमा–काय समजला आहेस तू. [धावत माडीवर जातो.]

**धर्टिंगण :** पळा आता मारोतराव पळा. आज डोकं ठिकाणावर नाही त्याचं. खरंच गोळीबिळी देखील घालायचा तो.

**मारोतराव :** ओफ्. [घाबऱ्या घाबऱ्या पसार होतो.]

**मधुराणी :** ताई, वहिनी तुम्ही देखील चला आता. आज कोण्णी त्यांच्याशी काही बोलू नका, माझ्या सगळं लक्षात आहे. वेळ येताच मी सगळं करीन. माझा शब्द देतेय मी तुम्हांला. जा आता घरी–आज अंगात संचारलंय त्यांच्या.

[उठून कुंकवाचा करंडा घेऊन सोनूताई व तिलोत्तमाबाई यांना कुंकू लावते.]

**त्र्यंकटराव :** चला मंडळी, मूल होणार म्हणून आज नाचतोय हा, पण पोराच्या रडण्यानं रात्र रात्र जागरणं व्हायला लागली म्हणजे कळेल त्याला हिसका.

**सोनूताई :** मधू, नीट काळजी घे हो ऽऽ

**तिलोत्तमा :** काही लागलं सवरलं तर कळवा आम्हांला.

**दासोपंत :** आणि तेवढं प्रॉट्सुचे आणि खाणावळीचं एकदा बघा. नाही म्हणजे–

**सोनूताई :** (दटावीत) कळलं ऽऽ

**दासोपंत :** (शिंक देत) राहिलं ! [दासोपंत, सोनूताई, त्र्यंकटराव, तिलोत्तमाबाई जातात.]

**धर्टिंगण :** पैशाविषयीच्या हा फार अडचणीत आलाय का ग ?

**मधुराणी :** (खिन्न हसून) देवानं बाळ दिलं पण घरातलं धन काढून नेलं.

**धर्टिंगण :** समर्थांनी म्हटलंय मुली–'लेकुरे उदंड जाली । तो ते लक्ष्मी निघोन गेली...'

**मधुराणी :** पण सांगू का गुरुजी, मला त्याचं आता थोडंसुद्धा दुःख राहिलं

नाही. पोटापुरते दोन घास आम्हांला कष्ट करून कुठंही मिळवता येतील. माझं सुख किनई आज दोन्ही काठांनी ओसंडून सांडतंय.

**घटिंगण :** (गाडीवरून उठत) असंच सुख सांडू दे मुली, काठोकाठ भरून वाहू दे. मी जातो आता. समारंभाला या उद्याच्या. आणि हे बघ त्याला सांग, मला नाही सांगता यायचं त्याला–पण तू सांग–म्हणावं कुठंच काही नाही जमलं तर शाळेत गायनमास्तरची जागा रिकामी आहे. इनवयात भरीत नाही मी. आपल्या शाळेत काम करायला लाज वाटायचं कारण नाही.

**मधुराणी :** (गहिवरून) गुरुजी...

[घटिंगण गुरुजी जातात. मधुराणी डोळे टिपते. परक्या दृष्टीने सभोवार बघते. प्रेक्षकांच्याकडे पाहून प्रसन्न हसते. तोच वरून राजा 'सापडली... सापडली एकदाची बंदूक' असे बडबडत एक छऱ्याची बंदूक घेऊन जिन्यावरून धाडधाड करीत खाली येतो आणि–]

**राजा :** (सभोवार पहात) ऑं ? कुठं गेले सगळे चोर !

**मधुराणी :** (हसून) तुमच्या बंदुकीला घाबरून पळाले. बसा जरा आता स्वस्थ. बसा म्हणते ना ? आणिक माझ्याशी काहीतरी बोला.. सुंदर...काव्यमय...

**राजा :** (बंदूक टाकून तिच्या शेजारी बसत) भित्रट लेकाचे. हूं, काय म्हणतेस ? (एकदम सणक शिरल्यासारखा उठत) एक पण तुला मी सांगून ठेवतोय हं. आता यापुढं फुकट कोण्णाला काही द्यायचं नाही.

**मधुराणी :** हे तुमचे काव्यमय सुंदर बोलणं वाटतं ? (हसते.)

**राजा :** नाही गं ऽ, चेष्टा करू नकोस, पण म्हणजे किनई दोघांनी आता कसं प्रौढ, गंभीऽर, म्हणजे रिस्पॉन्सिबली वागायचं. पैशांची उधळपट्टी नाही करायची. कुणी मागायला लागले तर साफ नाही म्हणून सांगायचं. अरे लोकांना द्यायला आम्हांला काही मुलंबाळं आहेत का नाहीत ?

**मधुराणी :** मुलंबाळं ! (हसू लागते.)

**राजा :** आज नसली म्हणून काय झालं ? आता होणारच की एका पाठोपाठ...

**मधुराणी :** (हसू आवरीत) मग येतील बंदूक घेऊन डॉक्टर अष्टपुत्रे...

**राजा :** बाप रे ऽ न.. नं...नाही नाही–म्हणजे फार नाही.. दोन, नाही तीन...का चार ?

**मधुराणी :** चला काहीतरीच काय?
**राजा :** (जवळ सरकत) ए ए एक सांग–
**मधुराणी :** हां हां–सांगते पण फार लाडात येऊ नका. प्रौऽढ, गंभीऽर, रिस्पॉन्सिबली वागा.
**राजा :** (उठून तिच्या पायांशी बसतो.) बरं बुवा इथं बसतो. झालं? आता एक सांग, तुला केव्हा कळलं?
**मधुराणी :** (लाजून) जा गडे.
**राजा :** सांगतेस का गुदगुल्या करू? करू?
**मधुराणी :** इश्श काय हे ऽऽ सांगते सांगते. मला किनई, महिन्यापूर्वीच शंका आली होती.
**राजा :** (फुरंगटून) आणि मला मात्र आज कळलं त्या अष्टपुत्र्याकडून...
**मधुराणी :** असं काय करता! खात्री झाल्याशिवाय सांगायचं?
**राजा :** काय हरकत आहे?
**मधुराणी :** आणि माझी शंका खोटी ठरली असती म्हणजे?
**राजा :** इसमे क्या है? आमचा चित्रपट नाही पडत?
**मधुराणी :** अहाहा–हे तुमचं शहाणपण. त्यातलं सुख आणि दुःख काय आहे ते तुम्हा पुरुषांना जन्मजन्मांतरी कळायचं नाही. कळलं ऽऽ!
**राजा :** (दासोपंतासारखी शिंक देत) राहिलं ऽऽ [दोघेही हसतात.] हसतेस काय, माझ्या पोटात तर आत्ताच गोळा उठलाय. आपल्या बाळासाठी पैसा कुठाय, होतं नव्हतं ते आपण घालवून बसलो.
**मधुराणी :** काही प्रलय ओढवणार नाही त्यामुळे. जसे आपण ऊनपावसात वाढलो तसाच आपला बाळ थंडीवाऱ्यात लहानाचा मोठा होईल.
**राजा :** (एकदम उठत) हे मला मान्य नाही. आपला बाळ म्हणजे कोण समजलीस तू? मी त्याला इतका मोठा करणार आहे...इतका मोठा...इतका मोठा...इतका मोठा...
**मधुराणी :** (खळखळून हसत) की त्याचे हात चंद्राला लागणार.
**राजा :** शंका आहे काय?
**मधुराणी :** (हसत) खूळ लागलंय तुम्हांला.

राजा : (हसत) आणि तुला नाही लागलं ? तू खुळी, मी खुळा—
मधुराणी : आणि आपला बाळ ?
राजा : तो तर तुझ्या माझ्या हातातला खुळखुळाच.
निगा रखो हुशियार भाई निगा रखो हुशियार
दोन खुळ्यांच्या हातात आता खुळखुळा येणार...
मधुराणी : खुळ्यासारखा चंद्रासाठी तोही हट्ट करणार
राजा : अन द्वाड आई तेवढ्यासाठी त्याला झोडपणार
मधुराणी : मग तुम्हीच सांगा असला हट्ट कस्सा पुरवणार ?
राजा : आकाशाचे झाड हालवून चंद्रच मी पाडणार !
मधुराणी : बाई अस्से लाड करून त्याला तुम्हीच बिघडविणार.
राजा : अगं—तुझ्या नि माझ्या वळणावरतीच शेवटी तो जाणार
दोन खुळ्यांच्या जगात तिसरा तोही खुळा होणार
निगा रखो हुशियार भाई निगा रखो हुशियार.

मधुराणी : आपला बाळ मोठेपणी सांगा कोण होणार ?
राजा : तो बाळ की ती बाळ ?
मधुराणी : 'तो !'
राजा : नाही 'ती !'
मधुराणी : ( ताडकन उठत ) नाही 'तो !'
राजा : चुकलो, बरं बाई तो तर तो !
मधुराणी : आपला बाळ मोठेपणी सांगा कोण होणार
राजा : तुझ्यासारखा चित्रकार ?
मधुराणी : ऊँ हूं.
राजा : माझ्यासारखा संगीतकार ?
मधुराणी : (नाक मुरडून) छेऽऽग बाई ?
राजा : मग तो भिलवडीच्या नाक्यावरचा कारकूनच होणार.
मधुराणी : असलं काही बोलाल तर मला नाही हंऽ खपणार,
मी सांगते बाळ आपला डॉक्टरच होणार.
राजा : डॉक्टर अष्टपुत्रे ?

**मधुराणी :** कान धरू का ?
**राजा :** चुकलोऽऽ ! बरंऽ बाई बाळ आपला डॉक्टरच होणार.
**मधुराणी :** मीच त्याला हुशार सुंदर बायको मिळवून देणार.
**राजा :** अन सासू सुनेची घरात रोज खडाजंगी उडणार.
**मधुराणी :** जा बाई ! तुमच्याशी मी गट्टी फू करणार.
**राजा :** बाजारातल्या तुरीसाठी इतक्यात तू रुसणार ?
अग दोन खुळ्यांच्या हातात आत्ता खुळखुळा येणार
निगा रखो हुशियार भाई निगा रखो हुशियार...

[ दोघेही हातात हात घालून खळखळून हसत कोचावर शेजारी बसतात. ]

**राजा :** (क्षणभर तिच्याकडे पहात) काहीतरी बोल ना ? हे काय नुसतं आपलं बघत बसायचं ?
**मधुराणी :** काय बोलू ?
**राजा :** वा वा ते मीच सांगू वाटतं ? काहीतरी सुंदर सुंदर...काव्यमय...
**मधुराणी :** (गुणगुणत) शब्दात बोलू की सुरात ?
**राजा :** वेडे शब्द नि सूर काय वेगळे असतात होय ?
[ मधुराणी गाऊ लागते. राजा तिच्या पायाशी बसून तल्लीन ऐकू लागतो—]
**मधुराणी :**
किती गोड बाई बाळ जसे कमल उमलले
सौख्याचे सार सकल वदन चिमुकले
कुंदाच्या उगवाया लागल्या कळ्या
माथ्यावर कुरळ्यांच्या रुळति साखळ्या
मखमाली गाली कशा खेळती खळ्या
ओठांच्या पाकळ्यांत ब्रह्म साठले। किती गोड बाई.

[ पडदा ]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ... नों. दि. ...